# स्मरणिका २०२५

# महाराष्ट्र फाउंडेशन

अमेरिका

## पुरस्कार २०२४

Invest in future
of
those with no future...
so
they can
REINVEST

। साहित्य पुरस्कार ।    । समाजकार्य पुरस्कार ।

**महाराष्ट्र फाउंडेशन** (अमेरिका)
यांच्यासाठी
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
व **साधना ट्रस्ट** (पुणे)
यांनी
सुनील देशमुख साहित्य आणि समाजकार्य
पुरस्कारांच्या (२०२४) निमित्ताने
या स्मरणिकेचे प्रकाशन जानेवारी २०२५ मध्ये केले आहे.
*(फक्त खाजगी वितरणासाठी)*

□

संपादक
**मुकुंद टाकसाळे**
mukund.taksale@gmail.com / 9850817210

अंकनिर्मिती
**प्रदीप चंपानेरकर**

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे**

अक्षरजुळणी
**मुग्धा दांडेकर,** श्रीडी ग्राफिक्स, पुणे

मुद्रितशोधन
**युगंधरा केदारी**

मुद्रक
**रोहन प्रकाशन,** ४३० शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

# पुरस्कारांचे मानकरी आणि स्वरूप


| साहित्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार<br>**आ. ह. साळुंखे,** सातारा | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ग्रंथ पुरस्कार (ललित)<br>**विलास शेळके,** नाशिक ('धरणसूक्त' – कादंबरी) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक)<br>**अंजली चिपलकट्टी** ('माणूस असा का वागतो?') | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार<br>**वामन पंडित,** कणकवली (संपादक - 'रंगवाचा') | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

| समाजकार्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार<br>**देबेंद्र सुतार,** कटक, ओडिशा | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| शिक्षण क्षेत्रातील विशेष कार्य पुरस्कार<br>**डॉ. शरद जावडेकर,** पुणे | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)<br>**हसीना खान,** मुंबई | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)<br>**डॉ. रुपेश पाटकर,** सिंधुदुर्ग | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

# अंतरंग


- संपादकीय / ५
- अध्यक्षांचे मनोगत : विवेक पाटणकर / ७
- मनोगत : शोभा चित्रे / १०
- 'मासूम'चे मनोगत : डॉ. मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी / १२
- सुनील देशमुखांची सामाजिक बांधीलकी : राजन गडकरी / १५
- डॉ. मीरां चड्ढा-बोरवणकर : कणखर आणि संवेदनशील 'सुपरकॉप' : रसिका साबळे / २०
- दिलीप वि. चित्रे / २३
- पुरस्कारप्राप्त मान्यवरांविषयी...
  - डॉ. आ. ह. साळुंखे : 'अखेरचा रोमन' : राजू परुळेकर / २७
  - देबेंद्र सुतार : ओडिशामध्ये चेटकीण प्रथेविरोधात संघर्ष करणारे लढवय्ये : राहुल थोरात, अण्णा कडलास्कर / ३४
  - विलास शेळके : 'धरणसूक्त' : एक कृतिशील लेखक : हेमंत पोतदार / ४१
  - डॉ. शरद जावडेकर : शिक्षणहक्क चळवळीतील संघर्ष : सुरेखा खरे / ४८
  - अंजली चिपलकट्टी : अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं पुस्तक – 'माणूस असं का वागतो?' : वीणा गवाणकर / ५४
  - डॉ. रुपेश पाटकर : एक मानवतावादी मनोवैज्ञानिक : संतोष पुरोहित / ५८
  - वामन पंडित : मराठी रंगभूमीची बखर - 'रंगवाचा' : डॉ. राजेंद्र चव्हाण / ६४
  - 'बेखौफ हसीना' - एक संघर्ष यात्रा : स्वातीजा मनोरमा / ६९
- निवड समिती / ७५
- पुरस्कारांचे अध्यक्ष कोण? आणि प्रमुख पाहुणे कोण? / ७६
- महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था / ८४
- पुरस्कार निवडीचे निकष / ९४

# संपादकीय



महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार समारंभ आला की, सुनील देशमुख यांची आठवण येणे अटळ आहे. स्वत:च्या वैयक्तिक देणगीतून त्यांनी १९९४ साली हे पुरस्कार सुरू केले. आज त्याला तीस वर्षे पूर्ण होत आहेत. दर वर्षीच्या या पुरस्कार सोहळ्यात सुनील देशमुख यांचा वावर अत्यंत उत्साही, प्रेरणादायक आणि तेवढाच प्रसन्न असायचा. त्यांनी प्रथम साहित्य पुरस्कार प्रदान करण्यापासून सुरुवात केली आणि दोन वर्षांनंतर सामाजिक कार्याचे पुरस्कार सुरू केले. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या नवनव्या लेखकांचा शोध घेणे, कार्यकर्त्यांचा शोध घेणे, त्यांचा आदरपूर्वक सन्मान करणे हे कार्य महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार योजनेतर्फे गेली तीस वर्षे सातत्याने उत्साहात चालू आहे.

सुरुवातीला ही पुरस्कार योजना राबवण्याची जबाबदारी गोरेगावच्या 'केशव गोरे स्मारक समिती'ने आपल्या खांद्यावर घेतली होती. मृणालताई गोरे यांनी हा पुढाकार घेतलेला होता. त्याला लोकवाङ्मयगृह प्रकाशनाचे प्रकाश विश्वासराव यांची खंबीर साथ लाभली. प्रकाश विश्वासराव यांना देखणी पुस्तके कशी प्रकाशित करावीत, याची एक नजर होती. सुरुवातीच्या 'संवादिनी' (साहित्य स्मरणिका) आणि 'मंथन' (सामाजिक कार्य स्मरणिका) या दोन स्मरणिका त्यांच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देतील. सतीश काळसेकर, दिगंबर पाध्ये, चंद्रकांत केळकर यांचा ही पुरस्कार योजना यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा होता, असं म्हटल्यास त्यात वावगं ठरणार नाही. त्या काळाबद्दल याच स्मरणिकेत आम्ही महाराष्ट्र फाउंडेशनचे माजी अध्यक्ष राजन गडकरी यांचा लेख प्रसिद्ध केलेला आहे.

त्यानंतर ही योजना त्या वेळचे साधनाचे संपादक आणि 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती'चे संस्थापक नरेंद्र दाभोलकरांमुळे 'साधना ट्रस्ट'कडे आली. दाभोलकर हे सुनील देशमुख यांचे मित्र होते. त्यांच्या कार्याबद्दल देशमुखांना अतीव आदर होता. प्रथम दाभोलकरांनी आणि नंतर साधनेचे संपादक झालेल्या विनोद शिरसाठ यांनी ही योजना पुढे नेली. त्यांनी त्यांच्या पद्धतीने या योजनेत काही सकारात्मक बदल घडवून आणले. आणि आता त्यांच्याच सहकार्याने 'मासूम' (महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ) या संस्थेकडून ही योजना कार्यान्वित होते. 'मासूम'चे सहसमन्वयक मनीषा गुप्ते आणि रमेश अवस्थी, त्याचबरोबर त्यांचे सहकारी या साऱ्यांच्या कष्टामुळे ही पुरस्कार योजना आज यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

गेली अनेक वर्षं पुरस्कारप्राप्त व्यक्तींची निवड करण्याची प्रक्रिया ठरलेली आहे. भारतातील निवड समिती प्रत्येक वर्षी एकेका पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस करत असते. या निवड समितीत नामवंत लेखक, समीक्षक, संपादक असतात. त्यांचं वाचन या पुरस्कारापुरतं

मर्यादित नसतं. ते अखंडपणे वाचतच असतात. शिवाय महाराष्ट्रातील साधारणपणे २५० वाचकांकडून शिफारशी मागवण्यात येतात. त्यातूनही काही नावांचा विचार केला जातो. इथल्या - भारतातल्या निवड समितीतल्या तीन शिफारशी अमेरिकेतल्या निवड समितीकडे पुस्तकांच्या प्रतींसह पाठवल्या जातात. त्या प्रत्येक पुरस्कारासाठी एका नावाची अंतिम निवड करतात. अमेरिकेतील सर्व सदस्यांचे मराठी वाचन अद्ययावत आहे, हे नमूद करणे जरुरीचे आहे. या स्वच्छ आणि पारदर्शक प्रक्रियेमुळे या पुरस्कारांचा दर्जा उंचावला आहे.

सुनील देशमुख हे प्रागतिक विचारांचे होते. त्यामुळे अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या, माणसामाणसांमध्ये धर्म, जाती, पंथ, लिंग यांवरून नवनव्या भिंती निर्माण करणाऱ्या विचारांना इथे थारा नाही. आजवर पुरस्कार मिळालेल्यांची नावं नुसती नजरेखालून घातली तरी ही गोष्ट आपल्या नजरेला स्पष्टपणे जाणवेल.

या पुरस्कारांसाठी आम्ही पुस्तके मागवत नाही. ती पाठवण्याची गरज नसते, हे वारंवार सांगूनही लोक पुस्तकं पाठवतच असतात. 'कृपया पुस्तके पाठवू नका, स्वत:च्याच नावांची शिफारस करू नका', हे दर वेळी आवाहन करूनही पुस्तकांचा ओघ येतच राहतो.

या स्मरणिकेत वर म्हटल्याप्रमाणे राजन गडकरी यांचा लेख जसा प्रसिद्ध केलेला आहे, त्याचप्रमाणे आजवर जे जे प्रमुख पाहुणे बोलावले, जे जे अध्यक्ष झाले, त्यांची नोंद घेणाराही एक लेख नव्याने प्रसिद्ध करीत आहोत. वाचकांना ही माहिती वाचायला नक्कीच आवडेल.

स्मरणिका देखण्या स्वरूपात दर वर्षी प्रसिद्ध होते, याचे श्रेय सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशनचे मित्र राहिलेले प्रदीप चंपानेरकर यांना जाते. 'घरचं कार्य' असावं तशी त्यांची या स्मरणिकेच्या कामाकडे पाहण्याची वृत्ती असते. चित्रकार राजू देशपांडे हे दर वर्षी आकर्षक मुखपृष्ठ देऊन स्मरणिकेला चार चाँद लावत असतात. त्या दोघांचेही मन:पूर्वक आभार.

आजच्या कार्यक्रमाचा 'takeaway' काय? काय घेऊन आपण घरी जाणार आहात?

या वर्षी ज्यांना दिलीप वि. चित्रे साहित्य जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे, ते पुरोगामी विचारवंत प्रा. आ. ह. साळुंखे आपल्या भाषणातून जे विचारधन आपल्याला देतील, ते आजच्या अंधारमय काळात फार मोलाचे ठरणार आहे, आपल्याला संघर्षाचे बळ देणारे ठरणार आहे.

**मुकुंद टाकसाळे**
संपादक
mukund.taksale@gmail.com / ९८५०८१७२१०

## अध्यक्षांचे मनोगत



### पंचम प्रकल्पाचे यश

सर्वप्रथम सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन साहित्यिक आणि सामाजिक पुरस्कार प्राप्त झालेल्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन. तसेच या पुरस्कार निवड समितीवर काम केलेल्या भारत आणि अमेरिकास्थित महाराष्ट्र फाउंडेशनच्या हितचिंतकांचे मन:पूर्वक आभार.

या पुरस्कार योजनेची मातृसंस्था महाराष्ट्र फाउंडेशन आहे. या संस्थेची वाटचाल गेली ४६ वर्षे दमदारपणे चालू आहे. कोविडनंतरच्या काळात महाराष्ट्र फाउंडेशनने हाती घेतलेला एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे 'पंचम'.

महाराष्ट्र फाउंडेशनचे ब्रीद वाक्य 'Social and Economic Justice for All' साध्य करण्याकरिता, २०२२मध्ये फाउंडेशनच्या संचालक मंडळाने, खेडेगावांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने 'पंचम' या 'एकात्मिक गाव विकास योजने'ची आखणी केली. या अंतर्गत शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सबलीकरण आणि गरिबी निर्मूलन अशा पाच वेगवेगळ्या विषयांवर काम करायचे ठरवले.

२०२२मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील मुतनुर हे आदिवासी गाव आणि सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कुसुंबी हे गाव अशी दोन गावे 'पथदर्शी प्रकल्प' म्हणून निवडली.

गेल्या दोन वर्षांत ह्या दोन्ही गावांची वाटचाल 'पंचम'ची उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या मार्गावर चालू आहे. हे काम करत असताना गावातील लोकांचा उत्साही सहभाग, स्थानिक सेवाभावी संस्थांची मदत आणि महाराष्ट्र फाउंडेशनचे नियोजन ह्या सर्व बाबी महत्त्वाच्या ठरलेल्या आहेत. महाराष्ट्र फाउंडेशनचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही संस्था सरकारपेक्षा वेगळे काम न करता त्या योजनांच्या हातात हात घालून काम करते.

मुतनुर हे गडचिरोली जिल्ह्यातील चामोशी तालुक्यातील पारीमुरांडी ग्राम पंचायत हद्दीमधील २५० लोकसंख्येचे ५५ कुटुंबे असलेले आदिवासी गाव आहे. या गावातील ४० भूमिहीन कुटुंबांना २३० एकर वनजमीन मिळाली आहे. येथील शेती ही संपूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने उत्पादनाची हमी नव्हती. 'पंचम' प्रकल्पांतर्गत रुदय या सेवाभावी संस्थेच्या साहाय्याने नवीन तलावाची निर्मिती करण्यात आली. आता २३० एकर जमीन सिंचनाखाली आणण्यात आली आहे. तलाव खोलीकरणामुळे शेती उत्पादनात ३० टक्के वाढ झाली आहे. तसेच तलावाखालील शेत विहिरीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नवीन

तलावात गावकऱ्यांनी मत्स्य व्यवसायाला सुरुवात केली आणि पहिल्याच वर्षी ५०० किलो मासळीची प्रती किलो १२०/- प्रमाणे विक्री करून रु. ६०००० नफा कमावला. तलावातील पाण्याचा वापर करून गावातील १० शेतकऱ्यांनी एकूण २.४ हेक्टर (६ एकर) जागेत भाजीपाला लागवड केली.

गावातील एकशिक्षकी शाळेमध्ये शिक्षकाच्या अनास्थेमुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ होत होती. महाराष्ट्र फाउंडेशनने पुण्याच्या Door Step Schoolच्या सहकार्याने स्थानिक युवकांना शिक्षण दिले आणि पूरक शिक्षणाची व्यवस्था केली. शाळेमध्ये कॉम्प्युटर, बोलक्या भिंती असे कल्पक उपक्रम राबवून मुलांमध्ये शिकण्याची आवड निर्माण केली. या वर्षी शाळेमध्ये ३५ मुले नियमितपणे येऊ लागली आहेत.

पाण्यापासून होणारे रोग टाळण्यासाठी मुतनुर येथे वॉटर एटीएम देण्यात आले आहे. तसेच महिला सक्षमीकरणाच्या अंतर्गत आरोग्याचे प्रश्न, मासिक पाळी दरम्यान काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. महिलांना बाल संगोपनाच्या योजनेबाबत माहिती दिली जाते. गावातल्या महिलांसाठी 'महिला बचत गट' स्थापन करण्यात आलेला आहे. ज्या महिलांना व्यवसाय करण्याची इच्छा आहे त्यांना योग्य ती माहिती पुरवणे आणि मार्गदर्शन करणे हेही काम महाराष्ट्र फाउंडेशन नियमितपणे करते.

शासकीय नोकरी तसेच रोजगार उपलब्ध करण्याच्या उद्देशाने चारचाकी वाहन प्रशिक्षणाची योजना राबवण्यात आली. महाराष्ट्र फाउंडेशनने १० जणांची निवड केली, त्यातही ५ मुलींचा समावेश आहे. चारचाकी वाहन प्रशिक्षणानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस.टी. महामंडळ) येथे या प्रशिक्षणार्थींना बस ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

कुसुंबी गावात सर्वप्रथम 'महिला सबलीकरण' या सूत्रावर लक्ष केंद्रित केले गेले. महिला बचत गट गावात आधीपासूनच अस्तित्वात होते. त्याचे मजबुतीकरण केले गेले. स्त्री नेतृत्व विकसित करणाऱ्या, कौशल्य विकास करणाऱ्या विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या. स्त्रियांचा ग्रामपंचायतीमधील सहभाग वाढावा यासाठी प्रयत्न केले गेले. गावासाठी इको फ्रेंडली चुली बनवून घेतल्या. या चुलीच्या वापराची प्रसिद्धी करण्याकरिता गावातील महिलांना त्यात सहभागी करून घेतले गेले. धूर ओकणाऱ्या चुलीपासून मुक्ती मिळावी म्हणून हा पुढाकार फार महत्त्वाचा ठरला.

महाराष्ट्र फाउंडेशनने, ॲवॉर्ड या सेवाभावी संस्थेच्या मदतीने 'ॲग्रोमिलेट वूमन फार्मर प्रोड्युसर कंपनी' अशी एक छोट्या शेतकऱ्यांसाठी असलेली योजना चालू केली. ह्या संपूर्ण स्त्री शेतकरी भागीदारांच्या संस्थेमार्फत नाचणीचे सकस उत्पादन वाढविणे, नाचणीला उत्तम बाजारभाव मिळवून देणे, नाचणीची विविध उत्पादने तयार करणे आणि त्यांना प्रभावीपणे बाजारात रुजवणे व विकणे असे उपक्रम चालवले जातात. या प्रकल्पामुळे कुसुंबी गावाची आर्थिक स्थिती एकदम बदलून जाईल, असा विश्वास महाराष्ट्र फाउंडेशनला वाटतो. उत्पादित नाचणीचे विविध खाद्यप्रकार बनविण्याकरिता आणि विक्रीकरिता ॲग्रोमिलेटची स्वत:ची बेकरी

बांधण्याचे काम जोरात सुरू आहे आणि येत्या नवीन वर्षात ॲग्रोमिलेट स्वत:च्या जागेतून हा व्यवसाय पुढे नेईल. ॲग्रोमिलेटचे नाचणी आधारित खाद्यपदार्थ सातारा जिल्ह्यातच नव्हे तर पार अमेरिकेपर्यंत पोहोचले आहेत.

महाराष्ट्र फाउंडेशनचा असा ठाम विश्वास आहे की, जोपर्यंत गावाचे भविष्य असलेली लहान मुले उत्तम शिक्षण घेत नाहीत तोपर्यंत या विकासाची परिपूर्ती होणार नाही. त्यासाठी फाउंडेशनने क्लायमेट रिॲलिटी प्रोजेक्टला बरोबर घेऊन गावातील दोन शाळा ग्रीन कॅम्पस म्हणून रूपांतरित करण्याची योजना सुरू केली आहे. यासाठी शाळांमधील शिक्षकांना सोलर एनर्जी, उत्तम पर्यावरण, पावसाच्या पाण्याची साठवणूक, पाण्याचे संवर्धन अशा सगळ्या बाबतीत प्रशिक्षित केले जात आहे. तसेच या गावातील मुलींची खेळातील प्रगती बघून, त्यांच्याकरिता कुस्तीची मॅट घेण्यात आली आणि कुसुंबीच्या मुली आता जिल्हा स्तरावर कुस्तीचे सामने खेळतात.

मुतनुर आणि कुसुंबी यांची गेल्या दोन वर्षांत झालेली ही प्रगती बघून आजूबाजूची गावेही ‘पंचम प्रकल्प’ त्यांच्या गावात कसा आणता येईल, याची चौकशी महाराष्ट्र फाउंडेशनकडे करू लागली आहेत. अशी उत्सुकता या प्रकल्पाबाबत निर्माण होणे आणि आजूबाजूच्या गावांनी त्यातून प्रेरणा घेणे हेच महाराष्ट्र फाउंडेशनचे मोठे यश आहे.

या वर्षी, २०२४मध्ये आंबे-पिंपरवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे हे आदिवासी गाव आणि सतकोंडी, जि. रत्नागिरी या दोन गावांचा समावेश पंचम प्रकल्पात करण्यात आला आणि ह्या दोन्ही गावांत स्त्री आरोग्य, प्रौढ शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन असे उपक्रम चालू केले आहेत. तसेच फाउंडेशनचे भूतपूर्व अध्यक्ष दिवंगत श्री. शिरीष गुप्ते यांच्या स्मरणार्थ कोकणातील एक शाळा ग्रीन कॅम्पस म्हणून रूपांतरित करण्याची योजना आखली आहे.

आम्हाला विश्वास आहे की, महाराष्ट्र फाउंडेशनचे हितचिंतक आणि देणगीदार पंचम प्रकल्पाचा विस्तार करण्याकरिता आमच्या पाठीशी कायम उभे राहतील.

**विवेक पाटणकर**
अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)
president@maharashtrafoundation.org
+1 732-692-0275

## मनोगत



नमस्कार,

सर्वप्रथम साहित्य पुरस्कार विजेते आणि समाजकार्य पुरस्कार विजेते यांचे सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशनकडून मनापासून अभिनंदन.

१९९४ साली सुरू झालेल्या साहित्य पुरस्कार योजनेला यंदा तीस वर्षे पूर्ण झाली. पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्राचा अभिमान अमेरिकेत राहणाऱ्या सुनील देशमुख यांच्या मनात होताच. विधायक कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था; समाजाला वेगळी दिशा दाखवणारं, काळाच्या पुढे जाणारं साहित्य याबद्दल त्यांच्या मनात विशेष प्रेम होतं. त्यातून त्यांच्या एक हाती देणगीतून उभी राहिलेली ही योजना. आमच्या देशात आणि इकडे समविचारी लोकांना एकत्र आणून तीस वर्षांपूर्वी सुरू झालेल्या योजनेला समाजात आता प्रतिष्ठा लाभलेली आहे.

दुर्दैवाने सुनील देशमुख आज आपल्यात नाहीत, मात्र सुरुवातीपासूनच या कार्याशी जोडले गेल्यामुळे, त्यांना अभिप्रेत असलेली सामाजिक कार्याची तळमळ, चौकटी बाहेर जाऊन समाजाला वेगळे विचार देणारे साहित्य हे लक्षात घेऊनच आम्ही या पुरस्कारांची निवड करतो. इथल्या – अमेरिकेतल्या पुरस्कार निवड समितीतील माझे सारे वाचनप्रेमी सहकारी तेवढ्याच उत्साहाने पुस्तकांचे वाचन करत असतात. आपली मते मांडत असतात. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील निवड समितीचा आणि अमेरिकेतल्या निवड समितीचा मेळ साधण्याचा, समन्वय साधण्याचा माझाही उत्साह दर वर्षी द्विगुणित होत असतो.

इथं सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्काराच्या अध्यक्ष प्रतिभा देशमुख यांच्याविषयी थोडं सांगणं आवश्यक आहे. सुनील देशमुख यांच्या मनातील विचारांची वादळं जाणून, समाजाला पुढे नेण्यासाठी केलेला त्यांचा प्रयत्न शांतपणे समजून घेऊन त्यांनी एवढे मोठे आर्थिक बळ पुरवले. सुनील देशमुख यांना त्यांच्या पत्नी प्रतिभा देशमुख यांची कायमच खंबीर साथ लाभली. आज - सुनील देशमुख हयात नसतानाही - ही माझी मैत्रीण प्रतिभा प्रेमाने आणि जिव्हाळ्याने या पुरस्कार योजनेच्या पाठीशी उभी असते.

मात्र तीस वर्षांपूर्वी सगळीकडे असलेली सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती, त्यावेळची वैचारिक विचारधारा आणि तीस वर्षांनंतर यात झालेले आमूलाग्र बदल हे थक्क करणारे आहेत. काही बदल चांगले झाले. तंत्रज्ञानाची वेगाने प्रगती झाली. त्यातून अनेकांचं राहणीमान उंचावलं. पण त्याच वेळी याच तंत्रज्ञानाचा अतिवापर, गैरवापर करून समाजाला

मागे ढकलण्याचे, फक्त भूतकाळात त्याला गुंतवून ठेवण्याचे प्रयत्न सतत सुरू झाले.

आज मी ज्या देशात राहते त्या स्वत:ला पुढारलेल्या म्हणणाऱ्या देशात स्त्रियांचे मूलभूत अधिकारच काढून घेतले आहेत. मात्र याचं समर्थन करण्यात दुर्दैवाने स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहेच. सगळे जगच वेगाने एका बाजूला झुकते आहे की काय, असे वाटते. असत्याला सत्याचा मुलामा देऊन तेच जनमानसात सजवले जात आहे. समाजमानसात इतर वर्णांबद्दल, पंथांबद्दल, धर्मांबद्दल भीती निर्माण करून त्यांच्या मनात सतत द्वेषाची, असुरक्षिततेची भावना खदखदत ठेवून, राज्यकर्ते सत्ता मिळवणं आणि ती बळकट करणं, एवढंच करीत आहेत.

मात्र अशा गोंधळलेल्या अवस्थेतही जिवाची बाजी लावून स्वत:ला सामाजिक कार्यात झोकून देणारे कार्यकर्ते आणि संस्था आजही उभ्या आहेत. समाजातल्या तळागाळातल्या लोकांची दु:खं समजून घेऊन त्यांना शिक्षणाची, आर्थिक स्वावलंबनाची वाट दाखवत आहेत. विवेकवादाचा जागर करून लोकांच्या मनातली अंधश्रद्धेची भूतं काढून टाकत आहेत.


साहित्यिक आपल्या लेखनातून वैचारिक भूमिका मांडत समाजाच्या विचारांना चालना देणारे साहित्य निर्माण करत आहेत. तर आजच्या या काळात आपण समविचारी लोकांनी एकत्र येऊन, सामाजिक बांधीलकीला प्रोत्साहन देऊन, समाजाची दु:खं जाणून सत्याचा आणि विवेकाचा जागर करू या.

बस, एवढेच.

**शोभा चित्रे**
साहित्य व समाजकार्य पुरस्कार अमेरिकेतील निवड समितीच्या अध्यक्ष
shobha_chitre@hotmail.com
+1 (240)486-1256

## ‘मासूम’चे मनोगत





आज एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करायची आहे.

२०२४च्या सुरुवातीपासूनच महिलांवर भीषण लैंगिक अत्याचार झालेले आहेत. त्याचप्रमाणे महिलांबाबत मित्र, प्रियकर किंवा नवऱ्याकडून होणाऱ्या भीषण हिंसेच्या आणि खुनाच्या बातम्या वाचून आपण सर्व हादरून गेलो आहोत. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल एकीकडे हळहळ आणि संताप व्यक्त केला जातो आहे, तर दुसरीकडे नुकत्याच अतुल सुभाष नावाच्या युवकाने केलेल्या आत्महत्येच्या दु:खद घटनेनंतर ‘समस्त पुरुषवर्ग कसा धोक्यात आला आहे’, ‘पुरुषांचा नरसंहार (male genocide) होतो आहे’, ‘महिलांच्या बाजूने असलेल्या कायद्यांचा प्रचंड गैरवापर होतो आहे’, अशा पद्धतीच्या नवनव्या जोरदार मांडण्या पुढे येत आहेत.

भारतातील स्त्रीवादी चळवळ शासनाकडून आणि कुटुंबाकडून होणाऱ्या हिंसेविरुद्ध १९७०च्या दशकापासूनच संवेदनशील आणि सक्रिय राहिलेली आहे. स्त्री अभ्यास केंद्रे, कायद्यांमध्ये बदलाची मागणी आणि मोहिमा, आंदोलने, मोर्चे, तसेच जमिनी पातळीवरील रचनात्मक काम अशा अनेक अंगाने महिला संघटना आणि स्त्रीवादी कार्यकर्त्या आज पन्नास वर्षांनंतरसुद्धा अविरत काम करत आहेत. मुलींची शैक्षणिक पोहोच वाढणे, त्यांना सहजरीत्या घराबाहेर पडता येणे यामुळेच शक्य झाले आहे. आज महिलांचे आपल्या हक्कांची मागणी करण्यासाठी आवश्यक असणारे सबलीकरण शक्य झालेले आहे. अनेक समूहांच्या हक्कांसाठी (उदा. विकलांग महिला, LGBTIQ+ व्यक्तींचे अधिकार, वेश्या व्यवसायात असलेल्या महिला व पारलिंगी व्यक्तींचे अधिकार, अल्पसंख्य व दलित महिलांचे विशेष प्रश्न आणि अधिकार) स्त्रीवादी चळवळीतील अनेक कार्यकर्त्या सजग राहिल्या आहेत.

गेल्या काही दशकांमध्ये वाढती सामाजिक विषमता, उपभोगवाद, जाती आणि धर्मावर आधारित हिंसक अस्मितेचे राजकारण आणि वाढती आर्थिक असमानता यांमुळे हिंसाचाराच्या जुन्या आणि पारंपरिक प्रकारांचे उच्चाटन करणे कठीण होऊन गेले आहे. उलटपक्षी नव्या प्रकारच्या हिंसाचारांचे आविष्कार बघायला मिळत आहेत. अत्यंत क्रूर छळ, बलात्कार, तसेच घरातील वयस्कर व्यक्तींवर होणारी हिंसा उघडकीस येत आहे. ज्या ठिकाणी बाथरूम-संडासची सोय नाही त्या ठिकाणी ‘बाहेर न्यावं लागू नये’ म्हणून आईवडिलांना उपाशी ठेवणे, जिथे घरातील सर्वच मजुरीसाठी बाहेर पडतात त्यावेळेस आई-वडिलांना घराबाहेर बसायला

लावणे किंवा काही वेळेस चक्क रस्त्याच्या कोपऱ्यावरती भीक मागायला बसवणे इथपासून ते मध्यमवर्गीय आई-वडिलांचा छोटेखानी फ्लॅट विकून नवा प्रशस्त फ्लॅट स्वत:च्या नावावर करून घेणे असे सर्रास बघायला मिळते. महिन्याच्या सुरुवातीस बँकेमध्ये आईला चांगली साडी गुंडाळून घेऊन जाणे आणि वडिलांच्या अथवा तिच्या स्वत:च्या पेन्शनसाठी लिव्हिंग सर्टिफिकेट दाखवून आणि बारा महिन्यांच्या चेक्सवर सह्या घेऊन (अनेक वेळेला सकाळपासून चहा सुद्धा न प्यायलेल्या) पालकांना बँकेच्या बाहेर सोडून जाणारी मुलंसुद्धा पाहण्यात येतात. 'आपलेच दात आणि आपलेच ओठ' अशा परिस्थितीत अडकलेल्या आईवडिलांची दीन अवस्था बघवत नाही.

आणखी एक नवा हिंसाचार म्हणजे सोशल मीडिया मार्फत होणारे शोषण आणि आर्थिक फसवणूक. कमावत्या महिलेने लग्नाचे वचन देणाऱ्या पुरुषाला प्रेमापोटी भारीभक्कम पैसे पाठवणे, अशा फसवणुकीच्या बातम्या सर्रास आपल्या वाचनात येतात. हा प्रकार तिला घरच्या कोणाला सांगताही येत नाही. तरुण पिढीमध्ये 'तुझं माझ्यावरती प्रेम असेल तर मला तू नग्न फोटो पाठव, नाहीतर रात्री मला झोप येणार नाही', अशा विनवणीला मुलींनी बळी पडणे, तसेच बाहेर फिरायला गेलेले असताना फोटो, व्हिडियो किंवा सेल्फी काढून, नातं संपुष्टात आल्यावर प्रेयसीचे सगळे फोटो पब्लिक करणे हे आता सर्वदूर दिसून येत आहे. तसेच, 'तू कुठे आहेस याची मला काळजी वाटते म्हणून तू कायम जीपीएस लाईव्ह ठेव', अशी मागणी करून 'तू त्याच ठिकाणी दहा मिनिटे उभी का राहिली होतीस किंवा माझा फोन तू लागलीच का घेतला नाहीस?' यावरून मैत्रिणीला मारहाण करणारे 'शूर' मित्र समाजात दिसू लागलेले आहेत. समाजमाध्यमांच्या जंगलामध्ये आपण आपल्या मुलींना सुरक्षित कसे ठेवायचे, यावर आपल्याला विचार करावा लागेल. अर्थात, तिच्याकडून मोबाईल काढून घेणे, तिला सोशल मीडियावर जाण्याची बंदी घालणे हे उपाय योग्यही नाहीत आणि ते चालणारही नाहीत. मुलींना 'सेफ निगोसिएशन ऑफ स्पेसेस' करण्यासाठी सबल करणे आवश्यक आहे.

घराच्या बाहेरील, अनोळखी व्यक्तींकडून होणाऱ्या हिंसाचाराबद्दल बोलणे त्यामानाने सोपे असते. त्याबाबत (आणि विशेष करून 'खालच्या' पुरुषाकडून 'वरच्या' महिलेवर होणाऱ्या लैंगिक हिंसाचाराबद्दल) समाजात आता बोलले जात आहे. अशा वेळेस बलात्कार करणाऱ्याचा लागलीच एनकाउंटर करून टाकावा, त्याचे लिंग छाटून टाकावे, त्याला भर चौकात फाशी द्यावी, त्याला ठेचून मारावे असे रक्तपिपासू पर्याय सुचवले जातात. एक लक्षात घ्यायला हवं, न्याय्य पद्धतीने प्रक्रिया पुढे गेली/नेली नाही, तर श्रीमंत आणि सत्ताधारी व्यक्तींच्या ऐवजी एखाद्या वंचित समूहातील व्यक्तीला पुढे करून पुरावे तर नष्ट केले जातीलच, पण ओळखीच्या किंवा मातब्बर व्यक्तींकडून केला गेलेला बलात्कार कधीही समोर न येण्याची शक्यतासुद्धा वाढेल. घराच्या आत, नात्यामधील पुरुषांकडून किंवा इतर जवळच्या व्यक्तींकडून होणारा लैंगिक आणि शारीरिक हिंसाचार stranger-danger पेक्षा अनेक पटीने जास्त असतो. जागतिक पातळीवर झालेल्या अभ्यासातून ८०% बलात्कार, संशयास्पद मृत्यू तसेच मारहाण हे कुटुंबीयांकडून किंवा विश्वासातल्या व्यक्तींकडून होत असतात, असे निदर्शनास आले

आहे. घराच्या आतील हिंसाचाराबद्दल बोलणे लहान मुली, मुलगे आणि महिलांना सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक कारणांमुळे जवळपास अशक्यप्राय होते. म्हणून त्याबद्दल बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे आपल्या कामाचा भाग असला पाहिजे. बलात्कार करणाऱ्याशी लग्न करून देणे असे 'पितृसत्ताक पर्याय' तर जागीच खोडून टाकायला हवेत!

हिंसा ही केवळ शारीरिक नसते हे आपल्याला माहितीच आहे. ती भावनिक, लैंगिक, आर्थिक आणि मानसिक असू शकते. अनेकदा या हिंसांचे मिश्रण आपल्याला बघायला मिळते आणि या हिंसाचाराचे आयुष्यभर विपरीत परिणाम होत असतात, म्हणूनच आपला हिंसेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. तिला देण्यात येणार प्रतिसाद हा बहुआयामी असणे गरजेचे असते. समुपदेशन, पोलीस, कोर्ट, आरोग्य यंत्रणा, महिला संघटनांचे गावामध्ये किंवा वस्तीमध्ये थेट हस्तक्षेप, तसेच कायद्यामध्ये योग्य ते बदल हे सुद्धा आवश्यक ठरतात. बालपणापासून घरातील लिंगभेद नाकारणे, युवा पिढीबरोबर काम करणे आणि अहिंसक पद्धतीने समस्या सोडविण्यास प्रवृत्त करणे हे तितकेच महत्त्वाचे.

घराच्या आत हिंसाचारी पुरुष निर्माण केला गेला तर घराबाहेर त्याची हिंसक प्रवृत्ती वाढणारच. त्या उलट घराबाहेर हिंसा, बलात्कार, मारहाण, खून करणारा पुरुष घराच्या आत तीव्र प्रकारच्या हिंसा करणार यात शंका नाही. म्हणूनच एकीकडे या दोन्ही ठिकाणी पुरुषांनी हिंसा करू नये, असा प्रयत्न करायला हवा. दुसरीकडे महिलांनी, पारलिंगी व्यक्तींनी आणि मुलांनी, तसेच जातवर्गाच्या उतरंडीवर वंचित असलेल्या पुरुषांनी हिंसा सहन करू नये, अशी समाजरचना घडवणे आवश्यक आहे. या पलीकडे जाऊन स्त्री-पुरुष संबंध हे प्रेम, मैत्री या मूल्यांवर आधारित असावेत, यासाठी निरंतर काम करणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

यंदाच्या वर्षी महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराबद्दल सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आपल्याला डॉ. मीरां चड्ढा-बोरवणकर या निर्भय, सत्यप्रेमी आणि कर्तव्यदक्ष माजी पुणे पोलीस निरीक्षक आणि महाराष्ट्राच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या आहेत, ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

स्नेहांकित,

**डॉ. मनीषा गुप्ते व डॉ. रमेश अवस्थी**
संस्थापक आणि सहसमन्वयक
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM – मासूम)
masumpune.mfa@gmail.com

**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM - मासूम)**
४२ - बी१, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११ ०२८
दूरध्वनी : ०२०-२६९९५६२५/२६९९५६३३

# सुनील देशमुखांची सामाजिक बांधीलकी



माझ्या सामाजिक जीवनातील एक अतिशय महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्र फाउंडेशनचे साहित्य पुरस्कार. मराठी भाषेवरील प्रेमामुळे सुनील देशमुख या माझ्या मित्राने हे पुरस्कार सुरू करावेत, असे सुचवले होते. पण 'मराठी भाषेवरील प्रेम' हे एकमेव कारण नव्हते, तर सुनीलला अभिप्रेत होती ती महाराष्ट्रातील पुरोगामी आणि वैचारिक साहित्याची सकस परंपरा.

१९९३ साली मी महाराष्ट्र फाउंडेशनचा अध्यक्ष असताना, सुनील देशमुख याने या योजनेचा प्रस्ताव माझ्यासमोर मांडला. त्याचे गाभ्याचे शब्द आजही माझ्या मनात जसेच्या तसे कोरलेले आहेत. सुनील म्हणाला होता, 'महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, र. धों. कर्वे यांच्या पुरोगामी लिखाणामुळे मराठी समाजाला एक दिशा मिळाली. या परंपरेला मानणाऱ्या, त्यावरून वाटचाल करणाऱ्या नव्या गुणवंत लेखकांचा शोध घेऊन त्यांचा गौरव करण्याची गरज आहे. आणि ही योजना त्यासाठी आहे. या आपल्या पुरस्कारांमुळे नव्या लेखकांना उत्तेजन मिळेल. महाराष्ट्राची पुरोगामी वाटचाल तशीच दिमाखाने आणि डौलाने पुढे अव्याहतपणे चालू राहील, अशी अपेक्षा आहे.'

याच विचारसरणीने भारलेले आणि दूरदृष्टीचा वारसा असलेले हे स्वप्न साकारले जावे यासाठी या पुरस्कार योजनेची संकल्पना एक अनोखी अनुभूती म्हणून मी स्वीकारली. महाराष्ट्रातील प्रगतिशील विचारांना पुढे नेणारे, दलित-वंचित समाजाच्या अभिव्यक्तीचा सन्मान करणारे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजातील सर्वांना व्यापक दृष्टी देणारे हे साहित्यिक पुरस्कार म्हणजे सुनीलच्या सहृदयतेचे प्रतिबिंब होते. त्यासाठी त्याने भरघोस देणगीही दिलेली होती. सुनीलच्या या विचारांनी आमचा परस्परांशी असलेल्या नात्यातला स्नेह वृद्धिंगत केला आणि आम्ही या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेण्याचा संकल्प सोडला.

त्याच क्षणी सुनीलची आणि माझी मैत्री 'अरे तुरे'वर आली, हे मी माझे भाग्य समजतो. ह्याच मैत्रीच्या नात्याने आम्ही दिगंबर पाध्येला भेटलो. प्रा. दिगंबर पाध्ये हे मराठीतले मोठे समीक्षक होते, याची मला नम्र जाणीव आहे. पण त्याचबरोबर तो माझा वर्गमित्रही होता, त्याला काय करणार? त्यामुळे त्याला 'अहो-जाहो' करणे फारच कृत्रिमपणाचे ठरेल. दिगंबर, सुधीर पानसे आणि मी तिघेही त्या काळात वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेणारे. काही वेळा पुरस्कारही आणणारे. आम्ही एखादा विषय घेऊन आपापसांत तास न् तास गप्पा मारत असू. तर असा हा दिगंबर पाध्ये 'लोकवाङ्मय गृहा'च्या प्रकाश विश्वासरावांना आणि सतीश काळसेकरांना

घेऊन आला होता. आम्ही सर्व या कार्याला पुढे न्यायला, यशस्वी करायला उत्सुक होतो. ह्याच विचाराने आमचे समविचारी सुधीर पानसे, नितीन दादरावाला, षांताराम पवार अशी गुणी माणसे आणि त्यांनी बरोबर आणलेली याच विचारांची कितीतरी माणसेसुद्धा या योजनेत सहभागी झाली. गोरेगावच्या केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या चंद्रकांत केळकरांचाही आवर्जून उल्लेख करायला हवा. मृणाल गोरेंच्या बरोबरीने ते आमच्या मदतीसाठी पुढे आले. या योजनेत सहभागी झालेली प्रत्येक व्यक्ती स्वयंसेवकाच्या भावनेने आणि वृत्तीने या कार्यात सहभागी झालेली होती. अशी मोलाची माणसे मिळणे हे ह्या योजनेचे भाग्य होते, आजही आहे. आज त्यांच्यापैकी कितीतरी माणसे काळाच्या पडद्याआड गेली, ही भावना मनाला व्याकुळ करून जाते. सुनील देशमुख हा माझा मित्रही निघून गेला.

या योजनेसाठी दिगंबर पाध्ये याने मान्यवर साहित्यिकांची शिफारस समिती भारतात नेमली. त्याचबरोबर अमेरिकेत दिलीप वि. चित्र्यांनी निवड समिती स्थापन केली, ज्यात सर्वांनी पारदर्शकतेला उच्च प्राधान्य दिले. आजपर्यंत, हा प्रघात अबाधित आहे हे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. यातील इथली काय किंवा अमेरिकेतली काय, सारीच मंडळी साहित्याची उत्तम जाण असणारी होती. नव्या साहित्याबद्दल आस्था बाळगणारी होती. उत्सुकतेने नवे साहित्य समजावून घेणारी होती.

सुनीलची दुसरी महत्त्वाची इच्छा होती की, या पुरस्कारांचा प्रभाव व्यापक असावा. त्यासाठी पुरस्काराची रक्कमही मोठी असावी. त्यामुळे समाजाच्या सर्व स्तरांत या पुरस्कारांचा




प्रकाश विश्वासराव

दरारा टिकून राहील. परिणामी, पहिल्याच पुरस्कार वितरण समारंभाला असाधारण प्रतिसाद मिळाला. रवींद्र नाट्यमंदिरात झालेल्या या सोहळ्यात मे. पु. रेगे, नारायण सुर्वे या थोर साहित्यिकांनी हा सन्मान स्वीकारला.

त्यांच्या बरोबरच आ. ह. साळुंखे, रंगनाथ पठारे, रंगनाथ पाटील, भाऊ पाध्ये, अनुराधा पाटील या साहित्यिकांनाही ग्रंथ पुरस्कार मिळालेला होता. त्या वेळची आमची ही निवड किती अचूक होती पाहा. यातल्या रंगनाथ पठारे यांना दोनच वर्षांपूर्वी (२०२२ सालचा) जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. आणि आज तोच पुरस्कार (२०२४ साली) आपण थोर पुरोगामी विचारवंत आणि साहित्यिक आ. ह. साळुंखे यांना देत आहोत. सुरुवातीला 'पॉप्युलर प्रकाशन'ला हा पुरस्कार मिळाला आणि त्याचबरोबर तो 'नवभारत', 'आजचा सुधारक' आणि 'मराठी संशोधन पत्रिका' या नियतकालिकांनाही मिळाला.

सुनील वॉल स्ट्रीटवरून सेवानिवृत्त होऊन आता पूर्णपणे सामाजिक कार्याची दखल घेऊ लागला होता. काही वर्षांनंतर सुनील, हृषिकेश आणि अरुंधती विनोद यांनी पुरस्कार योजनेचा विस्तार सामाजिक कार्यासाठी करण्याची कल्पना मांडली. विनोद दांपत्याने या कार्यासाठी वार्षिक देणगी देण्याचेही वचन दिले. त्यामुळे साहित्य पुरस्कारानंतर दोनच वर्षांत त्याने सामाजिक कार्यासाठीचे पुरस्कारही सुरू केले होते. साहित्याबरोबरच समाजकार्याच्या क्षेत्रातही त्याच तळमळीने पुरस्कार देण्यात आले. समाज प्रबोधन, स्त्री-प्रश्न, पर्यावरण संतुलन यांसारख्या ज्वलंत आणि जागरूक कार्यांचा सन्मान या योजनेने केला. नरेंद्र दाभोलकरांच्या



सुनील देशमुख आणि दिगंबर पाध्ये

‘अंधश्रद्धा निर्मूलन संस्थे’चे कार्य त्याने अमेरिकेतही पोहोचवले. प्रतिगामी शक्तींनी ज्या पद्धतीने दाभोलकरांचा खून केला, तो पाहता दाभोलकरांचे कार्य किती बिकट होते, हे लक्षात येते. सामाजिक कार्यांच्या पुरस्कारांमध्ये आजवर बाबा आढाव, कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, लोकविज्ञान संघटना, लीला पाटील (कोल्हापूर), रझिया पटेल, सुरेखा दळवी (पेण), डॉ. राम पुनियानी (मुंबई), उल्का महाजन (रोहा), ई आंबेडकर अकादमी (सातारा), नागनाथ अण्णा नायकवडी, गजानन खातू, बिंदुमाधव खिरे, रयत शिक्षण संस्था, हरी नरके, जमीला बेगम पठाण इताकुला (मुंबई), निशा शिवुरकर (असंघटित, कष्टकरी महिला).... अशी किती नावे घ्यावीत!

महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातल्या सामाजिक कार्यकर्त्यांचा आणि लिहिणाऱ्यांचा शोध घेणाऱ्या माणसांची निवड समिती बनवली जाते. आपल्या पुरस्कार योजनेच्या गेल्या ३० वर्षांच्या या प्रवासाने मराठी साहित्यविश्वात वैविध्याची, विचारशीलतेची आणि नवीन दृष्टिकोनांची उधळण केली. कथा-कादंबरी-कविता यांसारखे ललित साहित्य, वैचारिक लेखन, आत्मचरित्रासारखे अपारंपरिक साहित्य, नाटक अशा सर्व क्षेत्रांत नवनवीन वाटा शोधत राहण्याचे ध्येय या योजनेने उराशी बाळगले. पाडगावकरांच्या ‘कबीर’पासून ते रावसाहेब कसब्यांच्या ‘हिंदू-मुसलमान प्रश्ना’पर्यंत, या पुरस्कारांनी विविधतेचा सन्मान केला.

साहित्य क्षेत्रातल्या जीवनगौरव पुरस्कारांची नुसती यादी जरी पाहिली तरी आपल्याला आश्चर्य वाटेल. विंदा करंदीकर, मालतीबाई बेडेकर, विजय तेंडुलकर, बाबूराव बागूल, वि. भि.



सौ. पानसे, सुधीर पानसे, सुनील देशमुख

कोलते, मे. पुं. रेगे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, गो. पु. देशपांडे, भालचंद्र नेमाडे, श्याम मनोहर, वसंत आबाजी डहाके, महेश एलकुंचवार, रंगनाथ पठारे.... अशी किती नावे घ्यावीत! या पुरस्कारांनी रा.भा. पाटणकर, कुमार केतकर, सुरेश द्वादशीवार, मंगेश पाडगावकर यांसारख्या विविध विचारधारांच्या श्रेष्ठ साहित्यिकांनाही जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. या विविधतेला आणि सर्जनशीलतेला पुरस्कारांनी दिलेला प्रतिसाद भविष्यातील साहित्यप्रेमींसाठी नवा पायंडा ठरणारा आहे. समाजाचे आणि वाचनसंस्कृतीचे उत्थान घडवणारे हे पुरस्कार केवळ सन्मान नव्हते, तर नवीन विचारांची आणि नवनवोन्मेषाची प्रेरणा देणारे ते एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरले.

सुरुवातीच्या काळातील गोष्ट. मी भालचंद्र नेमाडे यांचा चाहता होतो. पण ते त्या काळात समाजात फारसे मिसळत नसत. मला तर त्यांना भेटण्याची जबरदस्त उत्सुकता होती. अखेर फोनवर आमची भेट प्रकाश विश्वासराव यांनी घडवून आणली. ती शब्दभेट आजही जशीच्या तशी माझ्या स्मरणात आहे. या पुरस्कार योजनेने मला दिलेला हा फार मोठा पुरस्कार आहे.

सुनील, दिगंबर आणि विश्वासराव ह्या त्रिमूर्तींनी या कार्याला वेगळे आयाम दिले. त्याबद्दल माझे विचार कधीकधी ढगाळ होतात, कारण ते तिघेही माझे फार जवळचे मित्र होते. त्यांच्या या योगदानाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. आजही मासूम संस्थेचे मनीषा गुप्ते आणि रमेश अवस्थी, 'साधने'चे संपादक विनोद शिरसाठ, मुकुंद टाकसाळे आणि शोभा चित्रे त्याच निष्ठेने हा कार्यध्वज पुढे नेत आहेत, ही माझ्या दृष्टीनेच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या दृष्टीने अत्यंत समाधानाची बाब आहे.

माझी एकच इच्छा आहे की, पुढील पिढी हे कार्य अमेरिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांतही पसरवेल. सोशल मीडियासारख्या नवतंत्रज्ञानाच्या मदतीने हे अभियान जागतिक स्तरावर पोहोचावे, ही माझी मनापासूनची अपेक्षा आहे.

जगातल्या सर्व अभिजात कलाकृती अमर असतात.
आपली साहित्यिक आणि सामाजिक चळवळ ही तितकीच अभिजात आहे.
लहानशी का होईना, ध्येयवादी विचारांची शिदोरी,
चिरंतन राहो ही आमुची निखळ इच्छा खरोखरी।

**राजन गडकरी**
न्यू जर्सी
rajangadkari@gmail.com
+1 (917)891-1499

# डॉ. मीरां चड्डा-बोरवणकर : कणखर आणि संवेदनशील 'सुपरकॉप'



'लहानपणापासूनच पोलिसांच्या वर्दीचे आकर्षण वाटायचे' असे सांगणाऱ्या डॉ. मीरां चड्डा-बोरवणकर भारताच्या राष्ट्रीय पोलीस अकादमीच्या १९८१ सालच्या बॅचमधून पदवीधर झालेल्या एकमेव महिला होत्या! महाराष्ट्रातील एक प्रामाणिक, लोककेंद्री आणि धडाडीच्या पोलीस अधिकारी असे त्यांचे वर्णन करता येईल. त्यांना 'सुपरकॉप' म्हणूनही ओळखले जाते.

डॉ. मीरां यांचे सुरुवातीचे शिक्षण पंजाबमधील फाजिल्का येथे झाले. त्यांचे वडील ओ. पी. चड्डा हे पंजाब पोलीस दलात आणि नंतर सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) होते. वडिलांच्या बदलीमुळे मीरां यांचे पुढील शिक्षण जालंधर येथे झाले. इतिहास, तत्त्वज्ञान, इंग्रजी साहित्य अशा वेगवेगळ्या विषयांचा तसेच कायद्याचाही अभ्यास त्यांनी केला. संस्थात्मक व्यवस्थापन या विषयात डॉक्टरेट पदवी मिळवली.

आयपीएस प्रशिक्षणामध्ये एकटी महिला अधिकारी असण्याच्या अनुभवाबद्दल त्या सांगतात, 'एक महिला, पोलीस अधिकारी म्हणून यशस्वी होणार नाही, ही काही सहकाऱ्यांची समजूत खोडून काढण्यासाठी माझा संघर्ष सुरू होता आणि हा संघर्ष पोलीस दलात रुजू झाल्यापासून पुढे १० ते १५ वर्षे सुरू होता.' एक स्त्री हे करू शकते, हे मान्य व्हायला इतका काळ लागला. पुढे काम करत असतानाही काही वेळा केवळ स्त्री असल्यामुळे भेदभाव, वरिष्ठांकडून विश्वास न ठेवणे असे अनुभव त्यांना आले. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने त्याला उत्तरेसुद्धा दिली.

डॉ. मीरां यांनी महाराष्ट्र पोलीस आणि सीबीआयमध्ये वेगवेगळ्या भूमिकांमध्ये काम केले आहे. त्यांचा महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या शहरांत तसेच ग्रामीण भागांत ३६ वर्षे कामाचा अनुभव राहिला आहे. या सर्व काळात त्यांना नागरिकांचा खूप विश्वास मिळाला आणि तो कायम सोबत राहिला, असे त्या सांगतात.

आपल्या कारकीर्दीमध्ये त्यांनी अनेक धाडसी निर्णय अतिशय निर्भयपणे घेतले. मुंबईतील माफिया राजवट संपवून त्यांच्यात पोलिसांची दहशत निर्माण करण्यामध्ये मीरां यांची भूमिका महत्त्वाची होती. त्या पुण्याच्या आयुक्त असताना येरवडा येथील पुणे पोलिसांची जमीन एका बिल्डरला देण्यासाठी त्यांच्यावर राजकीय नेत्यांकडून दबाव आणला गेला. त्या परिस्थितीतही त्यांनी दबावाला न जुमानता जमीन बिल्डरला न देण्याचा निर्णय घेतला. परिणामी, त्यांना नक्की मिळू शकले असते ते सी.आय.डी. पोस्टिंग मिळाले नाही. पण आपल्या निर्णयावर त्या शेवटपर्यंत ठाम राहिल्या.

त्यांनी १९९४ साली जळगावमध्ये शाळा-कॉलेजातल्या मुलींना वेश्या व्यवसायात ढकलण्याचे सेक्स रॅकेट उघडकीला आणले. समाजात वेश्यांकडे 'चुकीचे' काम करणाऱ्या म्हणून सामान्यपणे बघितले जाते. पण त्यांच्याकडे शोषित म्हणून बघण्याची, त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर कृती करण्याची गरज डॉ. मीरां यांना त्यांच्या या कामातून उमजली. यापुढेही मानवी तस्करीच्या विषयावर काम करण्याची त्यांची इच्छा असल्याचे त्या सांगतात. २०१३पासून २०१५पर्यंत त्या महाराष्ट्र कारागृह विभागाच्या प्रमुख होत्या. या काळात त्यांनी अनेक सुधारणा प्रत्यक्षात आणल्या. कारागृहात कैद्यांच्या शिक्षेपेक्षा त्यांच्या सुधारणेवर आणि सकारात्मक बदलांवर भर देणारा असा त्यांचा वेगळा दृष्टिकोन आपल्याला दिसतो.

प्रत्येक निर्णय घेताना 'आपण राजकारण्यांना उत्तरदायी आहोत की नागरिकांना?' असा प्रश्न त्या स्वत:ला विचारत. अंगावर चढवलेली वर्दी ही लोकांसाठी असल्यामुळे त्यांच्या हिताचे काय आहे, यावर आधारित सर्व निर्णय त्यांनी घेतले. नागरिकांचे संरक्षण करण्यावर भर दिला. पोलीस सेवेचा भाग म्हणून आपण संविधानाला उत्तरदायी आहोत हे विसरता कामा नये, असे त्या सांगतात. बहुतेक वेळा पोलीस प्रशिक्षणामध्ये कायदेशीर आणि तांत्रिक बाबींवर अतिरिक्त भर दिला जातो, तितकाच भर संविधान आणि त्यातील मूल्यांवर दिला जावा. संविधान हे प्रशिक्षणापासूनच प्रत्येकामध्ये रुजायला हवे, असा महत्त्वाचा मुद्दा त्या मांडतात.

पोलीस सेवेमध्ये आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील राहिल्या आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पुरेशा संख्येने महिला पोलीस असाव्यात, अशी मागणी त्यांनी लावून धरली. महिला दिनानिमित्त फक्त महिला पोलिसांनी पोलीस स्टेशन्स चालवणे (all-women police stations) यासारख्या भ्रामक-लक्ष्यवेधी (गिमिक्स) उपक्रमांपेक्षा यंत्रणेमध्ये आवश्यक असलेल्या मूलभूत सुधारणा शाश्वतपणे अंमलात कशा आणता येतील, यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज त्या अधोरेखित करतात.

राज्यामध्ये एक सशक्त 'भ्रष्टाचारविरोधी विभाग' असायला हवा. प्रगतिशील, प्रामाणिक आणि पारदर्शी प्रशासनासाठी सर्वच विभागांवर दक्षतेने नजर ठेवण्याची गरज आहे, असे त्या नमूद करतात. 'पोलिसांचे कामाचे तास नियमित आणि योग्य असावेत. यामुळे नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून सच्चे काम करण्यास त्यांना मदत होईल', असाही त्यांचा दृष्टिकोन आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ, महिलांवर होणाऱ्या हिंसेबद्दल त्यांनाच दोष देणे, महिलांवर होणाऱ्या हिंसेचे सामान्यीकरण अशा पोलीस सेवेतील काही पुरुषांकडून उद्‌भवणाऱ्या प्रश्नांमध्ये परिवर्तन व्हावे, यासाठी त्या आग्रही राहिलेल्या आहेत. त्यांनी मांडलेले प्रश्न पोलीस सेवेतील महिला आजही अनुभवत आहेत, याबद्दलची खंतसुद्धा त्या व्यक्त करतात. डॉ. मीरां पोलीस सेवेत आल्या त्या काळापेक्षा आज पोलीस सेवेत असलेल्या महिलांची संख्या वाढली आहे. काही जणी तर डॉ. मीरां यांना आवर्जून भेटून सांगतात की, त्यांना कुटुंबाकडून आधार दिला जात आहे. महिलांची संख्या वाढेल तसतसे यंत्रणाही बदलेल, असा त्यांना विश्वास वाटतो. निर्भीड आणि सच्चेपणाने बोलत राहणे, कृती करणे, हिंसा किंवा

छळ झाला तर तातडीने तक्रार दाखल करणे हा मार्ग त्या पोलीस दलात काम करणाऱ्या आणि सर्वच महिलांना दाखवतात. पोलीस यंत्रणेत संवेदनशीलतेसाठी जाणीव जागृती करण्याच्या पलीकडे जाऊन यंत्रणेतील प्रत्येकाची स्त्रियांबद्दलची मानसिकता आणि दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, हे डॉ. मीरां स्पष्ट करतात. त्यांनी यंत्रणेच्या पुरुषप्रधान ढाच्याला बदलण्याचे केलेले काम बहुमोल आणि प्रेरणादायी आहे.

प्रशिक्षणामध्ये घडलेला एक प्रसंग त्या नमूद करतात. त्यांच्या शूटिंगच्या प्रशिक्षणादरम्यान डॉ. मीरां यांचा अचूक नेम बघून एका पुरुष सहकाऱ्याने 'नकळत अनपेक्षितपणेच हा नेम लागला असणार', अशी खवचट प्रतिक्रिया दिली. तेव्हा त्यांच्या प्रशिक्षकांनी काढलेले उद्गार - 'आम्ही हे कित्येक वर्षे बघत आहोत की, स्त्रियांचे हात जास्त स्थिर असतात' - हे मीरां यांना आजही आठवतात. त्याला जोडून पुढे मीरां म्हणतात, 'खरंच, स्त्रियांचे हात जास्त स्थिर असतात आणि कदाचित मनेही!' अशा प्रकारे काही सहकार्यशील आणि आश्वासक पुरुष प्रशिक्षक आणि सहकारी या प्रवासात भेटल्याचेही त्या सांगतात. संवेदनशीलता आणि कणखरपणा या दोन्ही बाबतीत महिला पोलीस अधिकारी म्हणून डॉ. मीरां यांचे वेगळेपण दिसून येते. त्या २०१७मध्ये पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या तसेच राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या महासंचालक पदावरून निवृत्त झाल्या.

'मॅडम कमिशनर' हे २०२३मध्ये त्यांनी लिहिलेले पुस्तक अत्यंत लोकप्रिय झाले. हे पुस्तक आत्मचरित्र नसून एका पुरुषप्रधान कार्यक्षेत्रामध्ये एका स्त्रीच्या कामाची, अनुभवांची आणि तिच्या एकूणच प्रवासाची नोंद आहे, हे त्या आवर्जून सांगतात. 'लीव्हज् ऑफ लाइफ' (२०१७) या पुस्तकातून त्या तरुणांना, विशेषत: तरुण मुलींना त्यांचे अनुभव सांगतात आणि अर्थपूर्ण क्षेत्र निवडून त्यांनी स्वत:चा विकास करावा, यासाठी प्रेरित करतात. 'इन्स्पेक्टर चौघुले' (२०१९) या त्यांच्या पुस्तकात पोलीस सेवेतील वास्तव सांगणाऱ्या सत्यकथा आहेत. यामध्ये त्या भारतातील गुन्हेगारी न्यायव्यवस्थेची समीक्षा करतात. पोलीस दलातील गौरवास्पद कामगिरीसाठी डॉ. मीरां बोरवणकर यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

आपल्या कामाबद्दल बांधीलकी आणि प्रामाणिकपणा (त्यांच्याच शब्दांत 'पोलीस प्रोफेशनलिझम') हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि कामाला वेगळेपण देतात. स्पष्टवक्तेपणामुळे करिअर आणि बढतीच्या बाबतीत काही नुकसान झाले असले तरीही त्याबद्दल आपल्याला कधीच पश्चात्ताप वाटत नाही, असे त्या शांतपणे सांगतात. 'जगायचे तर ताठ मानेनेच जगावे ना!' हा त्यांचा फक्त स्त्रियांनाच नाही तर सर्वांनाच संदेश आहे.

**रसिका साबळे**
rasikasav1209@gmail.com
८६००७६२५४९

# दिलीप वि. चित्रे

(जन्म - ६ मे १९४२ - मृत्यू - ३० जून २०१७)

सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशनचा साहित्यातील जीवनगौरव पुरस्कार दिलीप वि. चित्रे यांच्या नावाने दर वर्षी दिला जातो. दिलीप विष्णू चित्रे मूळचे बडोद्याचे आर्किटेक्ट. ते स्वत: उत्तम लेखक होते, कवी होते आणि नाटककारही होते. त्यांचा 'हिमगंध' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. त्यांनी गुजराती कवितांचा मराठीत अनुवाद केला आणि 'बहिष्कार' या नावाने तो कवितासंग्रह प्रसिद्ध केला. त्यांनी सुरुवातीच्या काळात 'दै. केसरी'साठी 'वॉशिंग्टनचे वार्तापत्र' आणि नंतर 'दै. लोकमत'साठी 'गोरजवेळ' ही सदरे लिहिली.


सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांबद्दल आत्मीयता असल्याने महाराष्ट्र फाउंडेशनशी त्यांचा अगदी सुरुवातीपासून संबंध होता. विशेषत: महाराष्ट्र फाउंडेशनची घटना लिहिण्याची वेळ आली तेव्हा चित्रे यांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. भारतातल्या गरजू संस्थांना मदत करताना कुठल्याही जातीय किंवा धार्मिक संस्थांना ही मदत दिली जाऊ नये, याविषयी



दिलीप वि. चित्रे

ते अत्यंत आग्रही होते. वॉशिंग्टन डी.सी., मेरिलॅन्ड भागात निधी संकलनाचे अनेक कार्यक्रम त्यांनी सुरुवातीला घडवून आणले. सुनील देशमुख यांच्या 'साहित्य पुरस्कार योजने'च्या निमित्ताने ते दोघे एकत्र आले. समविचारी असल्यामुळे त्यांची मैत्री व्हायला वेळ लागला नाही. मराठी साहित्यावरील प्रेम, महाराष्ट्र फाउंडेशनवरील प्रेम यांमुळे ते सुरुवातीपासूनच या पुरस्कार योजनेचे सक्रिय पुरस्कर्ते आणि कार्यकर्ते झाले.

१९६९पासून त्यांचे भारताबाहेर वास्तव्य होते. सुरुवातीला लंडनला आल्यावर मुकुंद सोनपाटकी यांच्या मदतीने त्यांनी तिथल्या मराठीप्रेमी लोकांना एकत्र आणले, त्यांना लिहिते केले आणि जानेवारी १९७१चा 'दीपावली' मासिकाचा 'लंडन विशेषांक' दिमाखात काढला. दिलीप वि. चित्रे १९७१ साली अमेरिकेत आले ते एका आगळ्या कल्पनेचे बीज घेऊनच. त्या काळात हळूहळू निरनिराळ्या देशांत मराठी तरुण जायला लागले होते. त्यांच्या अनुभवांवर आधारित एक कथासंग्रह काढण्याचा विचार त्यांनी मनाशी पक्का केला. त्यांच्या या विचाराला त्यांचे त्यांच्याच गावचे – म्हणजे बडोद्यातले गुरू माधव वाचवल यांनी पाठिंबा दिला. त्यांनी इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, रशिया इत्यादी देशांतल्या मराठी कथाकारांना लिहिते करून १९८५ साली 'कुंपणापलीकडचे शेत' हा २१ कथांचा संग्रह पुण्यातल्या 'श्रीविद्या प्रकाशन संस्थे'तर्फे प्रसिद्ध केला. अत्यंत परिश्रम करून त्यांनी परदेशातल्या मराठी माणसाला लिहिते



दिलीप वि. चित्रे, सुनील देशमुख

केले आणि ही मराठी साहित्याची चळवळ सुरू केली.

भारतातून अमेरिकेत गेलेल्या पहिल्या पिढीतले ते साहित्यिक होते. अमेरिकेत राहूनही त्यांना मराठी भाषेविषयी, मराठी संस्कृतीविषयी आस्था होती. अमेरिकेतल्या मातीत नव्याने मुळे रुजत असताना जी मनाची उलघाल होते, तिथे मुले वाढवताना जी कसरत करावी लागते, त्यावर त्यांनी 'अलीबाबाची हीच गुहा' हे दोन अंकी स्वतंत्र नाटक लिहिले होते. १९८८ साली फिलाडेल्फियाच्या अशोक कामेरकर यांनी त्या नाटकाचे दिग्दर्शन करून त्याचा मोठ्या उत्साहात भव्य प्रयोग सादर केलेला होता. संगीत, नृत्य, ३० ते ४० कलाकारांचा रंगमंचावर सफाईदार वावर, आकर्षक प्रकाशयोजना, भव्य स्वप्नदृश्ये ही या नाटकाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगता येतील. 'पश्चिमा' या नाट्यसंस्थेतर्फे या नाटकाचे प्रयोग न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, फिलाडेल्फिया या शहरांत झाले, त्याचबरोबर 'आविष्कार' आणि 'थिएटर अॅकॅडमी' या भारतातल्या नाट्य-संस्थांच्या मदतीने पुण्या-मुंबईतही या नाटकाचे प्रयोग झाले. मुंबईत पहिल्या जागतिक मराठी परिषदेनिमित्त जो नाट्यमहोत्सव साजरा झाला त्यात त्या काळचे लोकसत्ताचे संपादक माधव गडकरी यांनी पुढाकार घेऊन महोत्सवाची सुरुवातच या नाट्यप्रयोगाने व्हावी, म्हणून थेट अमेरिकेहून या नाटकाला पाचारण केले.


मराठी चित्रपट महामंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष सुधीर फडके यांनी मराठी चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने अमेरिकेत 'मराठी चित्रपट महोत्सव' घडवण्याची कल्पना मांडली. दिलीप चित्रे यांनी हे आव्हान स्वीकारून अमेरिकेत १९८२ साली पहिला मराठी चित्रपट महोत्सव यशस्वीपणे घडवून आणला. 'रामशास्त्री'पासून 'उंबरठा', 'आक्रित' चित्रपटांपर्यंत साऱ्या चित्रपटांची सबटायटल्ससहित रिळे आणवली. ती अमेरिकेतल्या विविध स्थळी फिरवली. हा महोत्सव भरवणे मुळीच सोपे नव्हते. त्या काळात दिलीप वि. चित्रे यांच्या अंगी भरपूर उत्साह होता. त्यांनी पद्धतशीर नियोजन करून हा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडला.

दिलीप वि. चित्रे यांचे अमेरिकेतले-मेरिलॅन्डमधील घर हे महाराष्ट्रातून तिथे जाणाऱ्या साहित्यिकांचे, कलाकारांचे हक्काचे घर होते. त्या काळात त्यांच्या घरच्या अगत्याचा अनुभव घेतलेला नाही, असा मराठी साहित्यिक-कलावंत विरळा! घरच्या मंडळींना सततच्या या पाहुण्यांचा त्रास होतच असणार, पण त्यांना साहित्यिक-कलावंत भेटण्याच्या आनंदापुढे हा त्रास दुय्यम वाटायचा. आज, सुनील देशमुख हे महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांची अमेरिकेतली निवड समितीची जबाबदारी आणि महाराष्ट्र आणि अमेरिका येथील निवड समित्यांमधील समन्वयाची जबाबदारी दिलीप चित्रे यांच्या पत्नी शोभाताई चित्रे मोठ्या प्रेमाने आणि नेटकेपणे सांभाळत आहेत.

# डॉ. आ. ह. साळुंखे
## ‘अखेरचा रोमन’

□

राजू परुळेकर



*शोषक आणि शोषितांचा धर्म एकच असल्याची आवई सध्या जोरात आहे. प्रा. आ. ह. साळुंखेसहित सर्व शहाण्या आणि प्रबुद्ध पुरुषांचं मूलभूत तत्त्वज्ञान हेच कसोटीला लागलं आहे. एवढ्या वेगात ब्राह्मणवाद परत एकदा बहुजनवादाचा कब्जा करेल, अशी कल्पना भल्याभल्यांना आली नाही याविषयी प्रा. आ. ह. साळुंखे यांना फार खंत वाटते. हे विचारधन आजच्या अंधकारमय काळात फार मोलाचे आहे, आपल्याला संघर्षाचे बळ देणारे आहे.*

तात्या... त्यांना बोलताना सर्वजण तात्या म्हणतात. डॉक्टर आ. ह. साळुंखे यांना एक ललित लेखक बनायचं होतं. परंतु संस्कृतवर प्रभुत्व आल्यावर त्यांच्या असं लक्षात आलं की, आपण जो चार्वाकचा अभ्यास करत आहोत, तो आणि त्याच्या परंपरेचे अगोदरचे आणि नंतरचे अभ्यासक हे बहुजन समाजाला ठाऊक असायला हवेत. त्या परंपरेची ओळख करून देणं हे आपलं नैतिक काम आहे. आणि त्या क्षणी तात्यांनी आपल्या आयुष्याची दिशा बदलली. तात्यांनी ललित लेखनाऐवजी वैचारिक लेखनाला सुरुवात केली. प्राच्यविद्यापंडित डॉक्टर आ. ह. साळुंखे (ज्यांचा या लेखात पुढे उल्लेख 'तात्या' असाच येईल त्यांनी) बहुजनांच्या प्रबोधनासाठी हजारो पानं आणि शेकडो पुस्तकं लिहिली, हजारो व्याख्यानं दिली.

तात्यांना शोषकाविरुद्धची जी बंडखोरी करावीशी वाटली ती बंडखोरी त्यांच्या लेखनात उतरली. भारतीय ब्राह्मणवादी परंपरेच्या शोषणाविरोधात ज्या ज्या महानायकांनी बंडखोरी केली त्यांच्याबद्दल तात्यांनी इतकं सखोल लिहिलं आहे की, त्या महानायकांच्या परंपरेतले ते स्वत:च एक महानायक होऊन बसले. त्यांच्या लेखनामध्ये एक समान सूत्र आहे ते त्यांच्या एका पुस्तकाचं नावही आहे. 'गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो.' ब्राह्मणधर्म आणि त्याच्या इतर गुलाम जाती यांना आज 'हिंदुत्वा'च्या एका सतरंजीत गुंडाळण्यात येत आहे. अशा या काळात तात्यांचे लेखन सर्वात महत्त्वाचे आहे. तात्यांच्या लेखनाचे नायक एकलव्य, शंबुक, बळी, विद्रोही तुकाराम, चार्वाक, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले हे आहेत. तात्यांच्या लेखनामध्ये समस्त स्त्रियांना नायिकांचा दर्जा देण्यात आला आहे. वैदिक धर्मसूत्रांमध्ये ब्राह्मणांव्यतिरिक्त सर्व जाती, स्त्रिया आणि बहुजन यांना जी गुलामगिरीची दशा प्राप्त झालेली आहे, तात्यांच्या लेखनाचं बंड त्याविरुद्धच आहे. तात्यांनी यांखेरीज व्यक्तिगत आणि समष्टीसंदर्भात इतकं लिहिलंय की, एका छोट्या लेखात त्याचा मागोवा घेणं अशक्य आहे.

तात्यांनी त्यांच्या विलक्षण शांत आणि त्याचबरोबर बंडखोर दोन्ही व्यक्तिमत्त्वांतून झिरपलेलं जे लेखन केलेलं आहे, त्यातून त्यांनी भारतीय ब्राह्मणवादाला मुळातून आव्हान दिलं आहे. दुर्दैवानं ते

लेखन सर्व बहुजन समाजापर्यंत पोहोचायला अजून किती वेळ लागणार आहे, कोणास ठाऊक! तात्या ज्या पश्चिम महाराष्ट्रात आपलं समतेचं नि स्वातंत्र्याचं तत्त्वज्ञान प्रसवत होते तिथली मराठा-कुणबी आणि इतर ओबीसी तरुण मुलं मात्र झुंडीने तात्यांकडे येण्याऐवजी कुणा ब्राह्मणवादी आणि पाखंडी गुरुजीकडे आपलं स्वातंत्र्य गहाण टाकत होती. असो!

तात्यांचं लेखन हे ज्यांच्यासाठी त्यांनी केलं त्यांच्यापर्यंत पोहोचलं असतं आणि त्यांनी सकसपणे ते वाचलं असतं तर देशाला आजच्या ब्राह्मणवादी गुलामगिरीत परत जावं लागलं नसतं. गौतम बुद्धांनी ज्या शांततेने ब्राह्मणवादाला आव्हान दिलं, त्याच शांतपणे तात्या ब्राह्मणवादाला आव्हान देतात. इतकं असूनही त्यांचं लेखन हे कुठेही प्रतिक्रांतिकारक झालेलं नाही. त्यांचं लिखाण अस्सल क्रांतिकारक (Original revolutionary) लेखन आहे. आपल्या इतिहासाकडे, पुराणातल्या देवांकडे आणि असुरांकडे पाहण्याची एक वेगळीच दृष्टी ते आपल्याला देतात. ती इतकी वेगळी असते की, गतानुगतिक समाजाला जे असुर वाटत होते, ते आपल्याला नायक वाटू लागतात आणि ज्यांना देवाचा दर्जा प्राप्त झाला आहे, ते शोषकांचे नायक होते हे आपल्या लक्षात येते. आपल्या संस्कृतीमध्ये नायकत्व प्राप्त झालेल्यांचे दोष तात्या उघडपणाने मांडतात. त्यामागे त्यांचं उद्दिष्ट झापडबंद विचार करणारी संस्कृती झुगारून देण्याचं असतं. तात्यांना आयुष्यात चार्वाक भेटल्यानंतर चार्वाकला शोधत-शोधत ते स्वत:च बोधी अवस्थेला पोहोचले, याची खूण त्यांचे लिखाण वाचताना पटते. तात्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू 'बंडखोरी' आहे आणि तात्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा केंद्रबिंदू 'मानवता' आहे, या दोहोंचा प्रभाव त्यांच्या लेखनावर पडलेला दिसतो. कधीकधी तात्यांना भेटणाऱ्या माणसाची एक फसगत होते. इतकं ज्वालामुखीसारखं लेखन करणारा लेखक, विचारवंत प्रत्यक्ष भेटल्यावर इतका मऊ, सहनशील, प्रेमळ, हळुवार असेल, यावर त्यांचा विश्वास बसत नाही. हे बंडखोर लेखन वाचकाला एकाच वेळेला अस्वस्थ आणि शांत करतं.

मला व्यक्तिश: तात्यांचं अतिशय आवडणारं पुस्तक 'सर्वोत्तम भूमिपुत्र: गौतम बुद्ध' हे आहे. तात्या एकदा बोलताना मला म्हणाले होते की, हे गौतम बुद्धांवरचं पुस्तक लिहिताना त्यांना अपार आनंद आणि शांतता लाभली होती. तो काळ त्यांच्या आयुष्यातला एक आनंदाचा काळ होता. आज वाचकाला हे पुस्तक वाचताना सुद्धा तितकीच शांतता लाभते आणि आनंदाचा अनुभव येतो. मुक्तीची कल्पना आणि खरोखरची मुक्ती या दोन्हींबाबत तात्या आत्यंतिक अंत:स्फूर्तीने लिहितात. त्यांच्या या पुस्तकावर बौद्ध धर्माचा तर्कवादी दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या विद्वानांनी घेतलेल्या आक्षेपाला तात्यांनी शांतपणे आणि मुद्देसूद उत्तर दिलेलं आहे. त्या उत्तरांचंही पुस्तक आलेलं आहे. हे सारं मुळातून वाचण्यासारखं आहे. एका लेखातून तात्यांच्या समग्र साहित्यावर आणि त्यांच्यावर लिहिता येणं शक्यच नाही.

तात्यांच्याबद्दल लिहिताना त्यांच्या नायकांची निवड हा महत्त्वाचा विषय आहे. तात्या फक्त नायकांची निवड करून थांबत नाहीत तर त्या नायकांबद्दलचा वाचकाचा असलेला दृष्टिकोन आणि भ्रम आरपार बदलून टाकतात. उदाहरणार्थ, 'विद्रोही तुकाराम'मध्ये तात्यांनी वाचकांना तुकारामांबद्दल नवी दृष्टी दिली. त्यांच्या लेखनाला संशोधनाचा भक्कम आधार होता. तात्यांच्या लेखनाच्या अगोदर तुकारामांवरचे ब्राह्मणी लेखन, चित्रपट आणि इतर साहित्यामध्ये तुकारामांना ज्या प्रकारे रंगवण्यात

*१९९४ साली ही पुरस्कार योजना सुरू झाली आणि पहिल्याच वर्षी आ. ह. साळुंखे यांच्या 'आस्तिकशिरोमणी चार्वाक' या ग्रंथाला पुरस्कार मिळाला. हे साळुंखे सरांचे छायाचित्रही पुरस्कार समारंभानिमित्त प्रसिद्ध केलेल्या 'संवादिनी' या अंकातील -*

## 'आस्तिकशिरोमणी चार्वाक'

आधुनिक महाराष्ट्राला आणि मराठीला लाभलेले एक तेजस्वी विवेकवादी विद्वान म्हणून आपण डॉ. आ. ह. साळुंखे यांच्याकडे पाहू शकतो. भारतीय धार्मिक परंपरावादाचा प्रवाह थोपविणे, तो उलट दिशेने विवेकवादाच्या दिशेने वळविणे आणि अशा प्रकारे धर्मातीततेचे चक्रप्रवर्तन करणे हे आधुनिक काळातले विवेकवाद्यांसमोरचे एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये अग्रेसर विद्वान म्हणून ज्यांच्याकडे प्रेमाने आणि आदराने पाहावे असे डॉ. साळुंखे आहेत.



धार्मिक परंपरावादाचा प्रवाह हा एकीकडे धर्मांधता, रूढी व विषमता पोसणाऱ्या प्रस्थापितांच्या अहंकाराच्या आधाराने प्रवास करतो; तर दुसरीकडे 'तात्त्विक, दार्शनिक किंवा वैचारिक क्षेत्रात तो ईश्वरवाद, कर्मसिद्धांत, ग्रंथप्रामाण्यवाद, मायावाद यांच्या आधारे प्रवास करतो. अर्थात, हा दुहेरी प्रवास अलगपणे नव्हे, तर हातात हात घालूनच होत असतो. पैकी प्रवासाची एक धारा ही मुख्यत: भावना आणि कृतीला आवाहन करणारी असेल, तर दुसरी धारा मुख्यत: वैचारिक बांधीलकी निर्माण करणारी आहे. साळुंखे यांनी या दोन्ही धारांशी आपला संघर्ष जारी ठेवला आहे. या दोन्ही प्रकारच्या संघर्षात बुद्धिनिष्ठ, धर्मातीत विचारसरणी हे त्यांचे प्रमुख

आलेलं आहे तो तुकाराम एक भोळसट, दरिद्री, आध्यात्मिक आहे. तात्यांनी संशोधनाद्वारे केलेल्या लेखनातून हे सिद्ध केलं की, तुकारामांचा जन्म एका सधन कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हा लोकांना व्याजाने पैसे देण्याचा होता. तुकारामांचं बंड हे शोषणाविरुद्ध होतं. तुकाराम हे समतावादी होते. म्हणून आपल्याकडे असलेली लोकांची कर्जखते त्यांनी नदीत बुडवली. तुकारामांनी विद्रोहाचा प्रचार केला. समतावादाचा प्रचार केला. ब्राह्मणी, तत्कालीन आध्यात्मिक झुंडशाहीविरुद्ध बंड केलं. तुकारामांचे अभंग हा जाणीवपूर्वक केलेला ब्राह्मणवादाविरुद्धचा विद्रोह आहे, हे तात्यांनी त्यांच्या लिखाणातून दाखवून दिलं. तात्यांनी तुकारामांबद्दल जे केलं तेच त्यांनी चार्वाकाबाबत केलं. बळी हा बहुजनांचा पूर्वज आहे. प्रत्येक शेतकरी हा बळीवंशी आहे आणि आपल्याला त्याचा किती अभिमान वाटला पाहिजे, हे तात्यांनी आपल्या लेखनातून उलगडून दाखवलं.

तात्यांच्या समोर बसल्यावर या एका माणसाने पावलो-पावली बहुजनांच्या नायकांच्या निखाऱ्यांवरची राख आपल्या फुंकरीने दूर करण्याचं डोंगराएवढं काम केलं असेल, यावर आपला विश्वास बसणं

शस्त्र आहे. यातूनच साळुंखे यांनी एका बाजूने 'धर्म की धर्मापलीकडे' आणि 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती' यांसारखी पुस्तके सिद्ध केली आहेत, तर दुसऱ्या बाजूने परंपरावाद्यांची वैचारिक बांधीलकी वेदप्रामाण्यवादी, ईश्वरवादी, कर्मवादी व मायावादी दर्शनांशी असताना, त्यांनी ज्या चार्वाकाला कायम पराभूत पूर्वपक्ष मानले, त्याला विजयी सिद्धांतपक्षाचे स्थान देण्याचे कार्य डॉ. साळुंखे करीत आहेत. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'आस्तिकशिरोमणी चार्वाक' या पुस्तकाकडे या पार्श्वभूमीवर पाहायला हवे...

अभिजात चार्वाकदर्शनाला पुन:प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा डॉ. साळुंखेंचा हा उपक्रम गौरवास्पद ठरतो, याबाबत दुमत होऊ नये. मराठीत तर चार्वाकदर्शनाच्या ऐतिहासिक व तात्त्विक अशा दुहेरी मांडणीच्या बाबतीत हे पुस्तक सर्वोत्कृष्ट ठरेलच, पण इंग्रजीत किंवा हिंदीतही या दर्जाचे पुस्तक नाही, असे मला वाटते. त्यामुळे या पुस्तकाचे इंग्रजी, हिंदी व अन्य भाषांतून भाषांतर झाले पाहिजे. या पुस्तकावर चार्वाकसमर्थकांच्या परिघाबाहेरून तसेच परिघातून टीकाटिप्पणीही व्हायला पाहिजे; व्यापक चर्चा व टीका-प्रतिटीकांतून चार्वाकदर्शन विकसित व्हायला हवे. त्यातच या पुस्तकाचे खरे यश आहे.




प्रदीप प्र. गोखले
('संवादिनी' १९९५)

कठीण जातं. याचं कारण, गुणवत्ता आणि दर्जा या दोन्हीही कसोट्यांवर लेखन, व्याख्यानं, मुलाखती आणि प्रबोधन या क्षेत्रामध्ये त्यांनी एवढं विपुल काम करून ठेवलेलं आहे की, ते एका व्यक्तीला तर सोडा, पण एखाद्या संस्थेलाही करणं शक्य नाही. तात्यांचं काम दंतकथा वाटावं, लिजंडरी वाटावं इतकं मोठं आहे. त्यामुळेच अजून शंभरएक वर्षांनी ब्राह्मणवादी तात्यांचा देव बनवून टाकतील, अशी भीती वाटते!

तात्या तीक्ष्ण आहेत, पण टोचत नाहीत. प्रखर आहेत, पण जाळत नाहीत. बंडखोर आहेत, पण टणक नाहीत. त्यांच्या लिखाणात मानवतेशी तडजोड नाही आणि त्यामुळेच ते लिखाण, त्यांचे विचार वाचकामध्ये मुरत जातात. व्यक्ती म्हणून तात्यांच्या स्वभाव अनाग्रही आहे, मृदू आहे. त्यांच्यात कारुण्य आहे, पण तडजोडवादाला मात्र मुळीच थारा नाही. त्यांच्या लेखनातल्या नायक आणि नायिकाही अगदी तशाच आहेत.


तात्यांनी सुरुवातीच्या आयुष्यात जेव्हा हे बंडखोर लिखाण त्या काळच्या लोकप्रिय नियतकालिकांमध्ये


प्रकाशित केलं, तेव्हा त्यांच्या लेखनावर तीन-तीन, चार-चार पोती भरून प्रतिक्रिया येत असत. मग तात्या महाराष्ट्रभर व्याख्याते म्हणून (तेव्हापासून) फिरू लागले. समाजामध्ये स्त्रियांविषयी, बहुजनांविषयी आणि समाजातल्या गुलामगिरीविषयी त्यांनी हजारो व्याख्यानं दिली. लोकांना जागं करण्याचा प्रयत्न केला. धर्म आणि संस्कृती याविषयी समाजाला, विशेषत: स्त्रीला भासमान काय आणि वास्तविक काय हे कळावं यासाठी तात्यांनी पुस्तकं, व्याख्यानं, मुलाखती याव्यतिरिक्तही अपार मेहनत घेतली आहे. त्यांच्या सामाजिक जीवनात आणि लेखनात त्यांनी अनेक वादळं पचवली नि त्यावर 'वादाची वादळं' नावाचं एक पुस्तक लिहिलं आहे. पण ते केवळ पुस्तकापुरते मर्यादित राहिले नाहीत. तात्यांना सक्रिय सामाजिक जीवनामध्ये बंडखोरीतून क्रांतीकडे जाण्याची अनावर इच्छा होती. आपल्या प्रखर बुद्धीच्या तेजाने तात्या या वादांना पुरून उरले.


अलीकडे तात्या फारसे बाहेर पडत नाहीत. काळही खूप बदलला आहे. तात्यांची भाषणं आणि मुलाखती मोबाईलवर पाहणाऱ्यांची संख्या वाढली असली तरीही इतकं मूलभूत लिखाण मुळातून वाचणारे लोक कमी उरले आहेत. तात्यांचे नायक, नायिका हे नेहमीच अभिजनविरोधी राहिले आहेत. आज बहुजनवादाचा सर्व आघाड्यांवर पराभव होताना दिसत आहे. प्रतिक्रांतिकारक आणि ब्राह्मणवादी शक्ती जोमात आहेत. मी तात्यांशी जेव्हा बोलतो तेव्हा त्यांच्या आवाजात याविषयीची चिंता आणि खंत लपत नाही. शोषक आणि शोषितांचा धर्म एकच असल्याची आवई सध्या जोरात आहे. तात्यांसहित सर्व शहाण्या आणि प्रबुद्ध पुरुषांचं मूलभूत तत्त्वज्ञान हेच कसोटीला लागलं आहे. एवढ्या वेगात ब्राह्मणवाद परत एकदा बहुजनवादाचा कब्जा करेल, अशी कल्पना भल्याभल्यांना आली नाही याविषयी तात्यांना फार खंत वाटते.

बाबासाहेब पुरंदरे यांच्यावर 'पुरंदरेंची इतिहासद्रोही बखर' हे तात्यांचं गाजलेलं एक पुस्तक. ज्यात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात 'गोब्राह्मण प्रतिपालकत्वाचा' प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सर्व प्रकारे प्रतिवाद केलेला आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या विचारांची अनेक सरकारं आली आणि गेली, बाबासाहेब पुरंदरे यांना 'महाराष्ट्रभूषण' हा सन्मान देण्यात आला, पण हा सन्मान 'अस्सल' लेखन करणाऱ्या तात्यांना दिला गेला नाही, ही खंत सुजाण महाराष्ट्राला जाणवायला हवी. महाराष्ट्राचं सामुदायिक शहाणपण अस्सल पुरोगामी क्रांतिकारकतेपेक्षा नाटकी आणि ब्राह्मणी खोटेपणाकडे


















गहाण पडलेलं आहे, याचंच हे द्योतक म्हणता येईल. बाकी तात्यांसारख्या अस्सल विद्वानाला एका 'महाराष्ट्रभूषण'ने काय फरक पडणार म्हणा!

बुद्धानंतर विकसित झालेली एक क्रांतिकारक संस्कृती पुष्यमित्र शुंगाच्या उदयानंतर शेकडो वर्षांच्या गुलामगिरीत गेली. त्याच गुलामगिरीचं भय आणि अंधार आपल्या डोक्यावर लटकत आहे. तात्यांनी अनुवादित केलेली जी चार पुस्तकं आहेत त्यातलं एक 'एरिक फ्रॉम' याचं 'स्वातंत्र्याचे भय' (Fear of Freedom) या पुस्तकातील तात्त्विक मांडणी भारतीय आणि महाराष्ट्रीय माणसांनी दुर्दैवाने खरी करून दाखवली, याची खंत तात्यांना नक्कीच वाटत असणार. आयुष्यभर बहुजनांच्या स्वातंत्र्यासाठी लढणारा डॉ. आ. ह. साळुंखे नावाचा लेखक जेव्हा 'आपल्या प्रबुद्ध पुरुषांपेक्षा पुष्यमित्र शुंग समाजाला जवळचा वाटतो' हे पाहतो, तेव्हा त्या लेखकाला काय वाटत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. तात्यांना या संदर्भात कधीही विचारलं तर ते 'काळ मोठा कठीण आहे, पण आपल्याकडून जे होतं आहे ते करत जायचं', असं सांगत असतात. ऐकताना मला खोलवर याची जाणीव होते की, तत्त्वज्ञ आणि लेखक स्वत:च्या दु:खाची जपणूक करायलासुद्धा थोरच असावा लागतो.

तात्या थोर आहेत!

आपण मात्र समाज म्हणून वैचारिक गुलाम आहोत!

सॉरी तात्या, आम्ही तुम्हाला निराश करत आहोत.

**राजू परुळेकर**
raju.parulekar@gmail.com
९८२०१२४४१९

# देबेंद्र सुतार

## ओडिशामध्ये चेटकीण प्रथेविरोधात संघर्ष करणारे लढवय्ये

□

राहुल थोरात । अण्णा कडलास्कर



*आतापर्यंत ओडिशामध्ये भेटलेले सर्व विवेकवादी कार्यकर्ते हे लेखन, प्रबोधन या अंगाने काम करत आहेत, असे दिसले; पण कटक येथील देबेंद्र सुतार हे रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे पहिलेच कार्यकर्ते आम्हाला ओडिशामध्ये भेटले. ओडिशामध्ये प्रचलित असलेल्या चेटकीण प्रथेविरोधात देबेंद्र सुतार यांचा संघर्ष नेहमी सुरू असतो.*

ओडिशातील चेटकीण प्रथा आणि तेथील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ याचा अभ्यास करण्यासाठी आम्ही सप्टेंबर २०२२ साली ओडिशाचा अभ्यास दौरा केला होता.


बेहरमपूरहून पाच तासांचा रेल्वे प्रवास जनरल डब्यातून करून आम्ही रात्री दहा वाजता कटक रेल्वे स्टेशनला पोहोचलो. तेथून रिक्षाने सरळ देबेंद्र सुतार यांच्या घरी पोहोचलो. पन्नास वर्षीय देबेंद्र सुतार हे ओडिशा रॅशनॅलिस्ट सोसायटी या संघटनेचे राज्य सेक्रेटरी आहेत. ते गेली ४० वर्षे पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम करतात. त्यांनी आमचे हसतमुखाने स्वागत केले. त्यानंतर आम्ही देबेंद्र सुतार यांच्याशी संवाद साधला. ते सांगत होते...

'ओडिशा रॅशनॅलिस्ट सोसायटी' ही ओडिशातील एक विवेकवादी संघटना आहे. ती गेली २५ वर्षे कार्यरत आहे. सोसायटीच्या १५ सदस्यांच्या राज्य कमिटीची बैठक दरमहा होते. त्यांच्या संघटनेच्या वतीने 'वैज्ञानिक चर्चा' या नावाने एक त्रैमासिक निघते. त्याचे संपादक देबेंद्र सुतार हेच आहेत. या त्रैमासिकाच्या दोन हजार प्रती काढल्या जातात. राज्यातील त्यांच्या तीस केंद्रांना त्या पाठवल्या जातात. ५० रुपयांप्रमाणे त्याची विक्री केली जाते.

आतापर्यंत ओडिशामध्ये भेटलेले सर्व विवेकवादी कार्यकर्ते हे लेखन, प्रबोधन या अंगाने काम करत आहेत, असे दिसले; पण कटक येथील देबेंद्र सुतार हे रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे पहिलेच कार्यकर्ते आम्हाला ओडिशामध्ये भेटले.

ओडिशामध्ये प्रचलित असलेल्या चेटकीण प्रथेविरोधात देबेंद्र सुतार यांचा संघर्ष नेहमी सुरू असतो. राज्यात कोठेही चेटकीण बळीची घटना घडली की, ते लगेच तेथे भेट देतात. पोलीस आणि प्रशासन यांच्या मागे लागून गुन्हा नोंद करतात. आतापर्यंत त्यांनी राज्यातील दहा वर्षांचा चेटकीण प्रथेचा संपूर्ण डाटा संग्रही करून त्यावर साडेतीनशे पानी 'ओडिशातील दाहिरी प्रथा' हे पुस्तक लिहिले आहे.

देवेंद्र सुतार हे ओडिशा 'जन विज्ञान मंच'चेही सेक्रेटरी आहेत. ओडिशामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन, चेटकीण प्रथा विरोधी अभियान, सामाजिक बहिष्कार विरोधी 'ओडिशा बसंदा विरोधी संगम मंच' तसेच पर्यावरण रक्षण आणि अवयव दान अशा चळवळींमध्ये ते सक्रियपणे काम करतात.





आत्मसन्मान चळवळ

त्यांनी 'चर्चा प्रकाशन' या नावाने १०० पेक्षा अधिक विज्ञानवादी, विवेकवादी, अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रचार करणाऱ्या पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. त्यांच्या प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध झालेल्या अनेक पुस्तकांना ओडिशा राज्य शासनाचे पुरस्कार मिळालेले आहेत.

सुतार यांनी ओडिशातील डाकीण प्रथेवर 'दाहिरी कहानी', 'सर्प विज्ञान', विज्ञान आणि संस्कार, वैज्ञानिक दृष्टिकोन, अवयव दान या विषयांवर पुस्तके लिहिली आहेत. लहान मुलांसाठी दहा पुस्तके लिहिली आहेत. तसेच 'शिवाजी कोण होता?' हे गोविंद पानसरे यांचे मराठी पुस्तक, तसेच भगतसिंगाचे 'मी नास्तिक का आहे?' ही पुस्तके उडियामध्ये भाषांतरित केली आहेत. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे चरित्र उडिया भाषेत प्रकाशित करायची त्यांची तीव्र इच्छा आहे. 'त्यासाठी तुम्ही आम्हाला इंग्रजीमधून साहित्य पुरवा,' असा आग्रह त्यांनी आमच्याकडे केला. त्यांना याबाबत 'महाराष्ट्र अंनिस' नक्की सहकार्य करेल, असे आश्वासन आम्ही दिले.

देबेंद्र सुतार यांनी ओडिशातील चेटकीण प्रथा विरोधी कायदा व्हावा म्हणून कटक हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निर्णय देताना हायकोर्टाने ओडिशा सरकारला चेटकीण प्रथा विरोधी कायदा करण्याचे सक्त आदेश दिले. सध्या त्यांनी ओडिशा सरकारने महाराष्ट्र शासनासारखा 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' करावा म्हणून हायकोर्टामध्ये याचिका दाखल केली आहे.

ओडिशामध्ये सामाजिक बहिष्काराच्या अनेक घटना नेहमी घडत असतात. त्यामध्ये आदिवासींच्या




'शिवाजी कोण होता?' गोविंद पानसरे यांच्या या पुस्तकाचा देबेंद्र सुतार यांनी केलेला ओडिशा भाषेतील अनुवाद...

पंचायतीचे – त्यांच्या कांगारू कोर्टाचे ऐकले नाही तर बहिष्कृत केले जाते. चेटकीण ठरवलेल्या व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबाला बहिष्कृत केले जाते. आदिवासींमधल्या कुणी आंतरजातीय विवाह केला म्हणून बहिष्कृत केले जाते. 'बहिष्कारा'चा वापर हत्यारासारखा केला जातो. संबंधित व्यक्ती, त्याचे कुटुंब यांना जगणे असह्य केले जाते. या सर्व गोष्टींना प्रतिबंध व्हावा, म्हणून सुतार यांनी हायकोर्टामध्ये याचिका दाखल केली आहे.

राज्यात कोठेही चमत्कारांचे प्रकार घडले की, देबेंद्र सुतार तेथे प्रत्यक्ष जाऊन त्याचा भांडाफोड करतात. अंधश्रद्धा, धर्मांधता या विषयांवरील टीव्हीवरल्या चर्चांमध्ये त्यांना कायम बोलावले जाते. त्यांनी अनेक सामाजिक विषयांवर हायकोर्टामध्ये जनहित याचिका दाखल केल्या आहेत. चेटकीण प्रथेविरोधातील त्यांच्या एका याचिकेमुळेच सरकारला 'चेटकीण प्रतिबंधक कायदा' करणे भाग पडले. राज्यातील बऱ्याच सरकारी जमिनींवर काही मंदिरांनी, बुवा-बाबांनी अतिक्रमण केलं आहे. मोठ्या प्रमाणात सरकारी जमिनी लुटल्या आहेत. या सर्वांची सविस्तर माहिती काढून सुतार यांनी कटक हायकोर्टात एक याचिका दाखल केली. सरकारी जमिनींवरील हे धार्मिक अतिक्रमण काढून टाकावे, अशी मागणी त्यांनी त्या याचिकेत केली. या याचिकांमुळे त्यांना प्रचंड रोषाला सामोरे जावे लागले.



चेटक्या आहेस असा आरोप ठेवून
एका आदिवासी युवकावर (तीर कमान)
धनुष्य बाणाने हल्ला.

एका मोठ्या बुवाने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली, तेव्हा काही काळ ओडिशा पोलिसांनी त्यांना पोलीस संरक्षण दिले होते.


**चेटकीण शोधण्याचे अघोरी आणि चमत्कारी प्रकार :**

एखाद्या महिलेला ती चेटकीण (दहिनी) आहे, हे कसे ठरवतात, हे आम्ही कटक भेटीत सुतार यांना विचारले तेव्हा त्यांनी गुनिया लोक (देवऋषी) चेटकीण ठरविण्यासाठी जे ५ भयानक प्रकार अवलंबतात, ते सांगितले.

एका प्रकारात गुनिया चारजणांना एखादी खाट (बाजले) गावात वाजत-गाजत, नाचवत घेऊन जाण्यास सांगतो. अचानक कुणाच्या तरी घरासमोर ती खाट थांबून राहते किंवा खाली पडते किंवा ठेवली जाते. तेव्हा त्या घरातील बाई अथवा पुरुष चेटकीण/चेटकी ठरवला जातो.

दुसरा प्रकार आणखी भयानक. संशयित व्यक्तीला गरम तेलाच्या कढईत नाणे टाकून बाहेर काढण्यास सांगतात. हात भाजले की 'दहिनी' म्हणून शिक्का पक्का.

तिसऱ्या एका प्रकारात गव्हाच्या कणकीचे गोळे करून ते संशयित व्यक्तीला पाण्यात टाकायला सांगतात. जिचा गोळा बुडेल ती दहिनी. हा एक हातचलाखीचा प्रयोग असतो. कार्यकर्त्यांनी काही तरंगणारे गोळे तपासले, तर त्यात थर्माकोल लपवलेले आढळले.



सुतार यांनी ओडिशा भाषेत अनुवादित केलेली काही पुस्तकं

चौथा प्रकार तर फुल्ल चमत्कारी. यामध्ये पायाला ओली हळद लावलेल्या संशयित बायकांना सफेद कापडावर हळूहळू एक-एक पाऊल टाकत चालायला लावायचे. ज्या बाईचे पाऊल कापडावर पिवळ्याऐवजी लाल उमटते, ती बाई चेटकीण! कोणत्या महिलेचे पाऊल लाल उमटणार आणि कोणत्या महिलेचे नाही, हे तो गुनिया ठरवतो. संशयित व्यक्ती कापडावरून चालण्याअगोदर ते कापड नकळत चुन्याच्या पाण्यात बुडवले की काम फत्ते!

पाचव्या प्रकारात गुनिया नखाला अंजन (काजळ लावून) त्यात दहिनी कोण? हे पाहतो. ही दहिनी फक्त गुनियालाच दिसते म्हणे! खरे तर कोणाला चेटकीण ठरवायचे, हे गुनिया अगोदरच ठरवतो. गावातील निराधार व्यक्ती, विधवा, तरुण महिला या त्याचे 'लक्ष्य' असतात.

**ओडिशाचा चेटकीण हत्या प्रतिबंध कायदा काय आहे?**

महिलेला चेटकीण ठरवून तिचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, लैंगिक शोषण करणाऱ्या कुप्रथेचा प्रारंभ युरोपमध्ये झाला. सुरुवातीच्या काळात युरोपमध्ये चर्चच्या विरोधात असलेल्या स्त्रीला चेटकीण मानले जात असे. नंतरच्या काळात दुष्काळ, पूर आणि कोणत्याही अप्रिय घटनेसाठी, साथीच्या आजारांसाठी चेटकीण महिलांना जबाबदार ठरवण्यात येऊ लागले.

**बळी पडलेल्या स्त्रिया :**

ह्युमन राईट्स कमिशनच्या अहवालानुसार जगभरात मागील पंधरा वर्षांत २५०० महिलांची चेटकीण म्हणून हत्या करण्यात आली. देशात महाराष्ट्र, झारखंड, बिहार, हरियाणा, गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, बंगाल या राज्यांत महिलांना चेटकीण ठरविण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. यात सामान्यपणे विधवा, अनाथ, वृद्ध, तथाकथित खालच्या जातीतील महिलांना त्यांची संपत्ती हडप करण्यासाठी किंवा त्यांचे लैंगिक शोषण करण्यासाठी चेटकीण ठरवले जाते. कधी-कधी गावातील राजकारणामुळे देखील चेटकीण ठरवले जाते.

**ओडिशाचा चेटकीण प्रथा विरोधी कायदा :**

चेटकीण कुप्रथेला प्रतिबंध घालण्यासाठी ओडिशा राज्याने २०१४मध्ये The Odisha Prevention of Witch-hunting Act, 2013 मंजूर केला. या कायद्याने चेटकीण प्रथेला दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा ठरवले आहे.

ओडिशामध्ये २०१०, २०११, २०१२ या तीन वर्षांत चेटकीण ठरवलेल्या १०५ महिलांची हत्या करण्यात आली, अशी माहिती ओडिशाचे तत्कालीन संसदीय मंत्री कल्पतरू दास यांनी विधेयक मांडताना दिली. तसेच त्यांनी ओडिशा हे चेटकीणविरोधी कायदा करणारे देशातील चौथे राज्य आहे; यापूर्वी बिहार, छत्तीसगड, झारखंड या राज्यांनी चेटकीणविरोधी कायदा केल्याची माहिती दिली.

**या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी :**

१. जो कोणी कोणत्याही स्त्रीला चेटकीण म्हणून बळजबरी करतो, तिला कोणताही अप्रिय पदार्थ पिण्यास किंवा खायला लावतो किंवा तिचा चेहरा किंवा शरीर रंगवतो किंवा मानवी प्रतिष्ठेला अपमानास्पद, असे कोणतेही कृत्य करतो किंवा तिच्या घरातून हाकलतो, त्याला एक ते पाच वर्षांपर्यंतचा कारावास किंवा कारावासासह दंडाची शिक्षा आहे.

२. जो कोणी वर उल्लेखलेले कृत्य करण्यास प्रवृत्त करतो, त्यास एक ते तीन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा कारावासासह १००० रुपयांपर्यंतचा दंड ही शिक्षा आहे.

३. ज्या व्यक्तीने दुसऱ्यांदा हा गुन्हा केला असेल त्यास तीन ते पाच वर्षांपर्यंतचा कारावास किंवा कारावासासह १० हजार रुपयांहून अधिक दंड आकारला जातो.

४. जेव्हा न्यायालय या कायद्यांतर्गत गुन्हेगाराला शिक्षा देईल, तेव्हा शोषित महिलेचे झालेले शारीरिक-मानसिक-आर्थिक शोषण व ते भरून काढण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम याचा न्यायालय विचार करेल.

५. दंडाची पूर्ण किंवा काही रक्कम शोषित महिलेला नुकसानभरपाई म्हणून देण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

६. राज्य सरकारला या संदर्भात अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी सामाजिक जनजागृती कार्यक्रम राबवण्याचा अधिकार आहे.

आमच्या आठ दिवसांच्या दौऱ्यात आम्ही ओडिशातील अनेक विवेकवादी कार्यकर्त्यांना, लेखक – कवी – पत्रकार, शिक्षक – विद्यार्थी, वरिष्ठ पोलीस अधिकारी – पोलीस शिपाई, सनदी अधिकारी, दलित – मुस्लीम – आदिवासी – डाव्या कार्यकर्त्यांना भेटलो. हे सर्वजण आपापल्या परीने ओडिशा राज्याला विवेकवादी, विज्ञानवादी करण्यासाठी झटत आहेत.

*‘जगाच्या कल्याणासाठी काम करणे हे स्वत:च्या हितापेक्षा खूप मोठे आहे.’* **– संत भीम भोई**

(ओडिशातील सुप्रसिद्ध आदिवासी संतकवी भीम भोई यांच्या याच वचनाने ओडिशाच्या सुकन्या आणि आपल्या देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या शपथविधीची सुरुवात केली होती.)

संत भीम भोई यांच्या या संतवचनाप्रमाणेच ओडिशातील हे विवेकवादी कार्यकर्ते समाजासाठी अहोरात्र झटत आहेत. आपल्या महाराष्ट्रासारखा त्यांना फुले-शाहू-आंबेडकर आणि वारकरी परंपरेचा वारसा नसल्यामुळे त्यांची समाजबदलाची लढाई थोडी अवघड आहे, पण ते चिकाटीने लढताहेत. त्यांना बळ देणे ही आपली जबाबदारी आहे आणि त्यांना ‘डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कारा’ने काही प्रमाणात का होईना, हे बळ निश्चितच लाभेल.

**राहुल थोरात** ९४२२४११८६२
**अण्णा कडलास्कर** ९२७००२०६२१

ग्रंथ पुरस्कार (ललित)

# ‘धरणसूक्त’
# विलास शेळके
## एक कृतिशील लेखक

□

हेमंत पोतदार



*पाथरवट समाजातील कसबी व कुशल कारागिरांनी अनेक मंदिरे, इमारती, धरणे, कालवे, पूल उभारण्यात भरीव योगदान दिलेले आहे. त्यांच्यापैकीच एक चिमणराव शेळके आणि त्यांचे सुपुत्र इंजिनियर विलास शेळके. 'धरणसूक्त' या पुरस्कारप्राप्त कादंबरीबाबत म्हणायचे झाले तर तिचे बांधकाम हे विलास शेळके यांच्यासारख्या कुशल इंजिनियरने बांधलेल्या धरणाइतकेच चिरेबंदी आणि भक्कम झालेले आहे. तसे ते न झाले असते तरच नवल!*

मराठी भाषेमध्ये एक वाक्यप्रचार रूढ आहे, गवयाचं पोर रडतं तेही सुरातच. अगदी तसंच म्हणायचं तर गवंड्याचं पोर जे काही करेल, जगेल, लिहिल तेही लाईनदोरीत, अगदी ओळंब्यात! सूतभरही चूक काढता येऊ नये इतकं अचूक. विलास शेळके यांच्याबाबतीत असंच म्हणता येईल. त्यांचा जन्म नाशिकमध्ये पंचवटीतील पाथरवट समाजातील कसबी कारागीर असलेल्या चिमणराव शेळके यांच्या घरी झाला. पाथरवट समाजातील कसबी व कुशल कारागिरांनी अनेक मंदिरे, इमारती, धरणे, कालवे, पूल उभारण्यात भरीव योगदान दिलेले आहे. त्यांच्यापैकीच एक चिमणराव शेळके आणि त्यांचे सुपुत्र इंजिनियर विलास शेळके. 'धरणसूक्त' या पुरस्कारप्राप्त कादंबरीबाबत म्हणायचे झाले तर तिचे बांधकाम हे विलास शेळके यांच्यासारख्या कुशल इंजिनियरने बांधलेल्या धरणाइतकेच चिरेबंदी आणि भक्कम झालेले आहे. तसे ते न झाले असते तरच नवल!

विलास शेळके यांना मी गेले २५ ते ३० वर्षांपासून ओळखतो. विलास शेळके पंचवटीतील कष्टकरी समाजाच्या वस्तीमध्ये असलेल्या श्रीराम विद्यालयात मॅट्रिकपर्यंत शिकले आणि १९७५ साली पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (सिव्हिल) झाले.

माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना नाशिकच्या गोदाकाठच्या यशवंत महाराज पटांगणावर होणाऱ्या 'वसंत व्याख्यानमाले'च्या माध्यमातून त्यांचा सांस्कृतिक पिंड घडत गेला. वडील जरी निर्वाहाचे साधन म्हणून गवंडीकाम करत होते, तरी ते शिक्षित होते. त्यांची ऊठबस अनेक सुशिक्षित मित्रांच्यात होती. त्यांच्या आपापसात होणाऱ्या चर्चा, घरी येणारी वर्तमानपत्रे छोट्या विलासचा सांस्कृतिक पिंड घडवायला कारणीभूत होत होती. शाळेत विलास शेळके या मुलाची ओळख 'एक हुशार विद्यार्थी' अशीच होती. त्यांचं इंजिनियरिंगचं शिक्षण चालू असतानाच ते नाशिकच्या तरुणांनी सुरू केलेल्या 'उद्‌गार' या नियतकालिकाच्या साहित्यिक चळवळीकडे ओढले गेले. 'उद्‌गार'मधूनच त्यांच्या काही कथा आणि कविता प्रसिद्ध झाल्या. वडिलांच्या आग्रहामुळे ते इंजिनियर झाले खरे, पण त्यांचा कल मात्र नेहमीच कला, साहित्य आणि संस्कृती अशा विषयांकडे होता. अभियांत्रिकीची पदवी प्राप्त झाल्यावर ते महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात इंजिनियर म्हणून रुजू झाले.


विलास शेळके यांच्या अभियांत्रिकी कौशल्याचा ठसा त्यांच्या देखरेखीखाली साकार झालेल्या नाशिकच्या 'जलसंपदा विभागा'च्या 'संकल्पचित्र संघटने'च्या भव्य आणि देखण्या इमारतीवर दिसून आला. महाराष्ट्राचा भाग्यविधाता प्रकल्प ठरलेला कोयना जलविद्युत प्रकल्प, मुंबईची तहान भागविणारा भातसा प्रकल्प, 'रोलर कॉम्पॅक्टेड कॉंक्रिट' या आधुनिक तंत्रज्ञानाने बांधलेला घाटघर जलविद्युत प्रकल्प या धरणांवर त्यांच्या स्थापत्य कौशल्याचा व निपुणतेचा ठसा दिसून आला. अशा विविध प्रकल्पांवर साहाय्यक अभियंता ते मुख्य अभियंता अशा चढत्या श्रेणीच्या पदांवर काम करताना आणि कालांतराने जलसंपदा विभागात 'वरिष्ठ अधिकारी' म्हणून काम करताना विलास शेळके यांनी कोयना, भातसा, घाटघर प्रकल्पांत महत्त्वाची भूमिका बजावली. अहमदनगर, लातूर, नाशिक, पुणे या ठिकाणी विविध पदांवर काम केले. हे काम करत असताना ते जातील तेथे तिथल्या साहित्य चळवळीशी निगडित राहिले.

ते कॉलेजात असतानाच त्यांच्या आईचे कर्करोगाने अकाली निधन झाले. हा धक्का त्यांना खूपच जाणवला. अवघ्या तिशीत आई-वडिलांचे जाणे हा घाव मोठाच असतो. मोठ्या धीराने त्यांनी हा घाव सोसला. त्यांच्या त्या काळातील भावभावनांचे प्रतिबिंब १९८९ साली 'श्रीविद्या प्रकाशन, पुणे' यांनी प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'कॉलम' या पहिल्या काव्यसंग्रहात दिसून येते. मराठी साहित्यात पहिल्यांदाच अभियांत्रिकी प्रतिमांचा वापर करीत 'कॉलम' या काव्यसंग्रहातील कविता साकार झालेल्या आहेत.



‘कॉलम’च्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या शुभहस्ते झाले तर १९९९साली या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांच्या शुभहस्ते प्रकाशित झाली. दरम्यान, नाशिकच्या सिंचन भवनात विलास शेळके यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालय, वाचक चळवळीचा हा एक आगळा-वेगळा उपक्रम म्हणून सुरू करण्यात आले. तेव्हापासूनच ते जलसंपदा विभागाचे आणि साहित्यिक चळवळीचे नेतृत्व सर्जनशीलतेने करत आले आहेत. ते शासकीय नोकरीतून नोव्हेंबर २००९ला ‘कोयना प्रकल्पा’चे ‘मुख्य अभियंता’ या पदावरून निवृत्त झाले. नोकरीच्या काळातही त्यांचे काव्यलेखन, व्यक्तिचित्र लेखन, ललित लेखन सुरूच होते. निवृत्तीनंतर शासकीय नोकरीत केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामांमुळे आलेले विविधांगी अनुभव आता त्यांच्या गाठी होते. विविध तांत्रिक परिषदांसाठी त्यांनी जगभर प्रवास केलेलाच होता. क्षेत्रीय कामात भेटलेली अनेक बहुआयामी व्यक्तिमत्त्वं त्यांच्या मनामध्ये गर्दी करून होती. पण लेखनाला खरा वेग आला तो निवृत्तीनंतर आणि तोही कोरोनाच्या काळात!

वर्षानुवर्षे उरात साठलेला अनुभवांचा ऐवज ‘धरणसूक्त’ या कादंबरी लेखनाच्या माध्यमातून वाट मिळवता झाला. ‘धरणसूक्त’ या कादंबरीच्या शीर्षकातच बरंच काही दडलेलं आहे. ‘धरणसूक्त’ या कादंबरीचा नायक अमर. त्याच्या जन्मापासून ते तो मुख्य अभियंता म्हणून निवृत्त होईपर्यंतचा प्रवास या कादंबरीत रेखाटला आहे. एका अर्थाने ‘धरणसूक्त’चे लेखक विलास शेळके यांचाच इंजिनियर, कवी, लेखक आणि माणूस म्हणून झालेला हा प्रवास आहे आणि तो वाचकाला गुंगवून ठेवतो.





कादंबरी हा फॉर्म निवडल्यामुळे लेखक म्हणून त्यांना स्वातंत्र्य मिळाले. आमच्यासारख्या जवळच्या मित्रांना त्यांचा हा प्रवास या कादंबरीनेच अधिक कळला. विलास शेळके हे चिंतनशील, विचारवंत, सहृदयी अधिकारी. त्यांच्या पुस्तक वाचण्याबरोबर माणसं वाचण्याच्या छंदामुळे त्यांनी जीवनात शेकडो माणसे जोडली. सरकारी नोकरी करताना त्यांनी आपली संवेदनशीलता कधीही हरवू दिली नाही, याचं प्रत्यंतर आपल्याला 'धरणसूक्त' या कादंबरीत तर दिसतंच दिसतं, शिवाय 'धरणसूक्त' नंतर आलेल्या 'मोगलाई' या मराठवाड्यातील कारकीर्दीसंदर्भातील कादंबरीतही दिसून येतं. मराठवाड्यातील लातूरचा प्रलयंकारी भूकंप अवघ्या देशाला हादरवून गेला. त्यावेळी लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन त्यांनी आणि त्यांच्या चमूने अतिशय संवेदनशीलतेने केलं. हे सारं चित्रण त्यांच्या 'मोगलाई' या कादंबरीत वाचायला मिळतं.


आजमितीस विलास शेळके यांच्या नावावर दोन तांत्रिक विषयावरील पुस्तकांसह एकूण १२ पुस्तके आहेत. त्यांनी कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, समीक्षा, प्रवास वर्णन या सर्वच वाङ्मय प्रकारांत लेखन केलं आहे. त्यांचे आवडते कवी नारायण सुर्वे आहेत आणि आवडते कादंबरीकार भालचंद्र नेमाडे आहेत. नेमाडे सरांच्या 'चांगल्या लेखकाने फुटकळ लिहित बसू नये, कादंबरीसारखा सॉलिड किंवा काँक्रीट वाङ्मय प्रकार हाताळावा' या एका वाक्यामुळे मला कादंबरी लेखनाची प्रेरणा मिळाली आहे, असं विलास शेळके सांगतात.

ते श्रमाची प्रतिष्ठा जाणणारे, माणुसकी हे मूल्य जपणारे एक कृतिशील विचारवंत आहेत. शासकीय सेवा बजावताना सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून त्यांनी अतिशय संवेदनशीलतेने आणि सहृदयतेने धरणग्रस्तांचे, विस्थापितांच्या पुनर्वसनाचे प्रश्न हाताळले आणि तेच पुढे त्यांच्या साहित्यातही प्रतिबिंबित झाले. ते जसे जगले तसेच साहित्यातून अवतरले आहेत. त्यांच्यातला लेखक आणि माणूस हा एकच आहे. हे अद्वैत क्वचितच आढळून येतं!

त्यांच्यावर आलेल्या लेखांचा संग्रह 'गोदेचं पाणी' हा विजयकुमार मोरे यांनी संपादित केलेला










आहे. त्यांचं चरित्र समजायला त्यामुळे अधिक मदत होते. पण ‘धरणसूक्त’ आणि पाठोपाठ ‘मोगलाई’ ही कादंबरी प्रकाशित झाली, हे त्यांचे महत्त्वाचे साहित्यिक काम म्हणता येईल. ‘धरणसूक्त’ कादंबरीतून त्यांनी सामान्य वाचकांना धरणं कशी साकारतात, त्यामागे शेकडो माणसं जीवाची बाजी कशी लावतात, हे कादंबरीचे लालित्य राखून सांगितलेले आहे. ‘धरणसूक्त’ कादंबरीवर वाचकांकडून प्राप्त झालेल्या शेकडो अभिप्रायांचे संकलन म्हणजे ‘‘धरणसूक्त’च्या ऋचा’ (एका कादंबरीचा आस्वाद) हे आस्वादक समीक्षेचे पुस्तक. ‘धरणसूक्त’ या कादंबरीचे रसिक वाचकांकडून जोरदारपणे स्वागत करण्यात आले.


‘धरणसूक्त’ या कादंबरीची अर्पणपत्रिका महत्त्वाची आहे. ‘धरणांच्या उभारणीसाठी आपले रक्त व घाम, प्रसंगी प्राणही अर्पण करणाऱ्या अभियंत्यांना’ विलास शेळके यांनी ही कादंबरी आदरपूर्वक अर्पण केलेली आहे. या अर्पण पत्रिकेतून विलास शेळके हे श्रमप्रतिष्ठेला एक महत्त्वाचं मूल्य मानताना दिसतात. जगातील आजवर बांधल्या गेलेल्या धरणग्रस्तांचे पुनर्वसनाबाबतचे प्रश्न पूर्णतः सुटल्याचे दिसून येत नाही. परंतु ‘धरणसूक्त’ या कादंबरीतील रातसा धरणग्रस्तांचे पुनर्वसनाबाबतचे प्रश्न कादंबरीचा नायक अमर हा संवेदनशीलतेने सोडवताना दिसतो. असे संवेदनशील इंजिनियर्स जर प्रशासनात असतील तर ५०-६० वर्षे पुनर्वसनाचे लोंबकळलेले प्रश्न दिसणारच नाहीत. त्यांचे पुढील पुस्तक सामान्य व असामान्य व्यक्तींचे व्यक्तिचित्रणात्मक म्हणजे ‘चंदेरी- सोनेरी!’ यातील ‘वाघेरे बाबा’ हे व्यक्तिचित्र रसिक वाचकांनी अवश्य वाचावेच, असे आहे.


कामाच्या व पर्यटनाच्या निमित्ताने जगभर केलेल्या प्रवासातून विलास शेळके यांच्या मनात उमटलेल्या स्पंदनांचे प्रतिबिंब म्हणजे ‘देशांतराच्या कविता’ हा देशोदेशींच्या स्थळवर्णनांवरील कवितांचा एक दुर्मीळ प्रयोग असावा. ‘कॉलम’ या पहिल्या काव्यसंग्रहाचा हिंदी अनुवाद ‘कविता के पंख’ या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. त्यात अनुवादित हिंदी कवितेसोबत मूळ मराठी कविता देखील सुलभ संदर्भासाठी छापल्या आहेत. मराठी साहित्याशिवाय ‘आरसीसी डॅम्स : ॲन इंडियन एक्सपिरीयन्स’ आणि ‘डॅम्स आर फॉर एव्हर’ अशी दोन तांत्रिक विषयांवरील अनुभवसिद्ध पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.






अशी त्यांची वैविध्यपूर्ण साहित्यसंपदा आहे. अलीकडेच त्यांच्या मनामध्ये कायम घर करून असलेली हिंदी संगीतातील अनवट गाणी व गीतकारांवर त्यांनी 'मैफिल' (हिंदी चित्रपटांच्या सुवर्णयुगातील अनवट गाण्यांची) नावाचे पुस्तक लिहिले आहे. या संगीतमय साहित्यकृतीलाही रसिकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

विलास शेळके यांनी नुकतेच ७४व्या वर्षात पदार्पण केले आहे. या ७४व्या वर्षी त्यांनी जगभर केलेल्या प्रवासावर 'पूर्वायन', 'मध्यमायन', 'पश्चिमायन' अशी तीन पुस्तके लिहिली, शिवाय एक कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर आहे. पण इथे थांबतील ते विलास शेळके कसले? चार्वाकापासून प्लेटोपर्यंतच्या जागतिक स्तरावरील तत्त्वज्ञांचे वाचन, चिंतन करीत त्यावर आपले विचार मांडण्याचा त्यांचा संकल्प आहे. याही वयात निवृत्तीचे नाव मुळीच नाही! शासनाच्या अनेक तांत्रिक समित्यांवर सल्लागार म्हणून ते आपला अनुभवी मोलाचा सल्ला देत असतात. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सार्वजनिक वाचनालयाच्या 'व्यासपीठ' या दिवाळी अंकाचे ते संपादकीय सल्लागार आहेतच. खरं तर मला विलास शेळके यांचा परिचय थोडक्यात देणं शक्य नाही. त्यामुळे त्यांचे कविमित्र अमोल बागुल यांच्या शब्दात त्यांची अल्पाक्षरी ओळख म्हणजे, 'एक चिंतनशील कवी, प्रयोगशील कादंबरीकार, रसिक आस्वादक, परखड समीक्षक, कल्पक अभियंता, कुशल संकल्पक, जिज्ञासू पर्यटक' अशी आहे.

**हेमंत पोतदार**
नाशिक
potdar.hemkant@gmail.com
९८५०५०१२४७

# डॉ. शरद जावडेकर
## शिक्षणहक्क चळवळीतील संघर्ष

□

सुरेखा खरे



*यापुढेही बहुजनांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर होत जाणार आहे आणि त्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षणासंदर्भातील सर्व संबंधित घटकांना एकत्र करून संघर्षाची धार मजबूत केली पाहिजे आणि त्यासाठी जनआंदोलन उभे केले पाहिजे, असे भाई वैद्य म्हणायचे. हाच विचार शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक आणि पाउलो फ्रीअरी यांनी मांडला होता. 'शिक्षणहक्क चळवळी'चे हे काम आज 'अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा' पुढे नेत आहे आणि त्यात शरद जावडेकर यांचा वाटा मोठा आहे.*

के. जी. टू पी. जी. सर्वांना मोफत, समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी गेली २५ वर्षे सातत्याने काम करीत आहेत.

डॉ. शरद जावडेकर यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील इंदापूर असले तरी त्यांचे वडील शिक्षण खात्यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक व नंतर शिक्षण अधिकारी अशा वेगवेगळ्या पदांवर असल्यामुळे त्यांच्या सतत बदल्या होत असत. त्यांचे शालेय शिक्षण पनवेल व कर्जत (जिल्हा रायगड, जुना जिल्हा कुलाबा) येथे झाले आहे. त्यांच्या जडणघडणीत त्यांचे वडील जनार्दन जावडेकर यांचा प्रभाव असल्याचे ते सांगतात. त्यांचे वडील पूर्ण नास्तिक असल्यामुळे तार्किकपणे विचार करायची सवय त्यांनी वडिलांकडून घेतली असावी. त्यांच्या वडिलांनी साने गुरुजी यांची भाषणे ऐकली होती. त्यामुळे त्यांच्या बोलण्यात साने गुरुजी, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, शिरुभाऊ लिमये यांचे संदर्भ सतत येत असत. त्यामुळे त्यांच्याही नकळत ही नावे त्यांच्या मनात रुजत गेली, तसेच 'अनेक वर्षं माझा पोशाख धोतर, नेहरू शर्ट आणि गांधी टोपी असा 'साने गुरुजी छाप' असायचा,' असे ते म्हणतात.

शरद जावडेकर यांचे कॉलेजचे शिक्षण हे औरंगाबाद येथे 'सरस्वती भुवन कॉलेज ऑफ आर्ट्स व सायन्स'मध्ये झाले. कॉलेजच्या चार वर्षांत औपचारिक शिक्षणापेक्षा त्यांचे अनौपचारिक शिक्षण जास्त झाले. १९७०मध्ये औरंगाबाद हे दलित पँथरचे केंद्र होते. त्यामुळे सामाजिक विषमता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान यांची चांगली ओळख त्यांना तेथे झाली, एक नवी दृष्टी मिळाली. त्याचबरोबर हमीद दलवाई, नरहर कुरुंदकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना. य. डोळे, गोविंदभाई श्रॉफ, ए. बी. वर्धन, बापू काळदाते, पा. वा. गाडगीळ, कुमार सप्तर्षी, धनंजय कीर, दै. मराठवाडाचे संपादक अनंत भालेराव यांचे विचार ऐकणे ही कॉलेज बाहेरची विचारांची मोठी मेजवानीच असायची. कॉलेजमधील बहुसंख्य प्राध्यापक समाजवादी, गांधीवादी, मार्क्सवादी परंपरेतील होते. त्यामुळे 'युवक क्रांती दला'कडे त्यांचा ओढा राहिला.

त्यांचे वडील तेव्हाच्या औरंगाबाद जिल्हा, अंबड तालुक्यात, घनसावंगी गावात मुख्याध्यापक म्हणून नोकरीला होते. निजामशाहीतील ते सरंजामी स्वरूपाचे गाव होते. दलितांची वस्ती गावाबाहेर

होती. त्यांचे वेगळे पाणवठे होते. गावातील देशमुखांची किल्लेवजा मोठी गढी होती. ते सतत करत असलेले आर्थिक, सामाजिक शोषण पाहणे किंवा हगणदारीमध्ये मेलेल्या बैलाचे मांस घेण्यासाठी उडालेली माणसांची झुंबड पाहणे हे अनुभव त्यांच्या ब्राह्मणी मध्यमवर्गीय चौकटीला हादरून टाकणारे होते. त्यामुळे त्यांच्या मनावर समाजवाद व आंबेडकरवाद याचा समान प्रभाव झाला असावा.

एम.कॉम.साठी शरद जावडेकर वाडिया कॉलेजमध्ये आले व त्यांची पहिली ओळख अन्वर राजन यांच्याशी झाली. आणीबाणीत अन्वर राजन यांना मिसा खाली अटक झाली होती. त्यावेळी इंदिरा गांधी यांनी लोकशाहीची उघड गळचेपी केली. विरोधी पक्षांच्या राजकीय नेत्यांची धरपकड सुरू झाली होती. याच्या विरोधात काही करायला पाहिजे, असे जावडेकर यांना वाटत असल्यामुळे त्यांनी 'आणीबाणीच्या विरोधात सत्याग्रह' केला होता. तेव्हा एक महिन्याची कैद व रुपये शंभर दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांची कैद, अशी दीड महिन्याची शिक्षा होऊन, येरवडा कारागृहात त्यांची रवानगी झाली. परंतु त्यांच्यासाठी येरवडा जेल हे 'येरवडा विद्यापीठ' ठरले. तेथे त्यांना मा. भाई वैद्य, बाबा आढाव, ग. प्र. प्रधान, कुमार सप्तर्षी, सदाशिव बागाईतकर, बा. न. राजहंस, सदानंद वर्दे इत्यादी नेत्यांची केवळ भाषणे ऐकायला मिळाली नाहीत तर त्यांच्या बरोबर चर्चादेखील करायला मिळाल्या. त्यामुळे लोकशाही समाजवादाची चांगली ओळख त्यांना झाली. नंतर झालेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या सत्याग्रहात देखील त्यांचा सहभाग होता.

एम.कॉम. व पीएच.डी. करून ते नेस वाडिया महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्या काळात 'साधना'चे संपादक ग. प्र. प्रधान सरांनी त्यांना लिहिण्यास प्रोत्साहन दिले. साधना साप्ताहिक, दै. सकाळ, महाराष्ट्र टाईम्स इत्यादी वृत्तपत्रांत आणि विविध मासिक-साप्ताहिकांत ते आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांवर सतत लिखाण करत आले आहेत.



१९९०च्या सुमारास जागतिकीकरणाची त्सुनामी जी भारतात आली त्या लाटेत शिक्षणक्षेत्रही सापडले होते. तेव्हा भाई वैद्य हे, जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात 'शिक्षण प्रश्नाची' वेगळी मांडणी करत होते. 'के.जी. ते पी.जी. सर्व शिक्षण समान व गुणवत्तापूर्ण असले पाहिजे आणि प्रत्येक बालकाला ते मोफत मिळाले पाहिजे,' अशी घोषणा भाईंनी दिली होती, त्या मागची सैद्धांतिक भूमिका भाई मांडत होते. इ.स. २०००मध्ये भाई वैद्य यांनी अधिकृतपणे अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेची (सध्याची अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा) स्थापना केली. डॉ. शरद जावडेकर हे या संघटनेशी तिच्या स्थापनेपासून जोडले गेले. गेली २५ वर्षे ते या एकाच प्रश्नावर लिखाण, जनजागृती, रस्त्यावरची आंदोलने, सत्याग्रह या मार्गांनी ही चळवळ पुढे नेत आहेत. भाईंबरोबर अख्ख्या महाराष्ट्रभर ते फिरले. २०१४पासून 'शिक्षण हक्क पत्रिके'चे संपादक म्हणून ते काम पाहत आहेत.

२००९ साली अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेने बालकांच्या शिक्षण हक्काच्या मागणीसाठी देशभर सत्याग्रह केले होते. सन २०१५मध्ये केंद्र सरकारच्या, सदोष असलेल्या 'सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण हक्क कायद्या'त सुधारणा करावी, म्हणून अध्यापक सभेने दुसरा सत्याग्रह केला. पुण्यातल्या सत्याग्रहाची संपूर्ण तयारी करून ते भाई वैद्य यांच्याबरोबर सत्याग्रहात उतरले होते. सन २०१६मध्ये औरंगाबादचे अजमल खान यांनी आयोजित केलेल्या ८ जिल्ह्यांच्या 'मराठवाडा शिक्षण हक्क जनजागरण यात्रे'त त्यांचा सहभाग होता. २०१७मध्ये विदर्भातील प्रा. राजाभाऊ महाजन यांनी 'पश्चिम विदर्भ शिक्षण जन जागरण यात्रा' आयोजित केली होती. त्यातही त्यांचा सहभाग होता. 'शिक्षण हक्क आंदोलना'ला संघर्षाची धार देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. 'शिक्षण हक्क कायदा', त्यातील सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकांच्या मुलांना असणारी २५ टक्के आरक्षणाची तरतूद व त्याची अंमलबजावणी हा मुद्दा २०१०पासून 'अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभे'ने लावून धरला आहे. शिक्षण अधिकारी, शिक्षण संचालक यांच्याकडे पालकांना



बरोबर घेऊन चर्चा करणे आणि पालकांना त्यांच्या कायदेशीर हक्काची जाणीव करून देणे, त्याच बरोबर त्यांना निर्भय बनवणे हा खटाटोप संघटना सातत्याने करत आलेली आहे. त्यासाठी रस्त्यावरच्या आंदोलनाचा मार्ग निवडला जावा, असाच प्रयत्न शरद जावडेकरांचा राहिलेला आहे.

२५ टक्के आरक्षणाच्या संदर्भात एक महत्त्वाची घटना म्हणजे फेब्रुवारी ते ऑगस्ट २०२४मध्ये झालेली महाराष्ट्र सरकारच्या विरोधातील कायदेशीर लढाई. प्रथम मुंबई उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात केलेल्या या कायदेशीर लढाईचा तपशील असा - ९ फेब्रुवारी २०२४मध्ये महाराष्ट्र शासनाने ‘२५ टक्के आरक्षणाचे नियम खाजगी विना अनुदानित शाळांना लागू होणार नाही व सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना सरकारी शाळेतच प्रवेश घ्यावा लागेल’ असे एका अधिसूचनेद्वारे जाहीर केले. याचा अर्थ, गरिबांच्या आणि श्रीमंतांच्या शाळा सरकारने वेगवेगळ्या केल्या. ही अधिसूचना ‘समतेच्या व समान संधीच्या’ मूल्याच्या विरोधी तर होतीच, पण घटनेच्याही विरोधातील होती आणि शिक्षण हक्क कायद्याची देखील ‘कक्षा’ ओलांडणारी होती. डॉ. शरद जावडेकर व इतर संघटनांनी मोर्चा काढून शिक्षण खात्याला ही अधिसूचना मागे घ्यावी म्हणून निवेदन दिले, पण सरकारवर त्याचा परिणाम झाला नाही. म्हणून शरद जावडेकर, सुरेखा खरे, रमेश पाटील आणि विद्यार्थ्यांचे पालक यांनी महाराष्ट्र शासनाच्या विरोधात एक जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली. पहिल्या सुनावणीत कोर्टाने महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाला स्थगिती दिली व तिसऱ्या सुनावणीमध्ये महाराष्ट्र शासनाची व खाजगी विना अनुदानित शाळांची बाजू उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. महाराष्ट्र शासनाने ९ फेब्रुवारी रोजी काढलेली अधिसूचना ही ‘घटनाबाह्य’ आहे, असे म्हटले. त्यानंतर ‘इंडियन असोसिएशन ऑफ स्कूल’ ही संस्था सर्वोच्च न्यायालयात गेली. ‘अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा’ हा एक पक्ष न्यायालयात होता. सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला व महाराष्ट्र शासनाची २५ टक्के आरक्षणाची अधिसूचना रद्द केली. या निर्णयाचा फायदा समाजातील वंचित व दुर्बल घटकातील एक लाखापेक्षा जास्त मुलांना मिळाला



आहे. महाराष्ट्रात सन २०१२पासून २०२३पर्यंत २५ टक्के आरक्षणाच्या तरतुदीनुसार जवळजवळ आठ लाख मुलांना मोफत शिक्षणाचा फायदा मिळाला आहे. आणि तो फायदा अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या कायदेशीर लढाईमुळे भविष्यातही मिळणार आहे.

तसेच 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' व 'राज्य अभ्यासक्रम आराखडा' हे त्यांच्या जनजागृतीचे विषय राहिले आहेत. यासाठी महाराष्ट्रभर त्यांची भ्रमंती राहिली आहे. २०१८मध्ये भाई वैद्य यांचे देहावसान झाले, त्यानंतर कोरोना काळात संघटनेचे अध्यक्ष जयवंतराव ठाकरे यांचे निधन झाले. त्यानंतर २०२२मध्ये रमेश पाटील हे संस्थेचे अध्यक्ष व शरद जावडेकर हे कार्याध्यक्ष झाले. एकूणच जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात भारतातील शैक्षणिक परिवर्तनाचा संबंध भाईंनी राजकीय आणि आर्थिक प्रश्नांशी जोडला आहे. यापुढेही बहुजनांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर होत जाणार आहे आणि त्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षणासंदर्भातील सर्व संबंधित घटकांना एकत्र करून संघर्षाची धार मजबूत केली पाहिजे आणि त्यासाठी जनआंदोलन उभे केले पाहिजे, असे भाई म्हणायचे. हाच विचार शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक आणि पाउलो फ्रीअरी यांनी मांडला होता. 'शिक्षणहक्क चळवळी'चे हे काम आज 'अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा' पुढे नेत आहे आणि त्यात शरद जावडेकर यांचा वाटा मोठा आहे.

**डॉ. शरद जावडेकर यांनी संपादित केलेली पुस्तके अशी :**

'सामाजिक परिवर्तन : चिकित्सा व परिवर्तन (भा. शं. भणगे गौरव ग्रंथ)' : शरद जावडेकर, वसुधा जोशी, लता जाधव, रवींद्र म्हसदे, सुगावा प्रकाशन, २००९

'बहुजनांचे शिक्षण : वास्तव व अपेक्षा' : शरद जावडेकर, विशाखा खैरे, शमशुद्दीन तांबोळी, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०११

'विद्यार्थिविरोधी आणि फसवा बालकांचा मोफत व सक्तीचा प्राथमिक शिक्षण हक्क कायदा २००९,' शरद जावडेकर आणि रमेश पाटील, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०१५

'मोदी सरकारची शैक्षणिक अंदाजपत्रके', शरद जावडेकर, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०१८

'के.जी. ते पी.जी. मोफत शिक्षण शक्य आहे', शरद जावडेकर, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०१९

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : भाषा पसायदानाची, कृती द्रोणाचार्याची', शरद जावडेकर आणि रमेश पाटील, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०२०

'समाजवादी शिक्षणहक्कासाठी लढा (भाई वैद्य यांच्या शैक्षणिक भाषणांचे संकलन)' संपादक : शरद जावडेकर, रमेश पाटील, सुरेखा खरे, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, २०२१

**सुरेखा खरे**

९८८१०३६७८५

ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक)

# अंजली चिपलकट्टी

## अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं पुस्तक 'माणूस असं का वागतो?'

□

वीणा गवाणकर



*हे पुस्तक विज्ञानावर आधारित असूनही रोचकपणे सहज भाषा-शैलीत सादर करण्यात ती कमालीची यशस्वी ठरली. पुस्तक वाचत असताना वाचकाला आपलं वाचन मध्येच थांबवून विचार करायला भाग पडण्याची ताकद या लेखनात आहे. एका दमात ते वाचून संपवता येत नाही. आपले आधीचे अनुभव, धारणा, आपले पूर्वीचे वाचन यांचा नव्याने अर्थ शोधायला भाग पाडतं. सभोवती घडत असणारे; घडवले जात असणारे राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक बदल याविषयी नव्याने विचार करायला लावतं.*

सर्वप्रथम अंजलीचं मन:पूर्वक अभिनंदन. तिनं लिहिलेल्या ‘माणूस असा का वागतो?’चा खर्डा वाचला तेव्हाच हे पुस्तक आपलं अस्तित्व ठळकपणे जाणवून देणार, याचा अंदाज आला होताच. आणि त्या पुस्तकाला मिळत आलेल्या उदंड प्रतिसादाने आणि पुरस्कारांनी तो अंदाज खराही ठरवला.


अंजली ही लोकसत्ता वृत्तपत्रात ‘थांग वर्तनाचा’ (२०२१) या शीर्षकाचे सदर लिहित असे. ते मी न चुकता, नियमितपणे वाचत असे. त्याच काळात मी कधीतरी तिला ई-मेल लिहिली आणि ‘तू लिहितेस तो ऐवज मोलाचा आहे, पुस्तकरूपात अधिक विस्तारानं हा विषय मांडावास,’ असं कळवलं. त्या ई-मेलमुळे आमची ओळख झाली. संवाद सुरू झाला. आणि प्रत्येक वेळी मी चकित व्हावं अशीच तिची माहिती मला मिळत गेली. तिचा आजवरचा वैचारिक आणि कृतिशील प्रवास खरोखरच स्पृहणीय आहे.

अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम पार पाडत असताना टिपिकल नोकरी करायची नाही, असं तिच्या मनात होतं. त्यानुसार पदवी मिळताच तिने पाबळच्या विज्ञान-आश्रमात समुचित तंत्रज्ञान क्षेत्रात काम करता येईल, या दृष्टीने काही प्रकल्प विकसित केले. ते प्रत्यक्षात उतरवताना यशापयशाचा अनुभव घेतला. डॉ. कलबाग यांच्याकडून तिला ‘self-learning by doing' बद्दल एक वेगळी दृष्टी मिळाली. पुढे भारतीय संरक्षण व्यवस्थेसाठी भारतात प्रथमच स्वदेशी बनावटीची नवीन यंत्रे विकसित करण्याची संधी तिला मिळाली. त्यावेळी डिझायनिंगपासून मॅन्युफॅक्चरिंगपर्यंत, ट्रायल टेस्टिंग ते कमिशनिंगपर्यंतची सर्व कामे तिने हाताळली. ‘इंजिनिअरिंग रिसर्च’मध्ये काम करताना अनेक क्षमता विकसित करता आल्या आणि तिचा आत्मविश्वास वाढत गेला. याकाळात डॉ. अब्दुल कलाम यांच्यासोबत काही रिव्ह्यू-मीटिंग दरम्यान चर्चा करण्याची संधी मिळाली, हे ती अभिमानाने सांगते.

नंतर अंजलीने कॉम्प्युटर क्षेत्रात शिक्षण घेऊन आयटी क्षेत्रात पदार्पण केले. या काळात परदेशात असताना तिने मोठे पोर्टफोलिओ सांभाळले. ११ वर्षे आयटी क्षेत्रात काम केल्यानंतर तिने शिक्षणक्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. परदेशात असताना तिथल्या काही शाळांमध्ये केलेल्या निरीक्षणातून

असं लक्षात आलं की, मुलांना तिथे एक 'छोटी स्वतंत्र व्यक्ती' अशा दृष्टीने बघितलं जातं. विशेषत: शिक्षक ज्या प्रकारे मुलांशी बोलतात त्यात लहान मुलांबद्दल असलेला आदरभाव, समानतेचा दर्जा, 'तुला काय कळतंय?' असा भाव नसणं, या फार महत्त्वाच्या गोष्टी तिला कळल्या. यातून भारतातल्या शिक्षणव्यवस्थेत नेमके कोणते बदल हवेत, याचा अभ्यास सुरू झाला. भारतातल्या अनेक प्रायोगिक शाळा, नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क NCF 2005 याचा अभ्यास करताना अनेक नवीन गोष्टी तिला कळत होत्या. मग मुलांबरोबर विज्ञान कार्यशाळा घेण्याचं काम स्थानिक पातळीवर सहजपणे सुरू झालं. मुलांची निरीक्षण करत, बदल करत, संवादी पद्धतीने जिज्ञासा आणि शिकण्याची ऊर्मी कशी जागवता येईल, यावर अनेक प्रयोग सुरू झाले. त्याकाळात पश्चिम महाराष्ट्रापासून विदर्भातले ग्रामीण व शहरी भाग, त्याचप्रमाणे राज्याबाहेर मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान, कर्नाटक असे अनेक दौरे करताना अनुभव मिळत गेले. त्याच सुमारास मुलं कशी शिकतात आणि त्याचा मेंदूशी असलेला संबंध, यावर वाचन सुरू झालं. यातून 'सायंटिफिक इन्क्वायरी' अर्थात, जिज्ञासा जागवून विज्ञान अधिक चांगलं कसं शिकता येतं, त्याची एक पद्धत तिला गवसत गेली. हे सर्व करत असताना तिला वेगवेगळ्या ज्ञानशाखांच्या एकत्रित अभ्यासाची गरज समजत गेली आणि तिचं वाचन विस्तारत गेलं.

तिचा सजीवांच्या 'मेकॅनिजम'चा अभ्यास सुरू झाला तो मूल (अर्थात माणूस) शिकतं कसं आणि मानवी जाणीव कशातून आकार घेते, या मूलभूत प्रश्नांचा मागोवा घेण्यातून. कुतूहलापोटी जेनेटिक्सच्या अभ्यासाने झालेली सुरुवात नंतर उत्क्रांती, मेंदू-विज्ञान, समाज-विज्ञान अशी विस्तारत गेली. त्यातून मानवी वर्तनाविषयीचा मोठा पट उलगडू लागला. वर्तनाची मूळं शोधण्यासाठी जनुकं, मेंदू आणि पर्यावरण यांच्यातले बहुपेडीय आंतरसंबंध अभ्यासावे लागणार हे तिच्या लक्षात आलं. तिनं त्या अभ्यासावर आधारित 'थांग वर्तनाचा' ही लेखमाला लोकसत्ता वृत्तपत्रात लिहिली. हाच मानवी वर्तनाचा विषय केंद्रस्थानी ठेवून तिने 'माणूस असा का वागतो?' हे पुस्तक विस्तृत स्वरूपात लिहिलं.




इंजिनिअर असूनही तू या जैवविज्ञान, मेंदूविज्ञानाचा अभ्यास कसा काय केलास, असं विचारल्यावर तिने दिलेलं उत्तर मला वैशिष्ट्यपूर्ण वाटतं. माणूस कित्येक वर्षांपासून ज्ञाननिर्मिती करतो आहे. अभ्यास करताना सोयीचं जावं म्हणून आपण ज्ञान वेगवेगळ्या गटांमध्ये विभागतो. अर्थातच, यामुळे त्या विशिष्ट ज्ञानशाखेतील ज्ञानाची खोली वाढत जाते. हे आवश्यकच असतं. मात्र यात एक धोका असा असतो की, वेगवेगळ्या शाखा एकमेकांपासून दुरावतात. असं होऊ नये म्हणूनच आंतरविद्याशाखीय

(इंटर-डिसिप्लिनरी) आणि बहुविद्याशाखीय (मल्टी-डिसिप्लिनरी) अभ्यास आवश्यक ठरतात. कारण निसर्गात असे गट-तट नसतात. तिलाही नेहमी अशा विविध ज्ञानशाखांच्या बेचक्यात असणारे आणि ज्ञानशाखांच्या एकत्रित अभ्यासातून कळणारे विषय अधिक खुणावतात. कदाचित म्हणूनच मानवी वर्तनासारख्या बहु-ज्ञानशाखीय विषयाचा अभ्यास करणं तिला आवडलं असावं.

या तिच्या पहिल्याच पुस्तकानं मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. पुस्तक विज्ञानावर आधारित असूनही रोचकपणे सहज भाषा-शैलीत सादर करण्यात ती कमालीची यशस्वी ठरली. पुस्तक वाचत असताना वाचकाला आपलं वाचन मध्येच थांबवून विचार करायला भाग पडण्याची ताकद या लेखनात आहे. एका दमात ते वाचून संपवता येत नाही. आपले आधीचे अनुभव, धारणा, आपले पूर्वीचे वाचन यांचा नव्याने अर्थ शोधायला भाग पाडतं. सभोवती घडत असणारे; घडवले जात असणारे राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक बदल याविषयी नव्याने विचार करायला लावतं.

व्यक्तीचे अंगभूत गुणधर्म आणि पर्यावरण यांच्या एकत्रित परिणामामुळे माणसाचं वर्तन घडतं, याची चांगली चर्चा पुस्तकात आहेच; पण त्याचवेळी ज्या पर्यावरणामुळे माणूस घडतो, त्यातला सांस्कृतिक पर्यावरणाचा भाग खुद्द तो स्वत:च घडवत असतो, ह्यावरही विस्तृत वैज्ञानिक मांडणी पुस्तकात आहे. आपल्या वैयक्तिक वर्तनाचा कर्ता आपणच आहोत, असं वाटत असलं तरी आपल्या वृत्ती आणि वर्तनावर प्रभाव पडावा असं सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण घडवलं जात आहे, याची आपल्याला नीटशी कल्पना नसते. हे प्रभाव कसे ओळखावेत, याची चर्चा पुस्तकात आहे. माणूस हा एकमेव प्राणी आहे जो स्वत:चं पर्यावरण घडवू शकतो. त्यामुळे स्वत:साठी आणि पुढच्या पिढ्यांच्या विकासासाठी कोणतं सामाजिक पर्यावरण पोषक आहे, याचा निर्णय घेण्याची आणि तो निभावण्याची जबाबदारी आपलीच आहे, असं हे पुस्तक सतत सांगत राहतं. वाचता वाचता अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं हे पुस्तक वैचारिक तितक्याच भाषिक, पारिभाषिक संज्ञांचं उपयोजन, तर्कशुद्ध मांडणी आणि सुलभ विवेचन या अंगानेही विशेष लक्षणीय झालं आहे.

लेखनाबरोबरच अंजली इतरही अनेक क्षेत्रांत कार्यरत आहे. शिक्षणव्यवस्थेत वैज्ञानिक आणि चिकित्सक विचारपद्धती रुजवण्यासाठी अनेक संस्था, शाळा, महाविद्यालयांबरोबर ती वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभ्यासक्रमात समावेश करणे, मुले आणि शिक्षकांसाठी कार्यशाळा घेणे असे विविध उपक्रम पार पाडत असते. तिचे सेंद्रिय शेतीचेही अनेक प्रयोग चालू असतात. शेतात अंग मोडून काम केलं की मन शांत होतं आणि नवीन सुचत राहतं, असं ती म्हणते. यासोबतच ट्रेकिंग, कुंभारकाम, निसर्ग-वाचन, झाडांचा अभ्यास या आपल्या आवडीही ती जोपासते.

एकंदरीतच विविधांगी अनुभव घेण्याची आणि जगण्याला सर्जकतेने भिडण्याची तिची उत्कट इच्छा जाणवत राहते. यापुढेही तिने असंच सकस लिहित राहावं ही शुभेच्छा!

**वीणा गवाणकर**
७८७५३०१४०२

कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)

# डॉ. रुपेश पाटकर
## एक मानवतावादी मनोवैज्ञानिक

□

संतोष पुरोहित



*आपला जीवनप्रवास हा केवळ स्वत:पुरता सीमित न ठेवता तो समष्टीसाठी आहे, या धारणेतून रुपेश पाटकर यांनी सभोवतालासोबत जोडून घेतले आहे. त्यांच्यातील मानवतावादी वृत्ती ही त्यांच्या कुटुंबातील सामाजिक कार्याच्या वारशाचीच निसर्गदत्त देणगी आहे.*

मानसोपचार तज्ज्ञ, संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता तसेच लेखक आणि व्याख्याते असे डॉ. रुपेश पाटकर म्हणजे सर्वोदयी ऋजु व्यक्तिमत्त्व. त्यांचे विनम्र आणि संयत व्यक्तिमत्त्व त्यांच्या कार्याला अधिकच उज्ज्वल करते.

तळ कोकणातील गोवा राज्याच्या सीमेला वसलेले बांदा हे गाव. गावातील मातीचे घर. प्रथम दर्शनी भिंतीवर रेखीव वारली शैलीतील चित्र. आजूबाजूला असलेली नारळ, फणस आणि आंब्याच्या बागा आणि निसर्गत: वाढलेली झाडी जितकी आश्वासक, तेवढेच डॉ. रुपेश पाटकर हे प्रत्येकाला आश्वासक वाटतात, 'आपले' वाटतात.

आपला जीवनप्रवास हा केवळ स्वत:पुरता सीमित न ठेवता तो समष्टीसाठी आहे, या धारणेतून रुपेश पाटकर यांनी सभोवतालासोबत जोडून घेतले आहे. त्यांच्यातील मानवतावादी वृत्ती ही त्यांच्या कुटुंबातील सामाजिक कार्याच्या वारशाचीच निसर्गदत्त देणगी आहे.

त्यांचे पणजोबा हे कोकणातून फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहिले होते. याचबरोबर पणजोबा आणि आजोबा यांनी स्वातंत्र्य लढाईत तुरुंगवासही भोगला होता. ज्यांना 'कोकण गांधी' असं म्हटलं जातं, त्या आप्पासाहेब पटवर्धन यांच्या चलन शुद्धी कार्यात त्यांचे वडील सक्रिय सहभागी होते. गोवा मुक्ती लढ्यातील अनेक कार्यकर्ते त्यांच्या घरी राहून गेलेले आहेत. या सर्वातून त्यांची जडणघडण होत गेली. डॉ. पाटकर यांच्या तीन पिढ्या व्यवसायामध्ये स्थिरस्थावर झालेल्या. आई-वडील बागायतदार, मात्र 'नैतिकतेशिवाय व्यवसाय फक्त पैशाची कमाई करण्याचे साधन बनून राहतो', असं त्यांना वाटायचं. बागेतील काजूची बोंडे (फळे) दारू बनविण्याकरता वापरली जातात आणि सुपारीचे व्यसन लागते म्हणून त्यांनी या दोन गोष्टींची कधीच विक्री केली नाही. आजही हा वारसा डॉक्टर पुढे नेत आहेत.

कृष्णा मेडिकल कॉलेज, कराड येथून एम.बी.बी.एस. आणि नंतर आर. जी. मेडिकल कॉलेज, ठाणे येथून त्यांनी मानसोपचार शास्त्रातील डी.पी.एम. हे पुढील शिक्षण घेतले. त्यांनी डॉक्टर व्हावे ही त्यांच्या वडिलांची तीव्र इच्छा होती. मात्र डॉक्टर का व्हावे, याबाबत ते स्पष्ट होते. 'गरिबांना मदत करण्यासाठीच तुला डॉक्टर व्हायचे आहे. तुझ्याकडून दुसरी काहीही अपेक्षा नाही. आमची सोय आम्ही बघू. आणि जोपर्यंत जिवंत असू तोपर्यंत आम्ही तुझाही उदरनिर्वाह पाहू.' या त्यांच्या अपेक्षेला



अनुसरून रुपेश पाटकर हे डॉक्टर या व्यवसायाच्या रूढ प्रतिमेला छेद देत कार्य करत आहेत. मागील दोन दशकांहून अधिक काळ ते मानसिकदृष्ट्या आजारी पेशन्ट्सची मोफत तपासणी करतात. जोपर्यंत वडील जिवंत होते, तोपर्यंत तेच घरखर्च भागवीत असत. मात्र ते गेल्यानंतर आर्थिक प्रश्न उभे राहिले. मग डॉक्टर रुपेश यांनी काही काळ नोकरी केली. मात्र थोडे पैसे जमा झाले की ते नोकरी सोडायचे आणि आपले मोफत रुग्ण तपासणीचे कार्य पुन्हा सुरू करायचे. आपले पेशन्ट गरीब कुटुंबातील असतात. त्यातच मानसिक आजार झाल्यामुळे रोजगार मिळत नाही. याशिवाय आवश्यक उपचार अनेकदा दीर्घकाळ करावे लागतात. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या पेशंटच्या नातेवाइकांकडून पैसे घेणे त्यांना अयोग्य वाटते. गेल्या वीस वर्षांत किमान तीन हजार पेशन्टना त्यांनी मोफत सल्ला दिला आहे आणि हे सारे आपल्या ज्ञानाचे समाजाप्रती देणे आहे, या भावनेने सुरू आहे.

आपल्या जडणघडणीत घरातील आध्यात्मिक वातावरणाचा फार मोठा वाटा असल्याचे ते आवर्जून सांगतात. रुपेश पाटकर यांनी 'माझ्या आईची गोष्ट', 'अर्जमधले दिवस', 'ओपन युवर हार्ट', 'शोध धर्मानंदांचा', 'अंदमानचे क्रांतिकारक', 'कुमारांशी संवाद', 'संस्कार संचित', 'स्वभावचित्र' इत्यादी पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांना आलेले अनुभव हेच त्यांच्या लिखाणामागील प्रेरणा आहेत.

'अर्ज' अर्थात 'अन्याय रहित जिंदगी' या गोवा राज्यातील वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांसोबत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेसोबत काम करताना त्यांना आलेल्या अनुभवांवर आधारित 'अर्जमधले दिवस' हे पुस्तक आहे. आपले हे पुस्तक म्हणजे 'समाजातील एका बोलू न शकणाऱ्या गटाची वेदना आहे,' असं नमूद करून डॉक्टर पुढे म्हणतात, 'सायकीअट्रिस्ट म्हणून त्यांच्यात केलेल्या या कामाने मी अधिकाधिक अंतर्मुख होत गेलो. देहविक्रयात अडकवण्यात आलेल्या महिला ना वाईट चालीच्या असतात, ना त्यांना लैंगिक विकृती असते. त्या एका संघटित गुन्हेगारीच्या बळी असतात.




त्यांच्याविषयीचे पूर्वग्रह त्यांचे प्रमुख प्रवाहात येणे अडवून ठेवतात. त्यांना देहविक्रयातून मुक्त करायचे असेल तर त्यांना आर्थिक पुनर्वसन पुरवण्यासोबत भक्कम सामाजिक आधाराची गरज आहे.' हाच विचार हे पुस्तक अधोरेखित करते.

याच सोबत त्यांनी विविध विषयांवर आधारित लिखाण केले आहे. त्यांचे लिखाण अतिशय ओघवत्या, सोप्या भाषेत आहे. त्यात लेखक समाजाचे प्रतिबिंब समोर ठेवतो. डॉक्टरांमधील 'एक सामाजिक कार्यकर्ता' ही भूमिका त्यांच्या सर्वच पुस्तकांमधून ठसठशीतपणे पुढे येते.

मानसोपचार तज्ज्ञ झाल्यावर खरं तर त्यांना रचनात्मक कार्य सुरू करायचे होते, मात्र त्यांच्या बागेची जमीन गॅस पाइप लाईन करता अधिग्रहित करण्यात येणार होती. आपल्या सारख्याच अनेक शेतकरी बांधवांना याच समस्येला सामोरे जावे लागत होते. अशा वेळी आई-वडील यांनी सुरू केलेला संघर्षात्मक लढा आणि त्यात सामील झाल्यानंतर आलेले अनुभव यातून त्यांना नवा दृष्टिकोन मिळाला. विशेषत: एरवी घर आणि कुटुंब यात रमलेल्या त्यांच्या आईने घेतलेली खंबीर भूमिका, वैचारिक बैठकीसाठी 'दास कॅपिटल'सारखे पुस्तक वाचत असताना केलेल्या चर्चा यातून त्यांना प्रेरणा मिळत गेली. विशेषत: मायनिंग विरोधी लढ्याला आईने दिलेली साथ, थेट मेधाताई पाटकर यांना भेटून मिळविलेला पाठिंबा हे सारे त्यांनी आपल्या 'माझ्या आईची गोष्ट' या पुस्तकातून ओघवत्या शैलीमध्ये मांडले आहे.

गोवा हे पर्यटनदृष्ट्या आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध राज्य; मात्र येथील लहान मुलांच्या सर्वेक्षणामध्ये कातकरी या आदिवासी समाजातील लहान मुले कुपोषित आढळली. त्यांचे हिमोग्लोबिन अत्यंत निम्न स्तरावर आढळले. तेव्हा डॉ. रुपेश पाटकर यांनी 'पूरक आहार योजना' सुरू केली. मूलभूत नागरी हक्कांपासून कोसो दूर असलेल्या या घटकातील भावी पिढी सुदृढ आणि सक्षम असावी, या हेतूने सुरू

केलेले हे कार्य अगदी कोरोना काळातही सुरू होते. या मुलांना नागरी जीवनाची ओळख व्हावी म्हणून त्यांना आपल्या घरी आणून त्यांनी सण साजरे केले. अशा कार्यात आपल्यासोबत आपल्या कुटुंबालाही सामील करून घेणे हे लहानपणापासून त्यांनी अनुभवले आहे. अशा सामाजिक विषयांवर ते आपली पत्नी आणि सहावी मध्ये शिकत असलेल्या मुलीसोबतही वारंवार चर्चा करत असतात.

मागील काही वर्षे ते 'कुमारवयीन मुलांचे मानसिक आरोग्य' यावर सातत्याने काम करत आहेत. अर्थात, हे काम बहुतांशी गोवा राज्यात असले तरी आता सिंधुदुर्ग जिल्ह्यातही हे काम चालू आहे. व्यसने, शारीरिक आकर्षणाला प्रेम समजणे आणि त्यातून टोकाचे निर्णय घेणे यासारख्या समस्या कुमारवयीन मुलांच्यात मोठ्या प्रमाणात दिसू लागल्या आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून ते नववी इयत्तेतल्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्रे घेत आहेत. कोरोनाच्या काळात त्यांनी म्हापसा येथील जिल्हा रुग्णालयात काम केले. तेव्हा उत्तर गोव्यातील पाच तालुक्यांतील सर्व मुख्याध्यापकांसाठी त्यांनी 'मार्गदर्शन कार्यशाळा' घेतल्या होत्या. मार्क्सवादाचा अभ्यास करत असताना पाटकर यांनी श्रमिकांसोबत जोडून घेत पाच वर्षे कामगार चळवळीमध्ये पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम केले.

बिल्किस बानो बलात्कार प्रकरणातले आरोपी सुटल्यानंतर त्यांचे ज्या पद्धतीने स्वागत झाले त्याने व्यथित झालेल्या पाटकर यांनी आत्मक्लेश म्हणून कोकणात घरोघरी साजरा होणाऱ्या गणपती उत्सवात सहा दिवस उपवास केला. आपल्या आजूबाजूच्या आपल्याच माणसांतील द्वेष भावना कमी व्हावी आणि भागवत धर्माची करुणा आणि प्रेम ही परंपरा वृद्धिंगत व्हावी, हाच त्या मागचा उद्देश होता.

मुळातच डॉक्टरांचा जन्म हा निसर्गसंपन्न कोकणातील असल्याने त्यांचा निसर्गाकडे ओढा असणे हे स्वाभाविकच आहे. मात्र गोलमन यांच्या 'इकॉलॉजिकल इंटेलिजन्स' या पुस्तकाच्या वाचनाने आणि पर्यावरण पूरक जीवनशैली जगणाऱ्या अनेकांना भेटल्यावर 'आपल्या जगण्याचा निसर्गावर कमीतकमी ताण येईल,' असे जगण्याचा निश्चय त्यांनी केला. आज ते त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करत असतात. राज्य प्राणी शेकरू याची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. अशावेळी आपल्या





बागेत शेकरू दिसले असता त्यांना नैसर्गिक अधिवास प्राप्त व्हावा या हेतूने त्यांनी आपल्या बागेमध्ये कोणतीही तोड केलेली नाही. आपली बाग जशीच्या तशी ठेवलेली आहे. ते सध्या ज्या घरात राहतात, ते १९५२ साली बांधलेले मातीचे घर आहे.

भगतसिंग यांच्यावर व्याख्यान देत असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. हा मृत्यू त्यांना एकाकी करून गेला. मात्र त्यांच्या आईने त्यांना खंबीर बनविले. त्यांनी वडिलांचे कोणतेही कर्मकांड केले नाही. मृत्युपूर्वी वडील क्रोपोत्कीन यांचे 'तरुणांनो काय बनायचे आहे तुम्हाला?' हे पुस्तक वाचत होते. त्या पुस्तिकेच्या १००० प्रती मोफत वाटण्याचा आईने संकल्प केला. हा संकल्प त्यांना जगण्याची नवीन दिशा देऊन गेला.

'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे जीवन जगणारे डॉ. रुपेश पाटकर यांनी आंतरजातीय विवाह केला आहे. यामागेही आईचीच प्रेरणा असल्याचे ते नमूद करतात. सामाजिक कार्यामध्ये स्वत:ला झोकून देणारे बऱ्याचदा समाज माध्यमांवर (सोशल मिडियावर) तेवढे सक्रिय नसतात. मात्र पाटकरांनी या माध्यमाची बलस्थाने ओळखलेली असल्याने ते ओघवत्या भाषेमध्ये तिथे आपले विचार मांडत असतात. समाजमाध्यमाचा असा सकारात्मक वापरही होऊ शकतो, हे त्यांनी कृतीने दाखवून दिलेले आहे.


निसर्गपूरक जीवनशैली आणि तिच्याशी अध्यात्माची घातलेली सांगड डॉक्टरांच्या रोजच्या जगण्यात दिसून येते. प्रेम, करुणा आणि सद्भाव यांचा परीघ वृद्धिंगत करणारे डॉ. रुपेश पाटकर हे चाकोरी बाहेरचे जीवन अंगीकारलेले संवेदनशील डॉक्टर आहेत.

**संतोष पुरोहित**
९३२६६७८७८२

# वामन पंडित
# मराठी रंगभूमीची बखर - 'रंगवाचा'

□

डॉ. राजेंद्र चव्हाण



*‘रंगवाचा’ हे पूर्णपणे रंगभूमीला वाहिलेले त्रैमासिक आहे. ‘मराठी रंगभूमीची बखर’ असं या त्रैमासिकाचं वर्णन करता येईल. पूर्वी दादरच्या विनायक पडवळ यांनी ‘भरतशास्त्र’च्या रूपाने असा प्रयत्न केलेला होता. पण त्यांच्या अकाली जाण्याने तो खंडित झाला. आज तरी अशा प्रकारे मराठी रंगभूमीला वाहिलेले हे एकमेव नियतकालिक म्हणता येईल.*

सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशनचा रा. शं. दातार नाट्य पुरस्कार कणकवलीच्या श्री. वामन तथा उदय पंडितांना ‘रंगवाचा’ या त्रैमासिकाच्या संपादनासाठी मिळतो आहे, ही कणकवली आणि सिंधुदुर्गातल्या नाट्यरसिकांसाठीच नव्हे तर आख्ख्या महाराष्ट्रातल्या मराठी नाट्यरसिकांसाठी खूप आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. एका अर्थाने कणकवलीच्या ‘वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान’ने गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या कामालाही ही दाद आहे. याच प्रतिष्ठानचे हे मुखपत्र आहे - ‘रंगवाचा’!

‘रंगवाचा’ हे पूर्णपणे रंगभूमीला वाहिलेले त्रैमासिक आहे. ‘मराठी रंगभूमीची बखर’ असं या त्रैमासिकाचं वर्णन करता येईल. पूर्वी दादरच्या विनायक पडवळ यांनी ‘भरतशास्त्र’च्या रूपाने असा प्रयत्न केलेला होता. पण त्यांच्या अकाली जाण्याने तो खंडित झाला. आज तरी अशा प्रकारे मराठी रंगभूमीला वाहिलेले हे एकमेव नियतकालिक म्हणता येईल. मराठी नाटकांचा, नाट्यव्यवहारांचा दस्तऐवज त्यातून तयार होतो आहे. या त्रैमासिकातल्या नोंदी नाट्यशास्त्राच्या अभ्यासकांना आजच्या काळातील रंगभूमीचा इतिहास सांगत राहतील. मराठी रंगभूमीबरोबरच भारतीय आणि जागतिक रंगभूमीचीही दखल हे त्रैमासिक प्रसंगोपात घेत असते.


‘रंगवाचा’ने नेहमीच्या अंकांप्रमाणेच खूप सारे विशेषांकही प्रसिद्ध केलेले आहेत; काही विशिष्ट नाटकांवर, काही नाट्यक्षेत्रातल्या दिग्गज रंगकर्मींवर, रंगमंदिरांच्या स्थितींवर, बालनाट्य शिबिरांवर, कलेच्या समकालीनतेवर, रंगभूमीच्या १९८० ते २०१० या कालखंडावर... असे खूपच. प्रत्येक अंकात विचारांना चालना मिळेल इतका भरगच्च ऐवज ठासून भरलेला असतो. आणि तोही जाहिरातींच्या भडिमाराशिवाय, हे महत्त्वाचं. कोरोना काळात तर तीस एकांकिकांचा एक विशेषांक देऊन रसिकांना ‘रंगवाचा’ने आनंदाचा धक्काच दिला होता. ‘रंगवाचा’च्या अनेक अंकांना पुरस्कार मिळाले आहेत. ठाण्याच्या ‘वुई नीड यू सोसायटी’ने दोन वर्षांपूर्वी एक लाख रुपयांची भेट देऊन ‘रंगवाचा’चा गौरव केला होता. हा प्रतिसाद हुरूप वाढवणारा आहे. आणि आता सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशनने पंडितांना पुरस्कार देऊन त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवलेला आहे.


पंडित म्हणजे प्रतिष्ठानचा चेहराच जणू. महाराष्ट्रातल्या नाटक करणाऱ्या लोकांना त्यांचा परिचय

करून देणं हा खरं तर आगाऊपणाच आहे. कारण त्यांना न ओळखणारा रंगकर्मी शोधून सापडायचा नाही. महाराष्ट्रात असा रंगकर्मी नसेल ज्यानं कणकवलीत नाटक केलं नसेल किंवा पंडितांशी तो दोन शब्द बोललेला नसेल.. पंडितांनी असं माणसं जोडत जोडत प्रतिष्ठानचं एक मोठं विश्व उभं केलेलं आहे.

संस्थेच्या 'बॅ.नाथ पै एकांकिका स्पर्धे'त गेल्या अर्ध शतकात पंधराशेच्या वर एकांकिका सादर झाल्या आहेत. प्रतिष्ठानच्या 'नाट्य महोत्सवा'त गेल्या पस्तीस वर्षांत दीडेकशे प्रायोगिक नाटकांचा आस्वाद इथल्या रसिकांनी घेतला आहे. इथं पंधराशेच्या वर संहितांचा संग्रह केलेला आहे. 'चाफा', 'महापूर', 'अंबा', 'थँक्यू आजोबा', 'मी..माझ्याशी', 'चाहूल' या आणि अशा अनेक नाटकांची निर्मिती आणि प्रयोग संस्था करत आलेली आहे. 'हत्ती, घूस, रेडा, गेंडा' हे संस्थेचं नवं नाटक सध्या खूप चर्चेत आहे. प्रतिष्ठानचा इतिहास हा गेल्या काही वर्षांतल्या मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे.

'रंगवाचा' ही पंडितांच्या मनातली कल्पना होती. तिला त्यांनी कष्टपूर्वक मूर्त स्वरूप दिलेलं आहे. 'रंगवाचा' हे नाव अतुल पेठेंनी सुचवलेलं. मुद्रित माध्यमांसाठी अत्यंत बिकट असलेल्या या काळात असं नवं नियतकालिक सुरू करणं हे प्रवाहाविरुद्ध पोहण्यासारखंच होतं. पण तरीही पंडितांनी एका जिद्दीनं 'रंगवाचा'चा पहिला अंक आठ वर्षांपूर्वी प्रकाशित केला. रंगभूमीच्या दस्तऐवजीकरणाविषयी उदय पंडितांची तळमळ, त्यांचा संपादनातला अनुभव आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचं पाठबळ यामुळे 'रंगवाचा'चं हे स्वप्न वास्तवात येऊ शकलं.



वर्गणीदार ऐवजी पालक हा शब्द वापरून पंडितांनी वाचकांना 'रंगवाचा' निर्मितीचं श्रेय दिलेलं आहे. प्रत्येक वाचकाला तहहयात अंक मिळण्यासाठी फक्त एक हजार रुपयांत हे पालकत्व तेव्हा देण्यात आलं होतं. अमोल पालेकर, नसिरुद्दीन शाह, स्वत: पंडित यांनी आणि त्यांच्यासारख्या इतरांनी दिलेल्या मोठ्या देणग्या उल्लेखनीय आहेत. रंगभूमीच्या वाटचालीतले 'रंगवाचा'चे महत्त्व ओळखून 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' तसेच 'संगीत नाटक अकादमी' यांनीही या त्रैमासिकाला अनुदान दिलं आणि पुढे चालू ठेवलं. युजीसी केअर लिस्टमध्येही 'रंगवाचा'चा समावेश आहे.

'रंगवाचा' ही संपूर्ण जगभरातील मराठी नाट्यरसिकांसाठी प्रतिष्ठानने दिलेली सर्वोत्तम भेट म्हणता येईल. गांभीर्याने संपादन केलेला, आशयपूर्ण लेखांनी नटलेला 'रंगवाचा'चा अंक कधी एकदा हातात येईल, अशी हुरहुर मराठी वाचकांना लागलेली असते. याचं सारं श्रेय अर्थातच पंडितांना जातं.

'रंगवाचा'च्या सदरांना त्यांनी दिलेली नावं फार आकर्षक आहेत. त्या विषयाचा उलगडा क्षणात करणारी आहेत. 'रंगऋषी'मध्ये आपण वाचतो थोर कलाकारांविषयी. 'रंगसन्माना'त पुरस्कार मिळालेल्यांविषयी. 'रंगदस्त'मध्ये नाटकाच्या जुन्या पुस्तकांविषयी तर 'रंगवृत्त'मध्ये नाट्यप्रयोगांच्या बातम्या! 'रंगधारा', 'रंगप्रयोग', 'रंगस्मृती', 'रंगचिंतन', 'रंगभारती', 'रंगधरती' अशी रंगभूमीवरल्या रंगांची अंकात उधळण चालू असते. या सदरांच्या नावांमुळेच अंक हातात पडताच काय वाचायचं आहे, हे स्पष्ट कळतं. सर्वात शेवटी असलं तरी मी पहिल्यांदा उडी घेतो ती 'रंगपंचमी'वर. शफाअत खानांची लेखणी तिथं रंगभूमीवरल्या भल्या-भल्यांची खिल्ली उडवत असते. नेमकं व्यंग पकडणारी, चांगुलपणाला दाद देणारी त्यांची ती खट्याळ शैली ही एक वेगळीच गंमत आणते.

आता थोडे पंडितांबद्दल. सिंधुदुर्गातलं 'घावनळे' हे पंडितांचं जन्मगाव. सावंतवाडीला शाळेत असताना त्यांनी संस्कृत नाटकातूनही काम केलं होतं. पुढे तिथंच 'पंचम खेमराज महाविद्यालया'त शिकत असताना 'थिएटर युनिट' सुरू करण्यात त्यांनी पुढाकार घेतलेला होता. अभ्यासपूर्ण नाटकाची दृष्टी देणारे प्रा.विजय फातर्पेकर सर त्यांना तिथं भेटले. तिथं नाटकांविषयी वारंवार चर्चा व्हायच्या, व्याख्यानं व्हायची, नाटकाचे प्रयोग व्हायचे. त्यांना समांतर नाट्य चळवळीची ओळख झाली ती तेव्हाच. 'थिएटर युनिट' ही नाटकाची प्रयोगशाळाच होती पंडितांसाठी. 'नाट्यदर्शन'साठीही त्यांनी काही नाटकं केली.

कॉमर्समध्ये पदवी घेऊन कणकवलीत बँकेत काम करता करता त्यांनी एकीकडे मुद्रणकलेचाही सखोल अभ्यास करायला सुरुवात केली. त्यात ते पारंगतही झाले. एका बाजूला हे सुरू असताना इथल्या नाट्यप्रेमींबरोबर एकेक नाटक ते करतच होते. कधी चंदू शिरसाटांसोबत 'बाबा वर्दम थिएटर्स'चं नाटकही करत होते. कित्येक स्पर्धांमध्ये सहभागी होत होते. उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट अभिनय अशी बक्षिसं ते मिळवत होते आणि उत्कृष्ट मित्रही मिळवत होते. त्यांना नाटकाच्या धाग्याने एकत्र बांधत होते. कणकवलीच्या नगर वाचनालयात हे 'डिव्होटर्स ग्रुप ऑफ ड्रामा'वाले जमायचे.

स्पर्धेत नाटकं करता करता कधीतरी 'नाट्यस्पर्धा' आयोजित करण्याचं ठरलं आणि कणकवलीत एका नाट्य-चळवळीचा 'उदय' झाला. त्यावेळी खरं तर कुणालाच कल्पना नसेल की, हा प्रवाह पुढे 'वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान' हे अतिशय लोभस रूप धारण करेल. प्रतिष्ठानचं काम हे पंडितांचं महत्त्वाचं काम आहे. यात प्रा. सतीश आळेकरांनी दाखवलेली दिशा, अनेक साहित्यिकांची,

नाट्यकर्मींची मैत्री आणि रसिकांचं प्रेम या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

पत्नी ज्योती आणि मुलगी पूर्वा असं पंडितांचं छोटं कुटुंब असलं तरी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचं मिळून आणखी एक मोठं कुटुंब सतत त्यांच्यासोबत वावरत असे. सगळ्यांचा नामोल्लेख केवळ अशक्य आहे! आमचे मित्र प्रसाद घाणेकर यांच्या भाषेत सांगायचं तर ही सगळी 'झपाटलेली झाडं' आहेत. नाटकासाठी एक सुंदर वातावरण या सर्वांनी इथं एका शिस्तीनं, शांततेनं उभं केलंय आणि सुरक्षित ठेवलंय. नाटकात समाज घडविण्याची क्षमता आहे, असा या साऱ्यांचा विश्वास आहे. नाट्यप्रयोगानंतर लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञांबरोबर उत्तररात्री रंगलेल्या कितीतरी चर्चा आज मला जशाच्या तशा आठवत आहेत. नाट्यरसिकांचा आणि कलाकारांचा हा संवाद पंडित मोठ्या खुबीने घडवून आणत असतात.

उदय पंडित यांनी अनेक साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित अभिवाचनाचे कार्यक्रम केले आहेत. त्यात वि. स. खांडेकर - 'अमृतधारा', विंदा - 'स्वच्छंद', वसंत सावंत - 'वसंत वैभव', वीरधवल परब - 'दरसाल दर शेकडा' असे खूप आहेत. सध्या ते मीनाक्षी पाटील यांच्या कवितांचा 'ललद्यदस ललबाय' करत आहेत. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचं अभिवाचन सुद्धा सुरू आहे. विंदांनी त्यांची 'ट्रंक' ही कविता पंडितांकडून ऐकली आणि त्यांना दिलखुलास दाद दिली. ते म्हणाले, 'आजपासून ही कविता पंडितांची झाली!'

'निलायम' हा त्यांच्या आईच्या स्मरणार्थ रंगमंच घरात सुरू करून त्यात अनेक कार्यक्रम सध्या ते घेत असतात. पंडित हे सिंधुदुर्गातल्या सर्वात मोठ्या प्रेसचे मालकही आहेत. त्यांच्या 'पंडित पब्लिकेशन्स' या संस्थेने आजपर्यंत 'नाटक' या विषयाला वाहिलेली अनेक पुस्तकं प्रकाशित केली आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या रानफुलांच्या छायाचित्रांची त्यांची प्रदर्शने ही निसर्गाविषयीचं कुतूहल वाढवतात. पंडितांसारखी माणसं बोलण्यापेक्षा काम करणं महत्त्वाचं मानतात. त्यांचं प्रेम कामातून व्यक्त होतं, नुसत्या शब्दांतून नाही. स्वत:विषयी आणि स्वत:च्या कामाविषयी खूपदा अशी माणसं बोलतच नाहीत आणि प्रसिद्धी तर त्यांना नकोच असते.

पण पंडितांचं कामच बोलत असतं! त्या बोलण्याचा स्वरसुद्धा शांत आणि धीरगंभीर असतो; जुळून आलेल्या तंबोऱ्यासारखा! सौंदर्याचं भान हरवत चाललेल्या कोलाहलातूनही तो सगळ्यांना सहज ऐकू येतो. आणि प्रत्येकालाच मग सहज गुणगुणावंसं वाटतं आपापल्या मनातलं गाणं!!

**डॉ. राजेंद्र चव्हाण**
९०४९६६३४५३

# ‘बेखौफ हसीना’
## एक संघर्ष यात्रा

□

स्वातीजा मनोरमा



*पुढची दिशा काय असेल, असा प्रश्न हसीनाला विचारला तर ती म्हणते, ''बहुत कुछ करना है। भारत के स्वातंत्र्य संघर्ष के बाद सेक्युलर तत्त्वपर संविधान की विचारधारा को पुख्ता बनाना, औरतों की आवाज़ और भिन्न लैंगिक तथा समलैंगिक व्यक्तियोंके अस्तित्व के सवालों के बारे में हर तरह से, हर दिशा से हमें उठना होगा।''*

तिचा हा प्रवास आहे भरपूर अडथळ्यांचा, पण खूप काही शिकवणारा. आजच्या धर्माच्या आधारावर विभागल्या गेलेल्या समाजाच्या दृष्टीने खूप काही सांगणारा आणि उद्‌बोधक. शहनाझ शेखने मुस्लीम स्त्रियांबरोबर मुस्लीम बहुल भागात काम सुरू करताना स्थापन केलेल्या आवाज-ए-निस्वांची ती एकदम तरुण कार्यकर्ती. ती एक कॉलेज तरुणी. घरातील पहिली समाज विज्ञानातील पोस्ट ग्रॅज्युएट. घरासमोरच्या भारतीय कम्युनिस्ट पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांच्या लायब्ररीत जाऊन पुस्तके वाचणारी. तिच्या जगाच्या कक्षा रुंदावल्या आणि आयुष्यभरासाठी वाचनाचा पाया घातला गेला.

घरातल्या लहान-मोठ्या सर्व सदस्यांशी संवाद साधणारी हसीना. तिची आई खूप बोलणारी. गावाकडून लग्न झाल्यावर शहरातल्या छोट्याशा घरात राहिलेली. लिहिता-वाचता येत नसूनही स्वाभिमानाने जगून मुलांना कष्टाचे मोल शिकवणारी हसीनाची आई. हसीनाला सहा बहीण-भाऊ. त्या सर्वांच्या अडीअडचणी सोडवत एकहाती संसार चालवणारी. मुलांनी शिकावं या ध्यासाने मुलांना शाळेत नेमाने पोहोचवणारी. शाळेतल्या न अनुभवलेल्या जगाकडे दुरून आसुसलेल्या नजरेने पाहणाऱ्या आईचा तो ध्यास हसीनाने आत्मसात केला आणि आजतागायत तो तिच्या सोबत आहे. सतत काहीतरी शिकणारी, नव्याने जाणून घेणारी हसीना. देशात, दूर परदेशात, कुठेही व कोणाही समोर भाषेचा अडसर येऊ न देता आपल्या निखळ भावना निर्भीडपणे व्यक्त करू शकणारी 'बेखौफ' हसीना.

हसीना तिच्या घरच्या अनुभवातून मोठी झाली आणि आवाज-ए-निस्वांची खंदी कार्यकर्ती बनली. त्या काळात मुस्लीम स्त्रियांवर होणारे अत्याचार समजून घेण्यासाठी आवाज-ए-निस्वांने निवडलेला हा भेंडीबाजारचा विभाग. हा काळ खूप शिकण्याचा काळ होता. मुस्लीम स्त्रियांचे विविध प्रश्न, पण ते घराबाहेर आले की ते घरच्या पुरुषाचे, कुटुंबातील व्यक्तींचे फक्त न राहता जमात, धर्म, धर्मसंस्थेचे पदाधिकारी या सर्वांचे होतात. प्रश्नांचा आवाका बदलतो. या सर्वांशीच भिडावे लागते आणि विरोध सहन करावा लागतो. पहिल्या दोन वर्षांत आवाज-ए-निस्वांला तब्बल २७ ठिकाणी कार्यालय बदलावे लागले! हसीनाने त्या खडतर काळात नेटाने आणि उत्साहाने काम केले. त्यातून संघटित होण्याचे महत्त्व, सातत्याने केलेल्या कामाचे महत्त्व आणि मौलवी, मुल्लांच्या सोबत आलेल्या अनुभवांची कायमची शिदोरी तिच्याकडे जमा झाली.



१९९२च्या दंगलीनंतर झालेल्या मुंबई शहराच्या वाताहतीने तिला बरेच काही शिकवले. राधाबाई चाळ, ऑर्थर रोड वरचा परिसर, अँटॉप हिल आणि मुस्लीम बहुल नसलेल्या भागात वेचून वेचून झालेले मुस्लिमांवरचे बेबंद अत्याचार तिने पाहिले. या काळात हसीनामधील कार्यकर्ती सजग झाली. या देशात मुस्लीम नागरिक म्हणून उजळ माथ्याने जगायचे असेल तर अल्पसंख्याक मुस्लीम समूह म्हणून होत असलेल्या अत्याचाराला हरप्रकारे तोंड कसे देता येईल, याबद्दलची समज आणि जाण तिने आत्मसात केली. स्वतंत्र राहण्याचे, जीवनातल्या सततच्या तडजोडींना एकटीने सामोरे जायचे ठरवून ती घराबाहेर पडली. त्यामध्ये कायद्याचे दोन वर्षे घेतलेले शिक्षण अर्धवट सोडावे लागले. मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न हे फक्त व्यक्तिगत कायद्यांमधील सुधारणेचे नाहीत तर त्या एका अल्पसंख्याक धार्मिक समुदायाचा भाग आहेत हे स्पष्ट झाले. भारताच्या फाळणीपासून सेक्युलर भारतात मुस्लीम समुदायांविरुद्ध असलेला विद्वेष दर क्षणी पद्धतशीरपणे वाढतो आहे. ते सर्व पाहता मुस्लीम स्त्रियांचे व्यक्तिगत कायद्याचे प्रश्न हे नागरिकत्वाचे प्रश्न म्हणून पाहायला हवेत म्हणजे ते जोडून घेतले जातील, ही शिकवण तिच्या कामाचा पाया बनली.

त्याबरोबरच स्त्रिया आणि धर्म संस्था आणि स्त्री-पुरुष नात्यातील सत्तेच्या नात्याची बैठक याबद्दल तिच्या मनात सततचे प्रश्न होते. शहाबानोच्या पोटगीच्या अत्यंत वास्तविक न्याय्य मागणीला कायद्याने दिलेले उत्तर आणि त्यानंतर 'इस्लाम खतरे में है' यासाठी मुस्लीम धर्मियांनी उठवलेले वादळ आणि शहाबानोने मागे घेतलेला पोटगीचा न्याय्य अर्ज या घटनांनी ते तिच्यावर बिंबवले होतेच. दोन वर्षे घेतलेल्या कायद्याच्या शिक्षणाची त्याला जोड मिळाली होती. त्या वयात धर्माच्या नावावर प्रत्येक पावलावर स्त्रियांवर नियंत्रण करणाऱ्या रीतिरिवाजांबद्दलचा प्रश्न तिला कायमच भेडसावत राहिला आहे. धर्माच्या बंधनाचा पगडा स्त्रियांच्या अगोदरच परावलंबी जिण्यावर किती दडपण आणतो, याची जाणीव

तिला झाली. शिवाय मुस्लीम स्त्रियांना अभावाने मिळणारे शिक्षण, आरोग्यसेवा आणि अल्पसंख्याक असल्यामुळे नोकरी-व्यवसायाबाबतची वानवा. मूलभूत साधने, सुखसोयी याची कायमची कमतरता. हवा, पाणी आणि धर्माची बंधने आणि बाबरी मशिदीच्या विनाशानंतर कायमची असुरक्षितता. त्यामुळे मुस्लीम पुरुषांवर बहुसंख्याक समाजाने रोखलेल्या बंदुका स्त्रियांचीच असुरक्षितता वाढवत होत्या. कौटुंबिक हिंसा व समस्या यांना तोंड फोडण्यासाठी स्त्रियांना उपलब्ध असलेले मार्ग संकुचित होत होते.

त्या प्रश्नांची दाहकता वाढली तशी संघर्षाचा मार्ग बदलायला हवा, याची जाणीव होत गेली. मोहिमा जास्त संघटित असणे, पुरोगामी संस्था आणि संघटनांच्या सोबत जाणे जास्त गरजेचे बनले. आवाज-ए-निस्वां आणि नारी अत्याचार विरोधी मंच इत्यादींचे नाते अधिक घट्ट झाले. अन्य राज्यांतील मुस्लीम स्त्रियांचे गट, संघटना आणि स्वायत्त स्त्री संघटना यांचे मिळून जाळे उभे करण्यात हसीनाचा वाटा मोठा राहिला आहे. त्यासाठी तिने केलेला अभ्यास भारतातील मुस्लिमांची विविध राज्यांतील स्त्रियांच्या प्रश्नांची विविधता आणि प्रत्येक राज्यात असलेली त्यांची परिस्थिती पुढे आणतो. या अभ्यासातून तिने व्यक्तिगत आणि सामूहिक जीवन जगताना आत्मसात केलेली अभ्यासू वृत्ती आणि उपजत तल्लख विश्लेषक आणि चिकित्सक विचारपद्धती व्यक्त होते.

२००१च्या अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर जगभरचा मुस्लीम विद्वेष वाढला होता. गुजराथच्या २००२च्या गोध्रा घटनेचा फायदा घेऊन मोदी सरकारच्या पुढाकाराने झालेला मुस्लीम संहार व तथाकथित पुनर्वसन, स्त्रियांवरच्या लैंगिक अत्याचाराच्या मोठ्या प्रमाणातल्या घटना, रथयात्रेपासून पद्धतशीर आखणी करून मुख्य प्रवाहात पसरवलेला मुस्लीम द्वेष, या सर्वांविरुद्ध



केलेला संघर्ष यातून स्थानिक प्रश्नांपलीकडे पाहणाऱ्या गटाची गरज निर्माण झाली. बाबरी मशीद विध्वंसानंतरच्या हत्याकांडाबद्दलचा श्रीकृष्ण कमिशनचा अहवाल किंवा गुजराथमधील विध्वंसानंतर झालेले विविध सत्यकथन अहवाल, मुझफ्फर नगर येथल्या दंगली यांची काडीमात्र दखल घेतली गेली नव्हती. मुस्लीम नागरिकांची सामाजिक परिस्थिती विशद करणारा सच्चर समितीचा अहवाल एक मृगजळ बनून राहिला होता. या सर्वांसोबत मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नांची विशेष दखल घेणे गरजेचे आहे, याची जाणीव पुन्हा तीव्र झाली होती. मुस्लीम स्त्रियांच्या संघटनांचे संस्थात्मक नेटवर्क आणि विविध राज्यांतील नेतृत्वाला बरोबर येऊन आंदोलनाचा संघटित आणि सशक्त आवाज उठवण्यासाठी निर्माण केलेले जाळे ही नवी कल्पना हसीनाने पुढे आणली आणि बेबाक कलेटिव्हची निर्मिती झाली.

२०१४ला केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर मुस्लिमांचे प्रश्न, त्यांची असुरक्षितता वाढली. त्यांच्यावर गुन्हेगार, देशद्रोही म्हणून कायमचा ठप्पा बसला. मालेगाव, हैदराबाद येथील बॉम्बस्फोट आणि महाराष्ट्रात घेतला गेलेला पहिला झुंडबळी. मुस्लीम समुदायाची कोंडी केली जात होती. या काळात बेबाक व पाच मुस्लीम स्त्रियांनी केलेला जुबानी तलाक घटनाबाह्य ठरवावा ही मागणी सुप्रीम कोर्टाने मान्य केली होती. पण मोदी सरकारला मुस्लीम पुरुषांना धडा शिकवायचा होता म्हणून जुबानी तलाक देणाऱ्या पुरुषाविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदला जाईल, असा मसुदा पार्लमेंटमध्ये पास केला.

बेबाकचा लढा थांबलेला नव्हता. मोदी सरकारने मुस्लीम जनतेचे जीवन सतत असुरक्षित ठेवण्यासाठी दिलेली चिथावणी, झुंडबळी, गोसंरक्षकांनी केलेल्या हत्या - आणि त्यातले सारे गुन्हेगार सुटत होते. लव्ह जिहादची खोटी आवई पिकवून धर्मपरिवर्तन विरोधी कायदा आणला. नेतृत्वात






असलेल्या मुस्लीम स्त्रियांचे बुल्लीबाई आणि सुल्ली सौदे करणारे ॲप या सर्व गोष्टींचा मुस्लीम जनतेच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास बेबाकने केला. त्याचा अहवाल बनवला. कोविडच्या काळात झालेले अत्याचार, त्याविरुद्ध केलेला संघर्ष, एनआरसी आणि सीएएच्या विरोधात स्त्रियांनी केलेले नावीन्यपूर्ण शाहीन बाग आंदोलन व त्याचे मुंबई, पुणे, हैदराबाद आदी अनेक शहरांत व राज्यांत पसरणे - संविधानाचे अधिकार सांगणाऱ्या व मागणाऱ्या या साऱ्या संघर्षांमध्ये हसीनाने सातत्याने सहभाग घेतला व पुढाकार घेतला. तसेच कोविडच्या मनमानी करणाऱ्या संचारबंदीविरुद्धचा स्त्रियांचा संघर्ष, मोदी सरकारने पेटवलेल्या दिल्लीतील दंग्यातील संपत्ती आणि मालमत्ता संहाराविरुद्धचे व ७५व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त बिलकीस बानोच्या बलात्काऱ्यांच्या बेकायदेशीर सुटकेविरुद्धचे झालेले आंदोलन या सर्व मोहिमांत हसीनाचा पुढाकार होता.

पुढची दिशा काय असेल, असा प्रश्न हसीनाला विचारला तेव्हा तिचे उत्तर होते, ''बहुत कुछ करना है। भारत के स्वातंत्र्य संघर्ष के बाद सेक्युलर तत्त्वपर संविधान की विचारधारा को पुख्ता बनाना, औरतों की आवाज़ और भिन्न लैंगिक तथा समलैंगिक व्यक्तियों के अस्तित्व के सवालों के बारे में हर तरह से, हर दिशा से हमें उठना होगा।'' सततची धावपळ, लहानपणापासून अंगीकारलेले स्वावलंबन आणि त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारी चालू असल्या तरी हसीनाच्या कामात कधी खंड पडलेला नाही. तिची सहप्रवासी तिच्या सोबत आहे. तिची प्रकृती साथ देत नसली तरी ती मनाने आणि भावनिक पाठिंबा देत असते. शांत व कुतूहल भरलेल्या नजरेने आयुष्याकडे बघणारी हसीना ते आजची बेखौफ हसीना असा तिचा प्रवास. हसीनाचे आयुष्य म्हणजे एक संघर्ष यात्रा आहे, जी यापुढेही चालू राहील.

**स्वातीजा मनोरमा**
९९८७०७०७९३

# निवड समिती

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**

(भारतातील)

रणधीर शिंदे (अध्यक्ष)
गणेश कनाटे
जयश्री हरि जोशी
राम जगताप
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार समिती**

(भारतातील)

किरण यज्ञोपवीत (अध्यक्ष)
आलोक राजवाडे
पर्ण पेठे
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**

(अमेरिकेतील)

शोभा चित्रे
विद्युल्लेखा अकलूजकर
नंदन जोशी
सुजाता महाजन
रजनी शेंदुरे

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**

(भारतातील)

देवेंद्र गावंडे
ज्योती म्हापसेकर
देविदास वडगावकर
निशा शिवूरकर
विजया चौहान (साधना ट्रस्ट)
विनोद शिरसाठ (साधना ट्रस्ट)
रमेश अवस्थी (मासूम)
मनीषा गुप्ते (मासूम)

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**

(अमेरिकेतील)

प्रतिभा देशमुख
राजीव भालेराव
शोभा चित्रे
सुनीता धुमाळे
अरुंधती विनोद

**सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समन्वय समिती**

मनीषा गुप्ते (मासूम)
रमेश अवस्थी (मासूम)
विनोद शिरसाठ (संपादक, 'साधना' साप्ताहिक)
मुकुंद टाकसाळे

## पुरस्कारांचे अध्यक्ष कोण? आणि पुरस्कारांचे प्रमुख पाहुणे कोण?

सुनील देशमुख यांच्या संकल्पनेतून १९९४ साली महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांची सुरुवात झाली. पहिली दोन वर्षं, म्हणजे १९९४ व १९९५ साली हे पुरस्कार मराठीतल्या उल्लेखनीय कामगिरी केलेल्या साहित्यिकांना दिले गेले. १९९६ सालापासून त्यांचं स्वरूप आणखी विस्तारलं आणि समाजकार्य पुरस्कारांनादेखील सुरुवात झाली. १९९६पासून साल २००३पर्यंत या दोन्ही पुरस्कारांचे समारंभ, त्यांचे अध्यक्ष आणि त्यांचे प्रमुख पाहुणेदेखील वेगवेगळे असल्याचं दिसतं. मात्र २००४पासून एक समारंभ, एक अध्यक्ष व एक प्रमुख पाहुणा असा बदल झालेला दिसतो. साधारण २०१५पासून एक समारंभ आणि एक प्रमुख पाहुणा असं याचं स्वरूप झालेलं आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांची, पुरस्कारार्थींची यादी आजवर सातत्याने प्रकाशित झाली आहे. या पुरस्काराला देश-विदेशातले, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्तीचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे आजवर लाभत आले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे, हे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांची नावं आपण पाहिली तर ती केवळ मराठी वाङ्‌मयाच्या क्षेत्रापुरती किंवा महाराष्ट्रातील सामाजिक कार्यापुरती मर्यादित नाहीत. हे वेगवेगळ्या भाषांमधले; साहित्य, चित्रपट, नाटक, कायदा या क्षेत्रांमधले, एका अर्थी विचारवंत किंवा काहीसे क्रांतिकारक, प्रयोगशील चेहरे आहेत. थोडक्यात, दिग्गज असलेली नावं केवळ चमकदार नसण्याचा पूर्ण विवेक अध्यक्षांची व प्रमुख पाहुण्यांची निवड करताना बाळगलेला दिसतो... तसंच १९९४पासून आजवर हा विवेक कधीही ढळलेला आढळत नाही. म्हणजेच, फक्त पुरस्कारांबाबतच नाही, तर अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्यांबाबतचीही या समितीची सजगता दिसून येते. सर्वसाधारणपणे इतकं सातत्य इतर कुठेही इतक्या नेटाने टिकवून ठेवलेलं आढळत नाही.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संदर्भात आपलं साहित्य आणि आपलं सामाजिक कार्य नेमकं कुठे उभं आहे, त्याची दिशा कशी असली पाहिजे आणि इतर भाषा आणि कार्याकडून त्याला काय घेता येऊ शकतं, याची एक खिडकी इतर क्षेत्रांमधले वा भाषांमधले दिग्गज आणि मराठीतले हे पुरस्कार यांच्या निमित्ताने झालेल्या परस्पर क्रियेतून उघडली जाते. सुरुवातीच्या वर्षांमधले साहित्य आणि सामाजिक क्षेत्रांमधल्या पुरस्कारांचे वेगळे वेगळे समारंभ आणि त्यांचे वेगळे वेगळे प्रमुख पाहुणे ही त्या-त्या क्षेत्राच्या शैलीनुसार किंवा पोतानुसार रचना केलेली दिसते. पुढे पुढे अनेक व्यापांमधून हे शक्य झालं नसावं, मात्र तरीही पाहुणे व अध्यक्ष यांची निवड सैल होत नाही. निवडीमधला चोखंदळपणा आजही कायम राहिलेला दिसतो.

भाग्यश्री भागवत
९५६१०९३२०२

१९९४
अध्यक्ष : विजय तेंडुलकर
(ज्येष्ठ नाटककार व साहित्यिक)
प्रमुख पाहुणे : सुरेश दलाल
(प्रख्यात गुजराती साहित्यिक)

१९९५
अध्यक्ष : मे. पुं. रेगे
(ख्यातकीर्त विचारवंत व तत्त्वज्ञ)
प्रमुख पाहुणे : भीष्म साहनी
(प्रख्यात हिंदी साहित्यिक, नाटककार व अभिनेते)

१९९६
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. य. दि. फडके
(प्रख्यात चरित्रलेखक व इतिहास संशोधक)
प्रमुख अतिथी : डॉ. यू. आर. अनंतमूर्ती
(सुविख्यात कन्नड साहित्यिक व समीक्षक)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. ग. प्र. प्रधान
(समाजवादी विचारवंत, राजकारणी व लेखक)
प्रमुख अतिथी : निखिल चक्रवर्ती (ज्येष्ठ पत्रकार)
सन्माननीय अतिथी : निळू फुले (मराठी रंगभूमी व चित्रपट क्षेत्रातील ज्येष्ठ कलावंत)

१९९७
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. द. ना. धनागरे
(कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)
प्रमुख अतिथी : कैफी आजमी
(सुप्रसिद्ध उर्दू शायर)

१९९८
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : वसंत पळशीकर
(ज्येष्ठ विचारवंत व लेखक)
प्रमुख पाहुणे : ए. के. हंगल
(सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. ब्रह्मदेव शर्मा (थोर शिक्षणतज्ज्ञ)
प्रमुख पाहुणे : मेधा पाटकर
(ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या)

१९९९
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : नारायण सुर्वे (थोर मराठी कवी)
प्रमुख पाहुणे : अलेक पदमसी
(अभिनेता व सुप्रसिद्ध सिनेनिर्माता)


नारायण सुर्वे, सुनील देशमुख आणि विजय तेंडुलकर
(१९९४)


मे. पु. रेगे, विजय तेंडुलकर
(१९९४)



रामदास भटकळ, सुनील देशमुख, विजय तेंडुलकर
(१९९४)



मे. पु. रेगे, भीष्म साहनी, रावसाहेब कसबे
(१९९५)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. एन. डी. पाटील
(सामाजिक नेते आणि कार्यकर्ते)
प्रमुख पाहुणे : प्रा. इम्तिआज अहमद (प्राध्यापक, मानववंशशास्त्र व समाजशास्त्र, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली)

२०००
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. नलिनी पंडित
(मार्क्सवादी विचारवंत व लेखिका)
प्रमुख पाहुणे : डॉ. चंद्रशेखर कंबार
(विख्यात कन्नड कवी, नाटककार, सिनेदिग्दर्शक)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. राम बापट (ज्येष्ठ लोकाभिमुख विचारवंत व राज्यशास्त्राचे अभ्यासक)
प्रमुख पाहुणे : अरुणा रॉय
(किसान मजदूर संगठन, राजस्थान)

२००१
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : ग. प्र. प्रधान
(समाजवादी विचारवंत, राजकारणी व लेखक)
प्रमुख पाहुणे : जावेद अख्तर
(सुप्रसिद्ध पटकथाकार, गीतकार व कवी)



दि. पु. चित्रे, वसंत बापट, यू. आर. अनंतमूर्ती
(१९९६)



य. दि. फडके, यू. आर. अनंतमूर्ती,
सुनील देशमुख, श्री. ना. पेंडसे
(१९९६)



दिलीप वि. चित्रे, य. दि. फडके, यू. आर. अनंतमूर्ती,
सुनील देशमुख, श्री. ना. पेंडसे
(१९९६)



भीष्म साहनी यांच्या हस्ते पुरस्कार घेताना नरेंद्र दाभोलकर
भीष्म साहनी, सुनील देशमुख, विजय तेंडुलकर
(१९९६)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मोहन धारिया
(ज्येष्ठ राजकारणी व सामाजिक कार्यकर्ते)
प्रमुख पाहुणे : राजेंद्र सिंग (ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ)

२००२
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. भालचंद्र नेमाडे
(थोर लेखक, कवी व समीक्षक)
प्रमुख पाहुणे : डॉ. इंदिरा गोस्वामी
(ज्येष्ठ लेखिका, कवयित्री)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. भालचंद्र मुणगेकर (ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते)
प्रमुख पाहुणे : अच्युत याज्ञिक (ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक व कार्यकर्ते)

२००३
साहित्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. रा. ग. जाधव (ज्येष्ठ साहित्य समीक्षक)
प्रमुख पाहुणे : कमलेश्वर
(सुप्रसिद्ध हिंदी लेखक व पटकथाकार)



वि. भि. कोलते जीवनगौरव स्वीकारताना
सुनील देशमुख, निखिल कुलकर्णी,
ग. प्र. प्रधान, निळू फुले
(१९९६)



विजय तेंडुलकर जीवनगौरव स्वीकारताना
ए. के. हंगल, वसंत पळशीकर
(१९९८)

समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : डॉ. मु. ब. शहा
(ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक व कार्यकर्ते)
प्रमुख पाहुणे : ओम पुरी (ज्येष्ठ अभिनेते)

२००४
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : कुमार केतकर
(ज्येष्ठ पत्रकार, संपादक व राजकारणी)
प्रमुख पाहुणे : गोविंद निहलानी
(प्रख्यात सिनेदिग्दर्शक, पटकथाकार व निर्माता)

२००५
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : प्रा. केशव मेश्राम (सिद्धहस्त मराठी कवी, लेखक, समीक्षक व विचारवंत)
प्रमुख पाहुणे : आशुतोष गोवारीकर
(प्रख्यात सिनेदिग्दर्शक, पटकथाकार व निर्माता)

२००६
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : रामदास भटकळ ('पॉप्युलर प्रकाशन' या प्रकाशन संस्थेचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक)
प्रमुख पाहुणे : बाबा आढाव
(ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते)

२००७
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मा. न्या. हेमंत गोखले
(मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय)
प्रमुख पाहुणे : डॉ. जब्बार पटेल
(सुप्रसिद्ध दिग्दर्शक)

२००८
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मा. मधुकरराव चौधरी
(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)
प्रमुख पाहुणे : मा. भाई वैद्य
(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)



नलिनी पंडित यांच्या हस्ते पुरस्कार घेणारे
स. रा. गाडगीळ
मृणाल गोरे, चंद्रशेखर कंबार
(२०००)



श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना पुरस्कार
सुनील देशमुख, मोहन आगाशे, ग. प्र. प्रधान
(२००१)

२००९
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मोहन धारिया
(विश्वस्त, साधना ट्रस्ट)
प्रमुख पाहुणे : नाना पाटेकर
(नाट्य-चित्रपट अभिनेते)
हस्ते : ज्ञानेश्वर मुळे (उच्चायुक्त, मालदीव)

२०१०
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मोहन धारिया (विश्वस्त, साधना ट्रस्ट)
हस्ते : रघुनाथ माशेलकर (ज्येष्ठ वैज्ञानिक)
अमोल पालेकर (ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक)

२०११
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : मोहन धारिया (विश्वस्त, साधना ट्रस्ट)
प्रमुख पाहुणे : नीला सत्यनारायण
(महाराष्ट्र राज्य माजी निवडणूक आयुक्त)
डॉ. माधव गाडगीळ (ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ)

२०१२
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
अध्यक्ष : दिलीप चित्रे
प्रमुख पाहुणे : दिलीप पाडगांवकर
(ज्येष्ठ पत्रकार व संपादक)
अतुल कुलकर्णी (दिग्गज अभिनेते)

२०१३
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : न्यायमूर्ती हेमंत गोखले

२०१४
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : स्टीफन मिल्स ('द क्लायमेट रिॲलिटी प्रोजेक्ट'चे धोरण सल्लागार)
माधव चव्हाण
(सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक)

२०१५
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : उदय प्रकाश
(ज्येष्ठ हिंदी साहित्यिक)



सुनील देशमुख, मोहन आगाशे, ग. प्र. प्रधान,
जयप्रकाश सावंत
(२००१)



भास्कर भोळे, शफात खान, ग. प्र. प्रधान,
इंदिरा गोस्वामी, मृणालताई गोरे, सुनील देशमुख,
केशव मेश्राम, दत्ता भगत
(२००२)



राम पुनियानी पुरस्कार स्वीकारताना
मृणाल गोरे, अच्युत याज्ञिक, भालचंद्र मुणगेकर,
सुनील देशमुख, रवी देवगडकर (के. गो. स्मा. ट्र.)
(२००२)



कमलेश्वर, रा. ग. जाधव, सुनील देशमुख
(२००३)

२०१६
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : रामचंद्र गुहा
(ज्येष्ठ इतिहासकार व विचारवंत)

२०१७
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : सिद्धार्थ वरदराजन
(ज्येष्ठ पत्रकार व संपादक)

२०१८
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
समारंभाचे प्रमुख अतिथी : श्याम बेनेगल
(सिनेदिग्दर्शक)

२०१९
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख अतिथी : अरुणा रॉय
(ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या)



सुनील देशमुख, बाबा आढाव (जीवनगौरव),
मृणालताई गोरे, मधुकरराव चौधरी, भाई वैद्य
(२००८)



एन. डी. पाटील, जब्बार पटेल, हेमंत गोखले,
सुनील देशमुख, भास्करराव भोळे
(२००९)



प्रकाश आमटे यांना जीवनगौरव प्रदान करताना
अमोल पालेकर
(२०१८)



अरुणा रॉय पुरस्कार स्वीकारताना
वसंत आबाजी डहाके आणि राजेंद्र भालेराव
(२०१९)

२०२०
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
कोव्हीडमुळे समारंभ नाही

२०२१
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
कोव्हीडमुळे समारंभ नाही

२०२२
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख अतिथी : भालचंद्र नेमाडे
(थोर लेखक, कवी व समीक्षक)

२०२३
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुणे : डॉ. जब्बार पटेल
(ज्येष्ठ सिनेनाट्य-दिग्दर्शक)

२०२४
साहित्य व समाजकार्य पुरस्कार
प्रमुख पाहुण्या : मीरां बोरवणकर
(महाराष्ट्र केडरच्या पहिल्या महिला आयपीएस
अधिकारी / लेडी सुपरकॉप)




भालचंद्र नेमाडे रंगनाथ पठारे यांना पुरस्कार देताना
(२०२२)



तारा भवाळकरांना साहित्य जीवनगौरव प्रदान करताना
डॉ. जब्बार पटेल
(२०२३)

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था

## ■ जीवनगौरव पुरस्कार ■

नारायण सुर्वे १९९४
मेघशाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगावकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७
शांता गोखले २०१८
वसंत आबाजी डहाके २०१९
महेश एलकुंचवार, २०२०
नरेन्द्र चपळगावकर २०२१
रंगनाथ पठारे २०२२
तारा भवाळकर २०२३

## ■ विशेष पुरस्कार ■

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा : संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७
सानिया : कथा या वाङ्मयप्रकारासाठी २०१८
राम जगताप : डिजिटल पत्रकारिता ‘अक्षरनामा’ २०२१
संतोष शिंत्रे : वाङ्मय प्रकार – पर्यावरण २०२१
राजन गवस : कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारासाठी २०२२
सोनाली नवांगुळ : साहित्य पुरस्कार २०२२

## प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## नियतकालिके / अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज, मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

## ग्रंथ पुरस्कार : ललित

ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता – दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद – मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा : अनुवाद : जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता : अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३

राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत :
श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही २००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर २००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय :
अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा :
प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन :
मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट :
आनंद विंगकर २०१२
निरर्थकाचे पक्षी : नीरजा २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७
उजव्या सोंडेच्या बाहुल्या : प्रवीण बांदेकर २०१८
रिंगाण : कृष्णात खोत २०१९
तिसरा डुळा : किरण येले २०२०
दगडी मत्ता : रमेश अंधारे २०२१
पिवळा पिवळा पाचोळा : अनिल साबळे २०२२
काम तमाम @ वाघा बॉर्डर : सतीश तांबे २०२३

## ■ ग्रंथ पुरस्कार : वैचारिक ■

आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी : गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद : रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत :
गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार : श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना :
संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००

मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती : म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट : जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे : म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश : आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर २०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५
पाण्याशप्पथ : प्रदीप पुरंदरे २०२०

## ▪ ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक ▪

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना : अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : ऊर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे २००७
तमाशा : एक रांगडी गंमत : संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची : नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर २०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे २०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत् चित्रव्यूह : अरुण खोपकर २०१४
प्रतिमा-प्रचिती : नीतिन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७
लीळा पुस्तकांच्या : नीतिन रिंढे २०१८
टिपंवणी : सिसिलिया कार्व्हालो २०२१
भुरा : शरद बाविस्कर २०२२
झोळी : कालिदास शिंदे २०२३

## ▪ रा. शं. दातार नाट्य पुरस्कार ▪

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याशा सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६
निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिमांशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७
हंडाभर चांदण्या : दत्ता पाटील २०१९
'विपाशा', 'टिळा', 'ऑस्कर', 'रंग'
एकांकिकांसाठी : मुक्ता बाम २०२१
पुनश्च हनिमून : संदेश कुलकर्णी २०२२
'रविवार डायरीज', 'उकळी' - चैतन्य सरदेशपांडे २०२३

## ▪ नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार ▪
## रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३
राजीव नाईक २०१८

## ▪ समाजकार्य सन्मान पुरस्कारांच्या नावानुसार वर्गीकरण ▪

**समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार (व्यक्ती/संस्था)**

१. डॉ. बाबा आढाव, पुणे २००८
२. व्यंकटअण्णा रणधीर २००९
३. नागनाथअण्णा नायकवडी २०१०
४. डॉ. जी. जी. परीख २०११
५. ठाकूरदास बंग २०१२
६. रयत शिक्षण संस्था २०१३
७. पुष्पा भावे २०१४
८. विद्या बाळ २०१५
९. हमीद दलवाई (मरणोत्तर) २०१६
१०. गंगाप्रसाद अग्रवाल २०१७

११. आनंदवन (संस्था) २०१८
१२. गजानन खातू २०२०
१३. प्रेमाताई पुरव ('अन्नपूर्णा परिवार' संस्था) २०२१

**विशेष पुरस्कार**

१. लीलाधर हेगडे, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००५
२. पन्नालाल सुराणा (समाजकार्य सन्मान) २००६
३. प्रा. एन. डी. पाटील, सातारा २००७
४. चंद्रकांत केळकर २०१०
५. ज्योती म्हापसेकर २०११
६. नीलिमा मिश्रा २०११
७. राजेंद्र बहाळकर (विशेष कृतज्ञता पुरस्कार) २०१९
८. जतीन देसाई (विशेष कृतज्ञता पुरस्कार) २०२०
९. शांताराम पंदेरे (दलित आणि भूमिहीनांच्या हक्कांसाठी केलेले कार्य) २०२२
१०. प्रमोद झिंजाडे (विधवा प्रथा निर्मूलनाचे कार्य केल्याबद्दल) २०२२
११. शांताराम चव्हाण (असंघटित कष्टकरी) २०२३
१२. नितीन पवार (सामाजिक प्रश्न) २०२३

**समाजकार्य पुरस्कारांचे मानकरी - (व्यक्ती)**

१. विलास वाघ, पुणे (समाजप्रबोधन ) १९९६
२. वासुदेवराव चित्रे, पालघर (पर्यावरण संवर्धन) १९९६
३. विजया चौक, धुळे (स्त्रियांचे प्रश्न) १९९६
४. रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) १९९६
५. शुभदा देशमुख, गडचिरोली (स्त्रियांचे प्रश्न) १९९७
६. विजय नारकर, देवरुख (पर्यावरण-संतुलन/संरक्षण) १९९७
७. लीला पाटील, कोल्हापूर (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) १९९७
८. जयंत गडकरी, मुंबई (समाजप्रबोधन) १९९८
९. बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज (स्त्रियांचे प्रश्न) १९९८
१०. हुमायून अब्दुल अली, मुंबई (पर्यावरण-संतुलन/संरक्षण) १९९८
११. सुरेखा दळवी, पेण (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) १९९८
१२. मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर (समाजप्रबोधन) १९९९
१३. रेहाना बैलिम, अमरावती (स्त्रियांचे प्रश्न) १९९९
१४. कुसुम कर्णिक, पुणे (पर्यावरण-संतुलन/संरक्षण) १९९९

१५. भरत कावळे, नाशिक (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) १९९९
१६. मनोहर कदम, मुंबई (समाजप्रबोधन) २०००
१७. चिं. धों. आसवले, पुणे (पर्यावरण-संतुलन/संरक्षण) २०००
१८. संजय संगवई, पुणे (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) २०००
१९. मु. ब. शहा, धुळे (समाजप्रबोधन) २००१
२०. डॉ. कुमुद पावडे, नागपूर (स्त्रियांचे प्रश्न) २००१
२१. काळुराम डोधडे, पालघर (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) २००१
२२. प्रभाकर म्हसकर, अंमळनेर (समाजकार्य सन्मान) २००१
२३. भुरीबाई मानसिंग शेळे, नंदुरबार (स्त्रियांचे प्रश्न) २००२
२४. रजिया सुलताना, अमरावती (वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य) २००२
२५. दत्ता इस्वलकर, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००२
२६. डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००२
२७. डॉ. राम पुनियानी, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००२
२८. डॉ. रझिया पटेल, पुणे (स्त्रियांचे प्रश्न) २००३
२९. शेख वजीर पटेल, अमरावती (स्त्रियांचे प्रश्न) २००३
३०. सुरेश शिपूरकर, कोल्हापूर (स्त्रियांचे प्रश्न) २००३
३१. आनंद पटवर्धन, मुंबई (स्त्रियांचे प्रश्न) २००३
३२. उल्का महाजन, रोहा, रायगड (स्त्रियांचे प्रश्न) २००३
३३. तिस्ता सेटलवाड, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००४
३४. रमेश हरळकर, मुंबई (समाजकार्य सन्मान) २००४
३५. पोपटराव पवार, अहमदनगर (समाजकार्य सन्मान) २००४
३६. डॉ. मोहन देशपांडे, पुणे (समाजकार्य सन्मान) २००४
३७. विलास भोंगाडे, नागपूर (समाजकार्य सन्मान) २००४
३८. प्रा. यशवंत संत, पुणे (समाजकार्य सन्मान) २००५
३९. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा (समाजकार्य सन्मान) २००५
४०. श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार (समाजकार्य सन्मान) २००५
४१. श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर (समाजकार्य सन्मान) २००५
४२. सुषमा शर्मा, वर्धा (समाजकार्य सन्मान) २००५
४३. डॉ. रूपा कुलकर्णी, नागपूर (समाजकार्य सन्मान) २००६
४४. डॉ. अनंत फडके, पुणे (समाजकार्य सन्मान) २००६
४५. वाहरू सोनवणे, नंदुरबार (समाजकार्य सन्मान) २००६
४६. प्रदीप प्रभू, डहाणू (समाजकार्य सन्मान) २००७

४७. अन्वर राजन, पुणे (समाजकार्य सन्मान) २००७
४८. राजन इंदुलकर, चिपळूण (समाजकार्य सन्मान) २००७
४९. डॉ. आनंद तेलतुंबडे (समाजप्रबोधन) २००८
५०. कुंजबिहारी (पर्यावरण-संतुलन/संरक्षण) २००८
५१. अर्जुन कोकाटे (परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य) २००८
५२. व्यंकप्पा भोसले (दलितांचे प्रश्न) २००८
५३. सुरेश खैरनार (सामाजिक सलोखा) २००८
५४. सुभाष वारे (समाजप्रबोधन) २००९
५५. बंड्या साने (सामाजिक प्रश्न) २००९
५६. श्रीनिवास कुलकर्णी (असंघटित कष्टकरी) २००९
५७. सत्यपाल महाराज (समाजप्रबोधन) २०१०
५८. बस्तू रेगे (असंघटीत कष्टकरी) २०१०
५९. हरीश सदानी (सामाजिक प्रश्न) २०१०
६०. लक्ष्मीकांत देशमुख (लक्ष्यवेधी प्रशासकीय कार्य) २०१०
६१. सुनीती सु. र. (समाजप्रबोधन) २०११
६२. सुभाष लोमटे (असंघटित कष्टकरी) २०११
६३. ब्रायन लोबो (सामाजिक प्रश्न) २०११
६४. माधव बावगे (समाजप्रबोधन) २०१२
६५. बाळकृष्ण रेणके (सामाजिक प्रश्न) २०१२
६६. शिवाजी कागणीकर (असंघटित कष्टकरी) २०१२
६७. गजानन खातू (समाजप्रबोधन) २०१३
६८. धनाजी गुरव (असंघटित कष्टकरी) २०१३
६९. डॉ. अशोक बेलखोडे (सामाजिक प्रश्न) २०१३
७०. रमेश गावस (समाजप्रबोधन) २०१४
७१. बिंदुमाधव खिरे (सामाजिक प्रश्न) २०१४
७२. मनीषा तोकले (असंघटित कष्टकरी) २०१४
७३. भीम रासकर (समाजप्रबोधन) २०१५
७४. पल्लवी रेणके (असंघटित कष्टकरी) २०१५
७५. कृष्णा चांदगुडे (सामाजिक प्रश्न) २०१५
७६. देवजी तोफा (समाजप्रबोधन) २०१६
७७. विजय दिवाण (सामाजिक प्रश्न) २०१६
७८. सुशीला नाईक (असंघटित कष्टकरी) २०१६

७९. रुबीना पटेल (समाजप्रबोधन) २०१७
८०. चेतना गाला-सिन्हा (असंघटित कष्टकरी) २०१७
८१. अरुण जाधव (सामाजिक प्रश्न) २०१७
८२. हरी नरके (समाजप्रबोधन) २०१८
८३. निशा शिवूरकर (असंघटित कष्टकरी) २०१८
८४. मतीन भोसले (सामाजिक प्रश्न) २०१८

**समाजकार्य पुरस्कारांचे मानकरी (संस्था)**

१. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा (समाजप्रबोधन) १९९६
२. कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे (स्त्रियांचे प्रश्न) १९९७
३. लोकविज्ञान संघटना, पुणे (समाजप्रबोधन) १९९७
४. निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद (पर्यावरण संतुलन/संरक्षण) १९९८
५. समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी (समाजप्रबोधन) १९९९
६. महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक (स्त्रियांचे प्रश्न) २०००
७. ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत (पर्यावरण संतुलन/संरक्षण) २००१
८. डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट, मुंबई (समाजप्रबोधन) २००२
९. कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना, कोरेगाव, सातारा (समाजप्रबोधन) २००३
१०. समाज विज्ञान अकादमी, पुणे (समाजप्रबोधन) २००४
११. महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम), पुणे (समाजप्रबोधन) २००४
१२. लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर (समाजप्रबोधन) २००५
१३. श्रमिक महिला विकास संघ, वसई (समाजप्रबोधन) २००५
१४. आंबेडकर अकादमी, सातारा (समाजप्रबोधन) २००६
१५. पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे (समाजप्रबोधन) २००६
१६. हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद (समाजप्रबोधन) २००७
१७. स्त्री मुक्ती संघटना, मुंबई (समाजप्रबोधन) २००७

**सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)**

१. जमीला बेगम पठाण इताकुला २०१९
२. सुधीर अनवले २०२०
३. सुनीता भोसले २०२१
४. कुमारीबाई जमकातन २०२२
५. निसार अली सफदर अली सय्यद आणि वैशाली निसार अली सय्यद २०२३

**सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)**

१. शहाजी गडहिरे २०१९
२. अरुणा सबाने २०२०
३. सुरेश सावंत २०२१
४. नंदिनी जाधव २०२२
५. विजय देठे २०२३

**युवा कार्यकर्ता पुरस्कार**

१. सिम्प्रित सिंग २००८
२. योगिनी खानोलकर २००९
३. निलेश निमकर २०१०
४. चेतन साळवे २०२०
५. युवराज गटकळ २०२१

**सत्कार**

१. श्री. सुरेश खोपडे, मुंबई २००५
२. मनीषा वर्मा २००६
३. प्रकाश विश्वासराव २००७

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)

# पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. दर वर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो. अशाच प्रकारे एक वाङ्मयप्रकार पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारांसाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : ललित साहित्याच्या संदर्भात...**

- ज्यांच्या साहित्यातून लोकशाही मूल्यांच्या आणि मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे, उदारमतवादी दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचं समर्थ दर्शन घडवलं गेलं आहे,
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे,
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचं साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचं ठरलं आहे.

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यकारांनी नि:स्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव लोकशाही मूल्ये आणि मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे, ज्यांच्या लेखनातून उदारमतवादाचा पुरस्कार केलेला आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचं लेखन महत्त्वाचं ठरलं आहे.

**ग्रंथांसाठी पुरस्कार :**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक मराठी ग्रंथांना पुरस्कार दिला जातो. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षांतील पुस्तकांचा विचार केला जातो.

**रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार :**

नाट्यलेखन या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी आशयसंपन्न नाट्यसंहिता लिहिणाऱ्या नाटककारास हा पुरस्कार देण्याची योजना आहे. दीर्घकाळ अशी नाटकं रंगभूमीवर सादर करणाऱ्या रंगकर्मीलाही हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

**समाजकार्य पुरस्कार :**

१९९६पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचं मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन व संरक्षण तसंच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय व धार्मिक सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला वा संस्थेला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. त्याचबरोबर प्रबोधन, रचना व संघर्ष यांपैकी एका प्रकारचं विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारांसाठी व्यक्तींच्या व संस्थांच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

१. ज्या व्यक्ती वा संस्था आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्यं रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचं कार्य करत आहेत,

२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करत आहेत,

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे,

पुरस्काराची संख्या एखाद्या वर्षी कमी-जास्त होऊ शकते. पुरस्कार समिती (अमेरिका) यांनी तो हक्क राखून ठेवलेला आहे.

**महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.**